२५ पैसे

१५ एप्रिल १९६५

# माणूस



मार्टिन ल्युथर किंग

# माझे तत्त्वज्ञान

• डॉ. आंबेडकर

" माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान मी निश्चित केलेले आहे. त्याच्या नास्तिपक्षी व अस्तिपक्षी अशा दोन्ही बाजू मी आता स्पष्ट करणार आहे.

नास्तिपक्षी, सांख्य तत्त्वज्ञानातील त्रिगुणावर आधारित असलेले व भगवद्‌गीतेत विशद केलेले हिंदूंचे सामाजिक तत्त्वज्ञान मला नापसंत आहे. कारण माझ्या मताप्रमाणे कपिलाच्या तत्त्वज्ञानाचे ते एक निर्घृण विकृत स्वरूप आहे. आणि त्याचमुळे जातिव्यवस्था आणि क्रमवार विषमता पद्धति हा हिंदूंच्या सामाजिक जीवनाचा एक मूलभूत नियम ठरला आहे. अस्तिपक्षी, माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान तीन शब्दातच समूर्त झालेले आहे. स्वातंत्र्य, समता आणि सहभाव. फ्रेंच राज्यक्रांतीवरून माझे जीवनतत्त्वज्ञान मी उसने घेतले आहे असे मात्र कोणी समजू नये. तसे मी केलेले नाही हे मी निक्षून सांगतो. माझ्या तत्त्वज्ञानाचे मूळ राजकारणात नसून धर्मात आहे. माझे गुरु भगवान् बुद्ध यांच्या शिकवणुकीतूनच हे तत्त्वज्ञान मी स्वीकृत केले आहे......

माझे तत्त्वज्ञान हे कोणा सुखवस्तु माणसाचा ध्येयवाद आहे असे मानू नये. सामाजिक जीवनातल्या त्रिगुण तत्त्वांचा नाश करून हिंदु समाजात क्रांति घडवून आणू शकेल असेच माझे क्रांतिकारक तत्त्वज्ञान आहे. म्हणून मी इतका चढावखोर आहे...

माझे तत्त्वज्ञान हे फक्त माझ्यासाठी नाही तर ते इतरांसाठीही आहे. निराळ्या शब्दात सांगावयाचे म्हटले तर माझ्या तत्त्वज्ञानाच्या मागे विशिष्ट उद्दिष्ट आहे. मला मतपरिवर्तन करावयाचे आहे. त्रिगुण तत्त्वाच्या अनुचरांना त्याचा त्याग करावयास लावून माझ्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करावयास लावावयाचा आहे."

........ १४ एप्रिल हा डॉक्टर आंबेडकर यांचा जयंतीदिन. त्यानिमित्त त्यांचा बंडखोर स्वभाव आणि मार्मिक व्यासंग याचा प्रत्यय आणून देणारे हे एक विचारस्मरण.




वर्ष चौथे : अंक सतरावा : १५ एप्रिल १९६५ : पंचवीस पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

व्यक्ती आणि वार्ता : ● डॉ. मार्टिन ल्यूथर किंग
□ वा. दा. रानडे

कथा : ● एक दिवस शृंगाराचा
□ प. त्रि. सहस्रबुद्धे
● जिन्याची पायरी
□ श्रीमती एस्. सेठी

पुस्तकपरिचय : ● नाझी भस्मासुराचा उदयास्त
□ रा. म. शास्त्री

शिवाय : ● जगाच्या पाठीवर, दिल्लीदरबार, रंगभूमी, चित्रपट, क्रीडा, विचार-वारे, भितीवरील तुंबड्या ही नेहमीची सदरे.

मुखपृष्ठ : ● डॉ. मार्टिन ल्यूथर किंग : चित्रकार सालकर

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.

जगाच्या पाठीवर

# नॉन-अलायनमेंट ठीक आहे सेल्फ-अलायनमेंट प्रथम हवी

अमेरिकेने द. व्हिएटनाममध्ये विषारी वायूचा वापर केल्यामुळे जगभर संतापाची व अमेरिकेच्या निषेधाची नुकतीच एक लाट येऊन गेली. अमेरिकेतील महत्त्वाच्या प्रतिष्ठित वृत्तपत्रांनीही जॉन्सन सरकारचा याबाबत कडक निषेध करण्यास मागेपुढे पाहिले नाही; पण यातील आश्चर्याचा भाग म्हणजे, खुद्द अध्यक्ष जॉन्सन यांनाही या विषारी वायूच्या वापराबाबत काही माहीत नव्हते, व्हिएटनाममधील अमेरिकन सेनानींनी जॉन्सन यांना न विचारताच परस्परे हा विषारी वायू वापरण्याचा निर्णय घेतला हा होय. ' मला याबाबत काहीच कल्पना दिली गेली नव्हती, ' हे जॉन्सन यांचे नंतरचे निवेदन खरे असण्याची शक्यताही आहे. कारण असाच एक प्रसंग १९६२ मध्ये केनेडींच्या कारकीर्दीत घडला होता. तो केनेडींच्या कणखरपणामुळे टळला हे खरे; पण एकाच सरकारची दोन खाती कशा विरुद्ध दिशांच्या हालचाली करीत असतात व प्रकरण एखादवेळी कसे हातघाईवर येते, याचे ते एक चांगले उदाहरण आहे. ' न्यूयॉर्क टाईम्स ' च्या वार्ताहराने ते उजेडात आणले व व्हिएटनामच्या संदर्भात सध्या अमेरिकेत त्याची जाहीर चर्चा सुरू आहे.

१९६२ च्या मध्याला क्यूबामधून रशियाकडे साखरेची ऐंशी हजार पोती भरलेले एक जहाज निघाले होते. वाटेत या जहाजात काही यांत्रिक बिघाड झाला व त्यामुळे अमेरिकेच्या ' सॅन जु आन ' या बंदरावर दुरुस्तीसाठी या जहाजाला काही दिवस थांबणे भाग पडले. दुरुस्तीसाठी म्हणून जहाजातील साखरेच्या ऐंशी हजार पोत्यांपैकी चौदा हजार पोती बंदरावरील गुदामात उतरवून ठेवण्यात आली. अमेरिकेच्या ' सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी ' (C. I. A.)ला—सरकारी गुप्तचर विभागाला—याची अर्थातच माहिती मिळाली व या विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सुपीक डोक्यांनी एक कारस्थान रचले. एजन्सीची काही माणसे गुप्तपणे या गुदामात शिरली व त्यांनी १४ हजार साखरेच्या पोत्यांत काही केमिकल्स बेमालुमपणे मिसळून टाकली. ही केमिकल्स विषारी नव्हती; पण त्यामुळे साखरेची चव बिघडली होती व रशियात अशी खाण्यास अयोग्य साखर गेल्यावर क्युबा सरकारबद्दल रशियाचे मत कलुषित होईल, उभयतांच्या मैत्रीत वितुष्ट येईल, क्यूबाच्या साखरेचे रशियन गिऱ्हाईक तुटेल व पुन्हा अमेरिकेचेच पाय धरण्याची पाळी क्यूबाच्या कॅस्ट्रोसरकारवर येईल, वगैरे मनोराज्ये या केमिकल-प्रयोगामागे होती.

## • केनेडींचा गुप्त हुकूम

पण केनेडींचे स्वतःचेही एक खासगी गुप्तचरखाते काम करीतच होते. या आपल्या खासगी हस्तकांकडून सी. आय्. ए. या साखरेच्या उपद्व्यापाची माहिती केनेडींना समजली. त्यांनी सी. आय. ए. चा बनाव हाणून पाडण्याचे ठरविले, कारण रशिया व अमेरिका यांच्यात जरी शीतयुद्धाची परिस्थिती यावेळी होती, तरी असले घातकी घोरचाळे करणे केनेडींच्या शूर प्रकृतीला मानवणारे नव्हते. त्यांनी तावडतोब गुदामातील साखरेची १४ हजार पोती पुन्हा जहाजावर चढविण्यास बंदी करणारा एक गुप्त हुकूम काढला.

इकडे बोटीची दुरुस्ती पूर्ण झाली व उतरवलेली साखर घेऊन बोट निघण्याच्या तयारीला लागली. आता गुदामातील १४ हजार पोती केनेडींच्या हुकमाप्रमाणे वाहे-रच काढायची नाही म्हटले, म्हणजे कारणे देत बसावी लागणार, प्रकरणाचा गाजा-वाजा होणार, सी. आय्. ए. बरोबरच अमेरिकेची सर्वत्र छी: थू होणार ! त्यापेक्षा काही तरी कारणास्त बोट बंदरात अधिक काळ अडकवून ठेवणे चांगले नाही का! मग कोणीतरी हळुच बोटीवर एक लहानशी आग लावून टाकली. म्हणजे बोटीचा मुक्काम वाढला व आजचे मरण उद्यावर ढकलले गेले. मग मध्येच कोणीतरी क्यूबा-तून परागंदा झालेला इसम उगवला व त्याने अमेरिकन सरकारकडे अशी कायदे-शीर मागणी केली, की त्याची क्यूबातील मालमत्ता कॅस्ट्रोसरकारने जप्त केलेली आहे व त्याची नुकसानभरपाई म्हणून ही क्युबा सरकारच्या मालकीची १४ हजार साखरपोती अमेरिकन सरकारने जप्त करून त्याच्या स्वाधीन करावी. कोर्टात हा खटला बरेच दिवस चालू होता, तोपर्यंत साखर गुदामात पडून होती. बोट काही बंदरातून हलत नव्हती.

## • रशियाचा तगादा

फार काळ गेला म्हणून शेवटी रशियानेच या बोटीबद्दल तगादा सुरू केला. आता थांबणे शक्य नाही हे दिसल्यावर केनेडींनीही बोट जाऊ दिली, पण त्यात ती १४ हजार पोती मात्र नव्हती.

१४ हजार पोती साखर मध्येच हडप केल्याचा चोरी-दरोडेखोरीचा आरोप अमेरिकेवर करून प्रचाराची एक राळ उडविण्याची संधी क्रुश्चेव्ह यांच्याकडे अचानक चालून आली होती. पण याचवेळी क्युबाच्या प्रश्नावर केनेडींनी युद्धाचा पवित्राच घेतल्याने जागतिक वातावरण एकदम तंग झाले. त्या जागतिक धुमश्चक्रीत या किरकोळ घटनेकडे कोणाचेच लक्ष गेले नाही व नशिबाने अमेरिका या नामुष्कीच्या प्रसंगातून सहीसलामत बाहेर पडली. त्या १४ हजार पोत्यांचे पुढे काय झाले, याचा कोणालाच काही पत्ता नाही. कोणीतरी इसमाने ती खरेदी करून त्याची परस्पर विल्हेवाट लावली, एवढीच त्यासंबधी माहिती उजेडात आली आहे.

अध्यक्ष जॉन्सन यांना द. व्हिएटनाममध्ये वापरल्या गेलेल्या वायूची पूर्वकल्पना दिली गेली नव्हती, याचे खरे कारण मात्र मागाहून पुढे आले. यात व्हिएटनाममधील अमेरिकन सेनानींचे कारस्थान वगैरे काही नव्हते; तो वायू विषारी नव्हताच आणि त्यामुळे त्यासंबंधी वरिष्ठ पातळीवरून विचारविनिमय करण्याचा प्रश्नच उपस्थित झाला नाही. द. व्हिएटनाममध्ये अमेरिकेने वापरलेला वायू तीन प्रकारचा होता. एकतर जवळजवळ अश्रुधूरच होता. त्यामुळे अंगाला खाज सुटे, पण तीन मिनिटांपेक्षा अधिक काळ ती टिकत नसे. दुसऱ्या ' CS ' नावाच्या वायूमुळे छातीत कळा येणे, उलटचा होणे हे प्रकार घडून येतात. पण याचाही परिणाम १५ मिनिटां-पेक्षा अधिक नसतो. तिसरा DM हा वायू. यामुळे जुलाब होतात, डोके व छाती दुखू लागते व परिणामही जास्त वेळ–दोन तासपर्यंत–टिकून राहतात.

हे तीनही वायू विषारी या सदरात गणले जात नाहीत. ब्रिटिशांनी सायप्रस व ब्रिटिश गियानामध्ये यापूर्वी यांचा वापर केलेला आहे; फ्रेंचांनी अल्जरियामध्ये हे सर्व वायू वापरलेले आहेत. बर्लिन भिंतीच्या दोन्ही बाजूंकडील संरक्षक या प्रकारचे वायू असलेले ग्रेनेड्स एकमेकांवर अनेकदा फेकीत असतात. जिनिव्हाच्या १९२५ च्या करारात या प्रकारच्या वायूच्या वापराबाबत प्रतिबंध नाही. तेव्हा अमेरिकेचा निषेध करण्यासाठी सर्व देशांमध्ये जी चढाओढ लागली होती, त्यातील प्रत्येकाचे आंतरिक हेतू काही वेगळेच असणार हे उघड आहे.

## ● एस्. एम्. जोशी यांचा अभिप्राय

भारतानेही या चढाओढीत भाग घेतला व आपला निषेध सौम्यपणे व उशिरा अमेरिकेकडे नोंदवला. वास्तविक भारताने गप्प राहणेच अधिक श्रेयस्कर ठरले असते. चीनची आशिया–आफ्रिकेतील चढाई थोपवून धरण्याचे बळ आज भारता-जवळ नाही. अमेरिका ते काम–चुकीच्या मार्गाने का होईना–करीत आहे. भारताने अशा वेळी गप्प राहणे नैतिकदृष्टचा कमी प्रतीचे मानले, तरी व्यावहारिक मुत्सद्दी-पणाच्या दृष्टीने अवश्य होते. एस्. ए. जोशी यांच्यासारख्या साधनशुचिता मानणाऱ्या नेत्यानेही भारतसरकारला या निषेधनोंदणीबद्दल दोष दिलेला आहे. नुकतेच ते यासंबधी म्हणाले, " व्हिएटनाममध्ये अमेरिकेने विषारी वायू वापरला. तो विषारी नव्हता, असेही नंतर सांगण्यात आले. व्हिएटनाममध्ये अमेरिका व चीन यांची लढाई चालू आहे. आमच्या शत्रूविरुद्ध अमेरिकेने काय वापरले याची चिंता करण्याचे काय कारण आहे ? (आपण) अमेरिकेची निंदा करता कामा नये. गप्प बसले पाहिजे."

अर्थात गप्प बसूनही फार काळ निभणार नाही, हेही उघडच आहे. कारण आशिया-आफ्रिकेत चीनची चौफेर चढाई चढत्यावाढत्या वेगाने सुरू आहे. आशि-याचे नेतृत्व आपल्याकडे खेचून घेण्यासाठी चीनचे राज्यकर्ते आज आटापीटा करीत आहेत. त्यांचे उद्देश व ध्येयधोरणे आशियातील लहानलहान राष्ट्रांना आज सर्वस्वी

मान्य आहेत असे समजण्याचे कारण नाही. त्यांनाही चीनच्या पंजात सापडण्याचा धोका समजतो. पण भारताने पाठ फिरवल्यावर ते दुसऱ्या कोणाच्या आश्रयाला जाणार! व्हिएटनामचेच पाहा. उत्तर व्हिएटनाममध्ये हो चि मिन्ह यांची कम्युनिस्ट राजवट आहे. द. व्हिएटनाममधून अमेरिकेचे हवाई हल्ले उत्तर व्हिएटनामवर सुरू आहेत; पण कम्युनिस्ट असूनही चीनची मदत घेण्यास उत्तर व्हिएटनाम मनापासून तयार नाही. मिळालीच तर रशियाची मदत मिळावी, पण चीनचा संबंध नको, असे या उत्तर व्हिएटनामी कम्युनिस्ट राजवटीलाही वाटत आहे. सिलोनमध्ये सिरिमाओ भांडारनायके यांच्या पक्षाचा नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत पराभव झाला, त्यामागील महत्त्वाचे कारण--भांडारनायके यांचे सरकार चीनधार्जिणे बनले होते, असा सर्वत्र समज पसरलेला होता, हे होय. हे सर्व देश चिनी आक्रमणाच्या वेळी भारताच्या बाजूस उभे राहिले नाहीत, यावरून त्यांचा भारतावर किती अविश्वास आहे, हे स्पष्ट झाले. वास्तविक हे सर्व देश भारताला अधिक जवळचे; पूर्वीपासून त्यांचा भारताकडे स्वाभाविक ओढा. अगदी चीनच्या हातात हात घालून चालणारा इंडोनेशिया घ्या. रामायण-महाभारताचा, हिंदू देवदेवतांचा या देशावरील प्रभाव आजतागायत कायम आहे. अध्यक्ष



सुकार्नो स्वतःला वेदांती म्हणवतात व विवेकानंदांना आपल्या गुरुस्थानी मानतात. पण भारत स्वतःच हिंदुत्वाच्या पायावर स्वयंपूर्ण व स्वाभिमानी जीवन उभारण्याऐवजी पश्चिमेच्या नाहीतर रशियाच्या तालावर नाचू लागला, तर इंडोनेशिया कशाला जवळ येईल ? तीच गोष्ट नेपाळची, तिबेटची. परंपरेच्या, हिंदुबौद्ध समानधर्माच्या व समानसंस्कृतीच्या दुव्याने आम्ही या सर्व लहानलहान राष्ट्रांची एक अभेद्य जूट सहज निर्माण करू शकलो असतो, अजूनही करणे अशक्य नाही; पण त्यासाठी प्रथम स्वतःला स्वतःची ओळख पटली पाहिजे. ' नॉनअॅलायनमेंट-- अलिप्तता ' ठीक आहे, पण तिला नैतिक वजन येण्यासाठी प्रथम ' सेल्फ अलायनमेंट--स्वलिप्तता ' हवी. पंचशीलही बरोबरच आहे. कारण भारताला कोणावरही आक्रमण करावयाचे नाही, कोणाच्याही अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करावयाची नाही. प्रश्न आहे, भारताजवळ स्वतःचे ' शील ' आहे का ? पंचशील पेलायला भारत समर्थ आहे का ? तिबेट चीनच्या घशात जात असताना जो स्वस्थ राहिला, त्याने पंचशीलाची भाषा कशाला उच्चारावी ?

## ● मधु लिमये यांचे खडे बोल

मागे झाले ते होऊन गेले. चुका दुरुस्त करता येतात. स्वतंत्र तिबेटचा प्रश्न पुन्हा उपस्थित करून भारताने आपल्या नव्या स्वतंत्र परराष्ट्रनीतीची चुणुक जगास दाखविण्यास आजही काय हरकत आहे ! शेख अब्दुल्लांना हाताशी धरून चीन स्वतंत्र काश्मीरचा घाट घालीत आहे. मग वेळ उत्तमच आहे. आम्ही दलाई लामांना हाताशी धरून स्वतंत्र तिबेटची घोषणा का करू नये ! लोकसभेत विरोधी पक्षांकडून तशी उघड मागणीही होऊ लागलेली आहे. मधू लिमये लोकसभेत भाषण करताना म्हणाले—

" तिबेटच्या बाबतीत नं. १ चा गुन्हेगार चीन आहे. पण मी स्पष्टपणे सांगू इच्छितो, की भारत सरकार आणि भूतपूर्व प्रधानमंत्रीही नं. २ चे गुन्हेगार आहेत. कारण तिबेटवरील चीनच्या आक्रमणाचे त्यांनी समर्थनच केले होते आणि आता याच सरकारातील नंदासाहेब डाव्या कम्युनिस्टांनी चीनच्या तिबेटवरील आक्रमणाचे स्वागत केले म्हणून सांगतात, तेव्हा आश्चर्य वाटते.

तुम्ही काय केलेत ?

शास्त्री सरकाने आपल्या या चुकीच्या धोरणाबद्दल तिबेटी जनतेची आणि भारतीयांची निःसंकोचपणे माफी मागितली पाहिजे. तिबेटवरील चीनच्या प्रभुत्वाला असलेली मान्यता भारत सरकारने काढून घेतली पाहिजे आणि तिबेट जोपर्यंत स्वतंत्र होत नाही, तोपर्यंत तेथील जनतेला तिच्या स्वातंत्र्यआंदोलनात हरप्रकारचे

सहाय्य केले पाहिजे. या बाबतीत रशियाने मंगोलियाच्या बाबतीत ज केले, त्याचे अनुकरण करता येण्यासारखे आहे. १९२४ साली चीनचे त्यावेळचे राज्यकर्ते व रशिया यांच्यात झालेल्या करारानुसार मंगोलिया हा चीनचाच एक प्रदेश असल्याची मान्यता रशियाने दिली होती. पण पुढे मंगोलियन जनता स्वातंत्र्यासाठी बंड करू लागली, तेव्हा रशियाने तिला सहाय्य केले आणि स्वतंत्र सार्वभौम मंगोलियाला स्वत: मान्यता दिली; इतकेच नव्हे तर याल्टा करारानुसार रशियाने दुसऱ्या महा-युद्ध काळात अमेरिकेकडूनही मंगोलियास मान्यता मिळवून दिली आणि पुढे चीन-मध्ये कम्युनिस्ट राजवट स्थापन झाली, तेव्हा तिलाही स्वतंत्र सार्वभौम मंगोलियास मान्यता देणे भाग पाडले. आज हा स्वतंत्र मंगोलिया राष्ट्रसंघात आहे."

नेहमी असेच घडते. जे सत्तेवर नसतात, त्यांनाच नेहमी नवी दिशा दाखवावी लागते, नवी पावले टाकावी लागतात. दीर्घकाल सत्तेवर राहिल्याने एकप्रकारचा हवालदीलपणा, मरगळ सत्तेवर असणाऱ्यांच्या ठिकाणी साचून राहते. विरोधकांनी दाखवून दिलेल्या या नव्या जहाल मार्गाने जाण्याचे धैर्य शास्त्री-सरकार दाखव-णार आहे का? कारण देश आज मवाळांच्या राजकारणाला विटत चालला आहे. जहाल वारे वाहू लागले आहे. कोण हे नवे वारे शिडात भरून पुढे जातो ते पाहायचे.

**श्री. ग. मा.**


कॅल्शियमयुक्त

**बिटको**

**ग्राइप**

नेहमी दिल्याने

लहान मुले सशक्त, बांधेसूद

व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

**बिटको**

**काळी**

**टूथ पावडर**

नेहमी वापरल्याने

दात मोत्यांसारखे स्वच्छ

व चकचकीत होतात.

**बिटको केमिकल इंडस्ट्रीज,**

**नाशिक रोड.**



दिल्ली दरबार

# उद्योगपतींचे गाजलेले अधिवेशन

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीजचे यंदाचे वार्षिक अधिवेशन बरेच गाजले. या अधिवेशनात झालेल्या भाषणांवर व संमत झालेल्या ठरावांवर देशभर बरीच उलटसुलट चर्चा झाली. सरकारी मंत्री व अधिकारी आणि कारखानदार नि व्यापारी यांच्यातील मतभेद विकोपाला गेल्याचे या अधिवेशनात दिसून आले व एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्याची संधी दोघांनीही या अधिवेशनाच्या निमित्ताने साधून घेतली असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

'फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज' ही भारतातील व्यापारी व कारखानदारांची सर्वात मोठी व भारतीय पातळीवरील प्रतिनिधिक संस्था. देशाच्या निरनिराळ्या भागातील चेंबर्स ऑफ कॉमर्स व व्यापारी नि कारखानदार यांच्या इतर संस्था या फेडरेशनला संलग्न असून या सर्व संस्थांची व पर्यायाने भारतातील व्यापारी व कारखानदारांची धोरणे ठरविण्यात सदर संस्थेचे महत्त्व फार मोठे आहे. साहजिकच अशा संस्थेचे वार्षिक अधिवेशन म्हणजे भारतातील व्यापारी व कारखानदार समाजाच्या सर्व प्रतिनिधींचा मेळावा. साहजिकच या अधिवेशनात चर्चिले जाणारे व संमत होणारे विषय यांना फार मोठ महत्त्व येते. श्री. अशोक मेहता यांनी म्हटल्याप्रमाणे ही एकप्रकारे कारखानदारांची संसद (इंडस्ट्रियल पार्लमेंट) आहे.

## ● पंतप्रधान शास्त्री यांचा परखडपणा

दिनांक २०, २१ व २२ मार्च १९६५ रोजी भरलेले फेडरेशनचे हे ३८ वे अधिवेशन. ना. श्री. लालबहादूर शास्त्री ह्यांनी ह्या अधिवेशनाचे उद्‌घाटन केले. फेडरेशनचे मावळते अध्यक्ष श्री. केशवप्रसाद गोऐंका यांनी अध्यक्षीय भाषण केले. नेहमीप्रमाणे अध्यक्षीय भाषणात त्यांनी गेल्या वर्षात आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात झालेल्या घडामोडींचा परामर्श घेतला व व्यापारी नि कारखानदार वर्गापुढे असलेल्या अडचणींचा उल्लेख केला. वास्तविक फेडरेशनच्या किंवा सर्व चेंबर्स नि

तत्सम संघटनांच्या नेहमीच्या प्रथेनुसार तयार केलेले हे भाषण. उपस्थित पाहुण्यांनी आपल्या भाषणांत या अडचणींचा उल्लेख करावयाचा व सरकारचे तिकडे लक्ष असल्याचे सूचित करून चार गोड शब्द बोलून समारंभ साजरा करावयाचा ही नेहमीची पद्धत. पण या खेपेस मात्र होरा चुकला. पंतप्रधान ना. शास्त्रीजींनी अशा तऱ्हेचे गुळमुळीत भाषण न करता वेगळा पवित्रा घेतला व अध्यक्षीय भाषणातील अनेक मुद्दे खोडून काढले. त्या मुद्यांशी सरकार सहमत होऊ शकत नसल्याचे स्पष्टपणे ऐकविले व व्यापारी नि कारखानदार वर्गाचे कोठे चुकते आहे ह्याचा मोठ्या परखडपणे आपल्या भाषणात उल्लेख केला. वास्तविक फेडरेशच्या प्रतिनिधींना हे फारसे नवे आहे असे नाही. यापूर्वी कै. पंडितजी दरसाल फेडरेशनच्या अधिवेशनास येत असत तेव्हा त्यांनी वेळोवेळी व्यापारी व कारखानदार वर्गाची कानउघाडणी केली होती. पण पंडितजींनी कितीही कठोर शब्द वापरले तरी तो एक कौतुकाचा विषयच होऊन बसत असे व जमलेल्या प्रतिनिधींना त्याचा पुनः विसरही पडत असे. पण या खेपेस मात्र ना. शास्त्रीजींच्या भाषणाने सर्वांना विचार करावयास लावले व प्रतिनिधींच्या मनात निश्चितपणे चलबिचल झाली. गतसाली देशात अन्नधान्याची कठिण परिस्थिती असताना फेडरेशन व व्यापारी समाजाने सरकारला पुरेशी साथ दिली नाही; करवाढीसंबंधी तक्रार करण्यात अर्थ नाही कारण भारतासारख्या गरीब देशाच्या आर्थिक वाढीसाठी करवाढीने उत्पादन उभे करण्याखेरीज इलाज नाही; कारखानदारवर्गाने नैराश्य व सरकारवरील टीकेचे घोरण सोडून आपले घर सुधारण्याकडे अथवा आपल्या मालाची प्रत वाढविणे व मालाच्या निर्मितीचा खर्च कमी करणे याकडे थोडेसे अधिक लक्ष द्यावे, हे त्यांच्या भाषणातले प्रमुख मुद्दे होते. विशेष म्हणज कोणताही आडपडदा न ठेवता स्पष्टपणे त्यांनी हे मुद्दे आपल्या भाषणातून मांडले व थोडक्यात सांगावयाचे तर सरकारच्या सामर्थ्याची जमलेल्या प्रतिनिधींना चुणूक दाखविली.

## ● अशोक मेहतांनी सभा जिंकली.

त्यानतर अधिवेशनास व ठरावावरील चर्चेस सुरुवात झाली. पहिला दिवस विशेष काही न होता पार पडला. दुसऱ्या दिवशी चौथ्या पंचवार्षिक योजनेवरील ठरावावर नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता यांना आमंत्रण देण्यांत आले होते. ते व त्यांचे सहकारी हे ही चर्चा ऐकण्यास मुद्दाम उपस्थित होते. या ठरावावरील चर्चा सुरुवातीस जरी बरी वाटली तरी बहुतेक वक्त्यांचे मुद्द्यात तोचतोपणा होता व फार गांभीर्याने त्यांनी सदर विषयाचा विचार केला आहे असेही काही वाटत नव्हते. पुढे पुढे तर ह्या विषयावरील चर्चेस थोडेसे टिंगलीचेही स्वरूप आले. साहजिकच श्री. अशोक मेहता यांनी आपल्या भाषणात या सर्व वक्त्यांवर कडाडून

[ पान ७८ पाहा ]

# विचार धारे

## • चंदेरी पडद्याच्या दोन बाजू

चित्रपटव्यवसाय की चित्रपटकला ? मुंबईच्या गल्लोगल्ल्यांत गल्ल्यावर बसलेल्या निर्मात्याला हा यक्षप्रश्न कधीच पडत नाही. पण चित्रपटांचे माहेरघर असलेल्या हॉलिवुडमध्ये अजूनही या प्रश्नावर विचार करणारी मंडळी आहेत. त्यांतले दोन महारथी नुकतेच दिल्लीच्या भेटीत या नाण्याच्या दोन्ही बाजू दाखवून गेले, ते म्हणजे एलिया कझान आणि जेरी ब्रेसलर. अमेरिकन दिग्दर्शकांत कझानचें स्थान "या सम हा" असे आहे—मग ते नाटक असो, नाही तर चित्रपट, टेलिव्हिजन असो, नाही तर रेडिओ, पण चित्रपटांचे माध्यम कझानला सर्वांत अधिक आवडते. "हे माध्यम सर्वांत अधिक आधुनिक व सर्वांत अधिक प्रभावी आहे. खऱ्या जीवनाचे अधिकात अधिक जवळून दर्शन मात्र माध्यमाच्या सहाय्याने घडू शकते." कझानला हे मान्य आहे, की नाटकातला नट समोर बसलेल्या प्रेक्षकांच्या मनात प्रत्यक्ष सह-संवेदना निर्माण करू शकतो. "पण या बाबतीतली उणीव चित्रपट दुसऱ्या बाबतीत भरून काढू शकतो. शिवाय हा ज्याच्या त्याच्या आवडीचा प्रश्न आहे अन् माझी आवड म्हणजे चित्रपट."

कझानचा "अमेरिका, अमेरिका" हा किंचित आत्मचरित्रात्मक चित्रपट भारतात नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखविला गेला. त्यात मायदेशाला सोडून अमेरिकेच्या स्वप्नसृष्टीत वास्तव्याला येणाऱ्या एका कुटुंबाची कहाणी आहे. या चित्रपटात अमेरिकेवर टीका कशी असे कझानला विचारले, तेव्हा ते म्हणाले, "तुमचे तुमच्या देशावर प्रेम असेल, तर त्यावर टीका करायचा तुम्हांला अधिकार आहे. माझे माझ्या देशावर अत्यंत प्रेम आहे." शिवाय "मला असे दाखवायचे होते की पुष्कळ लोक काहीतरी ध्येय उराशी बाळगून अमेरिकेच्या आसऱ्याला आले, पण त्यांचे काय झाले ? ध्येय बाजूलाच राहिले अन् पदरात काय पडले ?—फक्त पैसा !"

"चित्रपट ही जीवन-दर्शनाचे सर्वोत्कृष्ट माध्यम असलेली कला आहे," हे कझानचे मत निर्माता म्हणून तीनदा ॲकॅडमी–ॲवॉर्ड जिंकणाऱ्या ब्रेसलरला मान्य नाही. एखाद्या उत्कृष्ट नाटकाला ज्या अर्थाने कलेचा आविष्कार म्हणता येईल, त्या अर्थाने चित्रपट ही कला म्हणता येणार नाही, असे त्यांचे मत आहे. "चित्रपटात कला आणि आर्थिक व्यवसाय यांचे मिश्रण असते," पण "कलेशी इमान न राखणारा" चित्रपट आपण कधीही काढला नाही, असा त्याचा दावा आहे. हल्लीच्या 'जेट युगा'त चित्रपट कुठल्याही एका भागातील लोकांसाठी केलेले नसतात, म्हणून आजच्या

चित्रपटात "नाटय जास्त व शब्द कमी" हवेत.

**● बालक्रीडेचे संगीत**

"जगातले सर्वांत जुने असे जिवंत संगीत कोणते ?" हंगेरीचे विख्यात संगीतज्ञ प्रा. झॅबोलची यांना परवा दिल्लीत एका भाषणाच्या वेळी हा प्रश्न विचारला गेला; तेव्हा त्यांनी चट्कन उत्तर दिले, "बालक्रीडेचे संगीत !" जवळ असलेल्या पियानोवर त्यांनी लगेच त्याचे प्रात्यक्षिकही दाखविले. "भारत ही माझी स्वप्नसृष्टी आहे," ते म्हणाले, "भारतीय संगीत हे एकच संगीत असे आहे की त्यात अखिल विश्वाच्या एकात्मतेचा साक्षात्कार आहे..." असे आहे तर जगाच्या इतर भागांतले संगीतकार आपली कला अधिकाधिक बोलकी करायचा जसजसा प्रयत्न करतील तसतसे त्यांचे संगीत भारतीय संगीताच्या जवळ येणार नाही काय ? "अवश्य ! नवीन पाश्चिमात्य संगीतकारांच्या छायेला अधिकाधिक भावपूर्ण करायला भारतीय संगीताची मदत होऊ शकेल." या दृष्टीने भारतीय संगीताकडे पाहिले तर पाश्चिमात्य व पौर्वात्य संगीतात एक उपयुक्त समन्वय घडवून आणता येईल आणि हाच स्वरमेळ "मानवजातीचे भावी संगीत" ठरेल. 'जाझ' या संगीत प्रकारात संगीतकाराला एका विशिष्ट मर्यादेत नवनिर्मितीची मुभा असते, तेव्हा हे संगीत भारतीय संगीत-प्रणालीच्या निकट येत आहे की नाही ? प्रा. झॅबोलनी साशंकतेने मान हलविली. "आधुनिक जाझ ज्या दिशेने जात आहे ती मला इष्ट वाटत नाही."

याच सुमाराला दुसरे एक संगीत-तज्ज्ञ भारत-भेटीस येऊन गेले; ते म्हणजे अमेरिकेचे डॉ. हॅरी रॉबर्ट विल्सन. आधुनिक भारतीयांना पाश्चिमात्य शास्त्रीय संगीताचे वाढते आकर्षण पाहून ते चकित झाले. उलट पाश्चिमात्य श्रोत्यांना भारतीय शास्त्रीय संगीत फारसे रुचलेले नाही; असे त्यांचे मत आहे. "भारतीय शास्त्रीय संगीत ही एक मर्यादित कला आहे. ती ज्यांना समजेल, त्यांचेच मन जिंकू शकते. त्यामुळे तिला जगभर रसिक लाभलेले नाहीत." मग रविशंकरचे इतके उत्कट स्वागत झाले ते कसे ? "त्याचे कारण त्याच्या संगीतात जाझचा थाट बराच आहे, हे असावे. मी ते ऐकले तेव्हा ते मला एखाद्या चांगल्या 'जॅम सेशन'सारखे वाटले." डॉ. विल्सन म्हणतात, "माझे संगीतविषयक तत्त्वज्ञान असे आहे. शास्त्रीय संगीताच्या सहवासाचा तरुण मंडळींच्या व्यक्तिमत्त्वावर व चारित्र्यावर चांगला परिणाम होतो. जोपर्यंत ही मंडळी शास्त्रीय संगीताची आस सोडीत नाहीत तोपर्यंत मधून-मधून "रॉक अँड रोल" व 'चाचाचा' असला तरी हरकत नाही.

● ○ ●



DRAWING
BY
ILLINGWORTH

## ● अमेरिकेतील दांडीयात्रा

महात्मा गांधींच्या दांडी-यात्रेची आठवण करून देणारा एक मोर्चा अमेरिकेत नुकताच निघाला. अलबामा राज्यात निग्रोंना मतदानाचा समान हक्क मिळावा, या मागणीसाठी सेलमा ते माँटगोमेरीपर्यंत ५० मैलांचा हा मोर्चा डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांच्या नेतृत्वाखाली निघाला होता. डॉ. किंग गांधीजींच्या अहिंसात्मक प्रतिकाराच्या मार्गाचे पुरस्कर्ते आहेत. निग्रोंची चळवळ ते याच मार्गाने करीत आहेत.

### दहशतीपुढे नमले नाहीत

निग्रोंच्या हक्कासाठी केलेल्या चळवळीत किंग यांनी स्वतःचा जीव अनेकदा धोक्यात घातला. त्यांना तीन वेळा भोसकण्यात आले. सहा वेळा त्यांच्यावर हल्ला झाला तीन वेळा त्यांच्या घरावर बॉंब टाकण्यात आले. चौदा वेळा त्यांना कारावास घडला, पण या दडपशाहीपुढे व दहशतींपुढे नमून त्यांनी आपला लढा सोडला नाही.

लढ्याची ही परंपरा त्यांच्या घराण्यातच जोपासली गेलेली आहे. त्यांचे आजोबा (आईचे वडील) रेव्हरंड ए. डी. विल्यम्स हे निग्रोंच्या समानहक्कासाठी झगडणाऱ्या 'नॅशनल असोसिएशन फॉर दि अॅडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल' या संस्थेच्या जॉर्जियामधील शाखेचे प्रमुख नेते होते. निग्रो मतदारांची हेटाळणी करणाऱ्या अॅटलांटा येथील एका वृत्तपत्रावर बहिष्कार घालण्याच्या मोहिमेत त्यांनी पुढाकार घेतला होता. निग्रो शिक्षकांना गोऱ्या शिक्षकांएवढाच पगार मिळाला पाहिजे आणि अॅटलांटा कोर्टाच्या इमारतीत गोऱ्यांसाठी व निग्रोंसाठी असलेले निरनिराळे जिने रद्द केले पाहिजेत, या मागण्यांसाठी झालेल्या चळवळींत मार्टिन किंग यांचे वडील आघाडीवर होते.



# निग्रोंचे गांधी

## डॉ. मार्टिन ल्यूथर किंग

—वा. दा. रानडे

### अपमानाचे चटके

अमेरिकेत निग्रोंना जे अपमानाचे व अवहेलनेचे जिणे जगावे लागते, त्याचे चटके मार्टिन यांनी बालपणीच अनुभवले. रेल्वेगाड्यांमधील डाइनिंगकारमध्ये गोरे व काळे यांच्यात भेद करण्यासाठी दोहोंमध्ये एक पडदा टाकलेला असे. पुढच्या बाजूस गोरे लोक बसत आणि पड्याच्या मागच्या बाजूस निग्रोंना बसावे लागे. गाडीत आलेला वर्णभेदाचा तो पहिला अनुभव किंग कधीच विसरले नाहीत. ते म्हणतात, "त्यावेळी पड्यामागे बसताना जणू माझ्या संबंध जीवनावरच पडदा टाकला गेला आहे, असे मला वाटले. तो अपमान मी कधी विसरणार नाही."

असाच दुसरा एक प्रसंग मार्टिन व त्यांचे शिक्षक मॅकॉनहून ॲटलांटाकडे एका बसमधून चालले होते. काही गोरे उतारू बसमध्ये चढले व त्यांना बसायला जागा करून देण्यासाठी तुम्ही उभे राहा, असे मार्टिन व त्यांच्या शिक्षकास ड्रायव्हरने सांगितले. मार्टिन लिहितात, "आम्ही लागलीच उठलो नाही. तेव्हा ड्रायव्हरने आमच्या काळ्या वर्णावरून शिवीमाळ सुरू केली. मुळीच हलायचे नाही, असं ठरविलं होतं, पण आपण कायदा पाळला पाहिजे, असे शिक्षकांनी मला सांगितलं. आम्ही उभे राहिलो आणि ॲटलांटापर्यंत संबंध ९० मैलांचा प्रवास उभ्याने केला. ती रात्र मी कधी विसरणार नाही. आयुष्यात एवढा तीव्र संताप मला कधी आला होता, असे वाटत नाही."

### तत्त्व खिस्तांची, तंत्र गांधींचे

मार्टिन हुशार विद्यार्थी होता. पंधराव्या वर्षी माध्यमिक शिक्षण पुरे करून ॲटलांटाच्या निग्रो मूरहाउस कॉलेजमध्ये त्याने प्रवेश केला. त्याने धर्मोपदेशक व्हावे, अशी वडिलांची इच्छा होती, पण वैद्यक किंवा कायद्याचे शिक्षण घ्यावे, असे

मार्टिनला वाटत होते. असे असले तरी निग्रोंना जे अपमानास्पद जिणे जगावे लागत होते, त्याविरुद्ध संघटित लढा दिला पाहिजे, असेही विचार त्याच्या मनात होते. या विचारांना योग्य सामाजिक व बौद्धिक बैठक कोणती याचा शोध मार्टिनचे मन करीत होते. थोरेचा ' सविनय कायदेभंग ' हा निबंध त्याने अनेकदा वाचला व आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी धर्मोपदेशक होणेच योग्य, असे त्याने ठरवून टाकले. पेनसिल्व्हानियातील चेस्टर येथील क्रोझर थिऑलॉजिकल सेमिनरी-मध्ये धार्मिक शिक्षण घेताना तत्त्वज्ञानाची बैठक तयार होऊ लागली. हेगेल आणि कान्ट यांचा मार्टिनवर प्रभाव पडला, पण महात्मा गांधींवरचे एक व्याख्यान त्यांनी ऐकले आणि त्यांच्या विचारसरणीने आकर्षित होऊन गांधीजींची पुस्तके त्यांनी वाचून काढली. डॉ. किंग म्हणतात, " ख्रिस्ती तत्त्वे माझ्या मनोभूमीत रुजलेली होतीच. ती अमलात कशी आणावयाची याचे तंत्र मी गांधींपासून शिकलो. "

या तंत्राचा प्रयोग करण्याचा पहिला मोठा कसोटीचा प्रसंग १९५५ साली म्हणजे दहा वर्षांपूर्वी मॉंटगोमेरीमध्ये आला. एक डिसेंबर, १९५५ ला रोझा पार्कस नावाची निग्रो महिला एका बसमध्ये बसली. एका गोऱ्या उतारूला जागा करून देण्यासाठी ड्रायव्हरने तिला उठायला सांगितले, पण तिने नकार दिला. तिला अटक होऊन दहा डॉलर दंड झाला. अलीकडच्या काळातील निग्रोंच्या लढ्याची सुरवात या प्रसंगातून झाली. त्या निग्रो महिलेने जागेवरून उठण्याचे नाकारले, ते काही पूर्वनियोजित नव्हते. " खरेदी करून मी दमले होते. माझे पाय दुखत होते, म्हणून मी उठले नाही, " असे नंतर तिने सांगितले.

## बसेसवर बहिष्काराचा लढा

पण या प्रसंगानंतर काही तासांतच बसेसवर बहिष्काराची चळवळ मॉंटगोमेरीतील निग्रोंनी हाती घेतली. हा बहिष्कार ९९ टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात यशस्वी झाला. या मोहिमेसंबंधी पत्रके काढून शहरातील पन्नास हजार निग्रो नागरिकांमध्ये ती वाटण्याची कामगिरी मार्टिन यांनी पत्करली होती, ती त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. त्यावेळी अवघा २७ वर्षांचा असलेला हा तरुण तेव्हापासून निग्रोंचा लोकप्रिय नेता झाला.

नेते दोन प्रकारचे असतात. एखाद्या संघटनेची किंवा चळवळीची देखरेख, व्यवस्था, नियोजन ही कामे काही नेत्यांना चांगली जमतात, तर काही नेते चळवळीची नुसती रूपरेखा किंवा कल्पना सूत्ररूपाने मांडतात. त्यांच्या नेतृत्वा-पासून अनुयायांना स्फूर्ती-प्रेरणा मिळते. डॉ. किंग असे दुसऱ्या प्रकारचे नेते आहेत.

बहिष्काराच्या या चळवळीत डॉ. किंग यांच्या घरावर बॉंब टाकण्यात आला. तेव्हा निग्रो लोक प्रक्षुब्ध झाले. रस्त्यावर प्रक्षोभक निदर्शने करण्यासाठी ते जम-णार होते, पण डॉ. किंग यांनी आपल्या अहिंसेच्या शिकवणुकीने त्यांना शांत ठेवले.

## चुका कबूल करण्याचे धैर्य

महात्मा गांधींप्रमाणेच डॉ. किंगही आपल्या चुका प्रामाणिकपणे कबूल करण्याचे धैर्य दाखवितात. जॉर्जिया राज्यात अल्बनी येथे डिसेंबर, १९६१ मध्ये एका सामुदायिक निदर्शनात त्यांनी भाग घेतला. त्यांना अटक झाली. अल्बनीमधील सर्व सार्वजनिक ठिकाणचा वर्णभेद नष्ट होईपर्यंत मी तुरुंगातच राहीन, असे त्यांनी घोषित केले, पण दोन दिवसांतच ते जामिनीवर मुक्त झाले. चळवळ बारगळली. किंग यांच्यावर बरीच टीका झाली. नंतर आपली चूक कबूल करून ते म्हणतात, "त्यावेळी मी जामिनावर मुक्त होऊन बाहेर येण्यात चूक झाली. बाहेर काय घडत होते, हे मला नीट समजले नाही. आम्ही विजय मिळविला, असे आम्हांला वाटले, पण बाहेर आल्यावर समजले की ती सारी बनवाबनवी होती. चळवळीत मिळालेला पुढाकार आम्ही गमावला व ती संधी पुन: मिळाली नाही."

पण अलबनीच्या चळवळीने दुसरा एक धडा किंग यांना शिकविला. ते म्हणतात, "अर्थसत्तेचे यंत्रणेवर हल्ला करण्याऐवजी आम्ही राजसत्तेचे यंत्रणेवर हल्ला केला. आपल्या बाजूला मते नसतील, तर राजसत्तेचे यंत्रणेवर विजय मिळविता येत नाही, पण व्यापाऱ्याच्या नफ्याचे तोटयात रूपांतर करण्याची आर्थिक शक्ती तुमच्यात असेल, तर आर्थिक यंत्रणेवरचा हल्ला यशस्वी होतो. १९५५ साली मॉंटगोमरीमधील बसेसवरचा बहिष्कार यामुळेच यशस्वी झाला."

अलबामा राज्यातील वर्णभेद नष्ट करण्यासाठी त्या राज्याविरुद्ध आर्थिक बहिष्कार सर्वांनी पुकारावा, त्या राज्याशी मालाची वाहतूक करू नये, त्याचा माल विकत घेऊ नये, अशी सूचना किंग यांनी नुकतीच केली, त्यामागे हाच उद्देश आहे.

## चळवळीसाठी सांकेतिक नावे

अलबमातील चळवळीनंतर १९६३ साली बर्मिंगहॅमकडे किंग यांनी मोर्चा वळविला. बर्मिंगहॅम म्हणजे कट्टर वर्णद्वेष्टयांचा बालेकिल्ला होता. तेथील चळवळीसाठी तुरुंगात जाण्याची तयारी असलेले २०० कार्यकर्ते त्यांनी जमविले. त्यांच्या चळवळीची माहिती काढण्यासाठी बर्मिंगहॅमचे पब्लिक सेफ्टी कमिशनर थिऑफिलिस युजिन यांनी निग्रो समाजात काही हेर पेरले. आपले फोन चोरून ऐकले जात आहेत, अशी शंका आल्यावर निग्रो कार्यकर्त्यांनी आपसातील व्यवहारासाठी सांकेतिक शब्द तयार केले. किंग स्वत: 'जे. एफ. के.' झाले. त्यांच्या मित्रांनी अशीच सांकेतिक नावे घेतली. आपल्या चळवळीचा उल्लेख ते आपसात 'प्रॉजेक्ट सी' या सांकेतिक नावाने करू लागले. रोज निदर्शने होऊ लागली व किंग यांच्यासह ३३०० निदर्शकांना अटक झाली. सात मे, १९६३ ला पंचवीसशे निग्रोंनी मोठे निदर्शन केले. ते मोडण्यासाठी पोलिसांनी दंडुक्यांचा हल्ला केला. होज पाइपमधून पाण्याचा मारा केला. चळवळ शमेना, तेव्हा गोऱ्या वर्णद्वेष्टयांनी दहशतीच्या मार्गाचा अवलंब केला. अलबामामध्ये विल्यम मूर यांना

गोळी घालून ठार करण्यात आले. एन्. ए. ए. सी. पी. या निग्रो संघटनेचे नेते मेडगर एव्हर्स यांच्यावर मारेकऱ्यांनी त्यांच्या घरापुढेच हल्ला करून त्यांना ठार केले. बर्मिंगहॅममध्ये एका चर्चवर बाँब टाकण्यात आला. त्यात चार निग्रो मुले ठार झाली. त्याच दिवशी आणखी दोघांना गोळ्या घालून ठार करण्यात आले. जॅकसन केंब्रिज येथेही असेच हिंसक प्रकार घडले.

पण या दडपशाहीमुळे व दहशतीमुळे निद्रिस्त निग्रो खडबडून जागा झाला. श्रीमंत, मध्यमवर्गीय, गरीब सारे भेद नष्ट होऊन निग्रोसमाज समान हक्कांच्या लढ्यासाठी एकजुटीने उभा राहिला. प्रत्येक मोठ्या शहरांत निदर्शने होऊ लागली. चळवळीत अनेक गोरे लोकही भाग घेऊ लागले.

## स्वाभिमान जागृत केला

निग्रोंनी वॉशिंगटनवर प्रचंड मोर्चा नेला. या मोर्चात दोन लाख लोक सामील झाले होते. निग्रो चळवळीने यादवी युद्धानंतरच्या कोणत्याही वर्षात साध्य केल्या नाहीत, एवढ्या गोष्टी या एका वर्षात साध्य केल्या. दक्षिणेत ११४१ शाळांतून वर्णभेद रद्द झाला. तीनशे शहरांत पोहण्याच्या तलावापासून हॉटेलापर्यंत सर्व सार्व-जनिक सुखसोयींची ठिकाणे गोऱ्यांच्या बरोबरीने निग्रोंना खुली झाली. डॉ. किंग यांच्या चळवळीचा सर्वांत मोठा परिणाम म्हणजे निग्रोंमधील पराभूत मनोवृत्ती जाऊन स्वाभिमान जागृत झाला.

## रोज वीस तास काम

डॉ. किंग रोज वीस तास काम करतात. ॲटलांटा येथे चर्चजवळ त्यांचे जुन्या पद्धतीचे दुमजली घर आहे. त्यांच्या खोलीतील भिंतींना काही आफ्रिकन चित्रे आणि महात्मा गांधींचा फोटो आहे. किंग रोज सकाळी साडेसहा वाजता उठतात आणि पाऊण तास आपल्या अभ्यासिकेत बसून वाचन करतात. फळांचा रस व कॉफीयुक्त उपाहार झाल्यावर सकाळी नऊ वाजता ते ऑफिसला जातात. ऑफिस-मधील त्यांच्या खोलीत निग्रो प्रश्नांच्या फायली, धार्मिक विषयांवरचे दोनशे ग्रंथ आहेत. त्यांना रोज सत्तर पत्रे येतात. दुपारचे जेवण ते ऑफिसमध्येच घेतात आणि नंतर कामाचे चक्र पुनः सुरू होते, ते रात्री दोन ते तीनपर्यंत चालते.

अनेकदा जीव धोक्यात घालून त्यांनी प्रवास केला आहे. ते म्हणतात, "हल्ल्यांची भीती मी बाळगत नाही. तशी भीती बाळगली तर माझ्या हातून काहीच होणार नाही. एकदा माँटगोमरीला जाताना मजजवळ बंदूक होती. पण माझ्यासारख्या अहिंसात्मक चळवळीचे नेत्याला बंदूक बाळगण्याचा हक्क नाही, म्हणून मी ती टाकून दिली. माणूस किती वर्षे जगला यापेक्षा कसा जगला, याला आयुष्यात महत्त्व आहे. राष्ट्राचा आत्मा वाचविणाऱ्या चळवळीत तुम्हांला जिवाचे बलिदान करावे लागले, तर त्यापेक्षा अधिक उदात्त मरण असू शकणार नाही."

या आंतरिक सामर्थ्यामुळेच किंग निग्रोंचे नेते झाले आणि त्यांच्या उदात्त

नेतृत्वामुळे निग्रो चळवळीचा दर्जा उंचावला आहे.

## मतदान हक्कासाठी लढा

गेल्या दहा वर्षांत निग्रोंनी अनेक हक्क मिळविले, पण मतदानाचा मूलभूत हक्क त्यांना अमेरिकेत अजून अनेक राज्यांत नाकारण्यात आला आहे. डॉ. किंग यांनी या मागणीवर अलीकडे आपला लढा केंद्रित केला आहे. अलबामा ही या चळवळीची मुख्य रणभूमी असली तरी अमेरिकेच्या अनेक शहरांतून निदर्शने झाली.

अलबामा राज्यात सेल्मा येथे झालेली निदर्शने आणि ती मोडण्यासाठी झालेली दडपशाही यांनी साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले. साडेएकोणतीस हजार वस्तीच्या या शहरात १५,१०० म्हणजे निम्म्यापेक्षा अधिक निग्रो व १४,४०० गोरे आहेत. पण मतदारयाद्यांत मात्र फक्त एक टक्का निग्रोंची नावे नोंदलेली आहेत. "कोणताही निग्रो शहरातील रस्त्यावरून सिगार किंवा पाइप ओढीत किंवा हातात काठी घेऊन जाताना दिसला, तर त्याला ३९ फटक्यांची शिक्षा मिळेळ," असा हुकूम १८५२ साली सेलमामध्ये जारी होता. त्या परिस्थितीत आजही फारसा फरक पडलेला नाही. सेल्मामधील सात आठवड्यांच्या चळवळीत दोन हजार निग्रो तुरुंगात गेले. सेल्मापासून जवळच असलेल्या मेरियन येथे चारशे निग्रोंवर लष्कराने गोळीबार केला. त्यात जिमी ली जॅक्सन हा निग्रो तरुण ठार झाला. या दडपशाहीचें निषेधार्थ डॉ. किंग यांनी सेल्मा ते मॉंटगोमरीपर्यंत ५० मैलांचा मोर्चा काढला. मोर्चाचे सुरुवातीस अनुयायांपुढे केलेल्या भाषणात ते म्हणाले, "तुम्हांला मार बसणार नाही. तुमच्या घरावर बॉंब पडणार नाही. तुम्हांला थोडीही इजा होणार नाही, असे आश्वासन मी देऊ शकत नाही. पण जे न्याय्य आहे, त्यासाठी आपण झगडले पाहिजे."

## अध्यक्ष जॉन्सन यांची सहानुभूती

अलबामा नदीवरचा पूल ओलांडून मोर्चा 'हायवे ८०' या हमरस्त्याला लागला आणि साठ सैनिकांनी त्यांचा मार्ग रोखला. निदर्शकांना परत जाण्यासाठी दोन मिनिटांचा अवधी दिला, पण निदर्शक मागे फिरले नाहीत, तेव्हा सैनिकांनी त्यांच्यावर दंडुक्यांनी हल्ला केला. अश्रुवायूंचा मारा केला. पळणाऱ्या निग्रोंचा घोडेस्वार सैनिकांनी हातात चाबूक घेऊन पाठलाग केला. काही निदर्शक घोड्यांच्या टाचांखाली चिरडले गेले. हॉस्पिटलात ७८ जणांना दाखल करण्यात आले.

या दडपशाहीच्या निषेधार्थ अमेरिकेत अनेक ठिकाणी उत्स्फूर्त निदर्शने झाली. डेट्रॉइट येथे दहा हजार लोकांनी मोर्चा काढला. शिकागो, वॉशिंग्टन, कॅलिफोर्निया, विस्कोन्सिन, कनेक्टिकट व न्यूयॉर्क येथेही अशीच निदर्शने झाली. डॉ. किंग यांनी सेल्मा ते मॉंटगोमरीपर्यंत दुसरा मोर्चा काढण्याचे जाहीर केले. सेल्मा येथे झालेले अत्याचार व दडपशाहीचा अध्यक्ष जॉन्सन यांनी कडक निषेध केला. निदर्शकांना संरक्षण देणे अलबामाचे गव्हर्नरांना शक्य नसेल, तर फेडरल सरकारचे नॅशनल गार्ड

त्यांचे संरक्षण करतील, असे त्यांनी जाहीर केले. कोणत्याही अडचणी न येता निग्रोंना मतदार म्हणून आपली नावे नोंदता यावीत, अशी तरतूद करणारे नवे बिल आपण काँग्रेसकडे लागलीच पाठविणार असल्याचेही त्यांनी घोषित केले.

## गोऱ्या महिलेचा बळी

मोर्चाच्या शेवटच्या दिवशी २५ मार्चला मिसेस व्हायोला ग्रेग लुझो ही गोरी महिला वर्णद्वेष्टयांच्या हल्ल्यास बळी पडली. मोर्चाच्या वाहतूक समितीची ती कार्य-कर्ती होती. माँटगोमरीस आलेल्या काही निदर्शकांना आपल्या मोटारीतून सेलमा येथे पोचवून ती परत येत असता तिचा पाठलाग करणाऱ्या दुसऱ्या एका मोटारी-तून तिच्यावर गोळी झाडण्यात आली आणि ती महिला ठार झाली. या खुनाबद्दल 'कूक्लक्स क्लॅन' संघटनेच्या चौघांना अटक करण्यात आली. कट्टर निग्रोद्वेष्टयांची ही दहशतवादी संघटना आहे. तिच्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी कडक उपाय योजण्यात येतील, असे अध्यक्ष जॉन्सन यांनी जाहीर केले.

## कायद्याने प्रश्न सुटणार नाही

निग्रोंचा लढा मानवी वांशिक-समतेच्या प्रस्थापनेचा लढा आहे. निग्रोंना सर्व बाबतीत गोऱ्यांच्या बरोबरीने समानतेची वागणूक मिळाली पाहिजे, अशी तरतूद करणारे कायदे पास होतील, पण केवळ कायद्याने हा प्रश्न सुटत नाही. केवळ वर्ण काळा म्हणून एका सबंध जमातीची अवहेलना करणे मानवधर्माविरुद्ध, माणुसकीला सोडून आहे, ही जाणीव वाढेल तेव्हाच हे भेद नष्ट होतील. आपल्याकडे अस्पृश्यता निवारण्याच्या बाबतीतही असाच अनुभव येत आहे. अध्यक्ष जॉन्सन यांचे ठाम धोरण लक्षात घेता निग्रोंना समान हक्क देण्याच्या बाबतीतील कायद्यांच्या अडचणी तरी लौकरच दूर होतील, असे दिसते, पण कायद्यापेक्षाही अखेर लोकजागृतीनेच हा प्रश्न सुटणार आहे.

## लढ्याला उदात्त स्वरूप दिले

डॉ. किंग यांना गेल्या वर्षी नोबेल शांतता पारितोषक मिळाले. निग्रोंच्या हक्का-साठी अहिंसात्मक प्रतिकाराच्या मार्गाने त्यांनी चालविलेल्या लढ्याचाच हा गौरव होता. काही निग्रोंना त्यांचे मार्ग सौम्य वाटतात, पण निग्रोंच्या लढ्यातील त्यांचे थोर कार्य कोणालाही नाकारता येणार नाही. गोरे विरुद्ध निग्रो असे या लढ्याचे जातीय स्वरूप बदलून मानवी समतेच्या लढ्याचे उदात्त स्वरूप डॉ. किंग यांनी त्यास दिले व गोऱ्यांनाही निग्रोंच्या बाजूने लढ्यात सामील करून घेतले, हे किंग यांचे सर्वांत मोठे कार्य होय.

□

# □ निग्रोंच्या लढ्याची दोन पर्वे

## १ : गुलामगिरीविरुद्ध लढा

निग्रोंच्या चळवळीचे मुख्यतः दोन टप्पे पाडता येतील. एक गुलामगिरीविरुद्ध लढा आणि दुसरा समान हक्कांसाठी लढा. अमेरिकेत वसाहतीसाठी आलेल्या गोऱ्यांनी प्रथम रेडइंडियन लोकांना गुलाम केले, पण ते नेहमी आजारी पडत. त्यांना पाहिजे तसे राबविता येईना. काही गोऱ्या नोकरांनाही गुलाम करण्यात आले, पण ते पळून जात व गोऱ्या जमातीत मिसळल्यावर ओळखू येत नसत. प्रकृतीने घडधाकट आणि पळून गेला तरी काळ्या वर्णामुळे सहज ओळखू येईल, अशी एकच जमात म्हणजे निग्रोंची होती. गुलाम म्हणून त्यांची मोठ्या प्रमाणावर भरती गोऱ्यांनी सुरू केली, पण निग्रो गुलामही अधूनमधून बंड करून उठत होते. यादवी युद्धापूर्वी अमेरिकेत निग्रो गुलामांची २५० बंडे झाली. व्हर्जीनियात १८३१ साली ६० गोऱ्यांची कत्तल करण्यात आली. १८१० ते १८६० चे दरम्यान एक लाख निग्रो गुलाम दास्यातून मुक्त होण्यासाठी दक्षिणेतून उत्तरेकडे पळाले. बाकीच्यांनी निषेधाचे दुसरे मार्ग अवलंबिले. आजारी पडायचे, नांगर व वॅगन यांची मोडतोड करून 'अपघात झाला', असे दाखवायचे. लगाम घट्ट खेचावयाचा नाही आणि आपल्या धन्याला गाडीतून आपटी खायला लावायची अशा तंत्रांचा अवलंब निग्रो गुलाम करीत. यादवी युद्धाने निग्रोंना गुलामगिरीतून मुक्त केले आणि त्यांच्या लढ्याचे एक पर्व संपले.

## २ : समान हक्कांची मागणी

निग्रोंनी रेल्वे गाड्यांत गोऱ्यांच्या शेजारी न बसता निराळ्या डब्यात बसले पाहिजे, असा कायदा टेनेसी विधिमंडळाने १८८१ साली पास केला. निग्रोंविरुद्ध हा पहिला पक्षपाती कायदा. दक्षिणेतल्या इतर राज्यांनी नंतर आणखी जाचक कायदे केले. गेली काही वर्षे निग्रो ज्या कायद्यांविरुद्ध झगडत आहेत, ते सारे १९१० पर्यंत पास झालेले आहेत.

## संघटनेचे पहिले प्रयत्न

निग्रोंच्या हक्कांसाठी संघटित चळवळीचे प्रयत्न विसाव्या शतकाचे सुरवातीस सुरू झाले. निग्रो अ‍ॅकॅडेमीचे संस्थापक डॉ. विल्यम ई. बी डु. बॉइस यांनी एक गट संघटित केला. त्याची पहिली बैठक १९०५ साली नायगारा धबधब्याजवळ झाली, म्हणून नायगारा मुव्हमेंट या नावानेच हा गट ओळखला जाऊ लागला. त्याच्या पहिल्या सभेत भाषण करताना डॉ. डु. बॉइस म्हणाले, "प्रत्येक स्वतंत्र अमेरिकनास जे राजकीय, नागरी व सामाजिक हक्क आहेत ते सर्व आम्हांला मिळाले पाहिजेत. ते मिळेपर्यंत आमचा झगडा थांबणार नाही. अमेरिकेच्या कानावर तिच्या

लज्जास्पद कृत्यांची कथा आम्ही सारखी ऐकवीत राहू."

न्यूयार्क इव्हिनिंग पोस्ट पत्राच्या वार्ताहर मेरी व्हाईट ओव्हिंग्टन या गोऱ्या महिलेने वरील भाषणाचा वृत्तांत आपल्या पत्रास पाठविला, पण तेवढ्यावर स्वस्थ न बसता निग्रोंच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी निग्रो व उदारमतवादी गोरे यांची एक परिषद बोलवण्याची कल्पना तिने मांडली, त्यातूनच १९०९ साली नॅशनल असोसिएशन ऑफ दि ॲडव्हान्समेंट ऑफ दि कलर्ड पीपल (एन. ए. ए. सी. पी.) ही संघटना जन्मास आली.

**पाच क्षेत्रांत अन्याय**

मतदान हक्क, शिक्षण, नोकऱ्या, घरे व सार्वजनिक ठिकाणे या पाच क्षेत्रांत निग्रोंवर अन्याय होत आहेत.

**मतदान हक्क :** निग्रोंचा लढा सध्या मुख्यत: मतदान हक्कावर केंद्रित झालेला आहे. दक्षिणेतील राज्यांतून वीस लाख निग्रो मतदारांपैकी फक्त २९ टक्के निग्रोंची नावे मतदारयाद्यांतून आहेत. अध्यक्ष जॉन्सन यांच्या नव्या बिलाने याबाबतीतल्या सर्व अडचणी दूर होतील अशी आशा आहे.

**शिक्षण :** शाळा–कॉलेजांतील वर्णभेद १९५४ साली सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाने रद्द झाला, पण याबाबतीत प्रत्यक्ष प्रगती गोगलगाईच्याच गतीने आहे. दक्षिणेतील सतरा राज्यात गोऱ्यांच्या बरोबरीने शाळांत जाणाऱ्या निग्रो मुलांची संख्या फक्त ७·९ टक्के आहे.

**नोकऱ्या :** निग्रोंना मिळणाऱ्या पक्षपाती वागणुकीचे तिसरे मोठे क्षेत्र म्हणजे नोकऱ्यांचे. निग्रो कुटुंबाचे सरासरी उत्पन्न दहा वर्षांपूर्वी गोऱ्या कुटुंबांच्या सरासरी उत्पन्नाच्या ५७ टक्के होते, ते दहा वर्षांत वाढण्याऐवजी ५३ टक्क्यांपर्यंत खाली गेले. बेकार निग्रोंचे प्रमाण १०·७ टक्के म्हणजे गोऱ्यांच्या दुप्पट आहे. तांत्रिक कसब असले तरी गोऱ्यांच्या बरोबरीने नोकऱ्या निग्रोंना मिळत नाहीत. फिलाडेल्फिया, न्यूयॉर्क, शिकागो वगैरे शहरांत बांधकामे चालू असलेल्या ठिकाणी निग्रोंनी निदर्शने करून पंचवीस टक्के जागा निग्रो कामगारांना मिळाल्या पाहिजेत अशी मागणी दोन वर्षांपूर्वी केली. निग्रो नेते रॉय विल्किन्स यांनी या मागणीला विरोध केला. ते म्हणाले, 'गोऱ्या व्यक्तीची नोकरी काढून घेऊन निग्रोस द्यावी, हे आम्हांला मान्य नाही.' अध्यक्ष केनेडींनीही या मागणीस विरोध करताना असे मत व्यक्त केले होते, की आपला समाज आता एवढा संमिश्र आहे की वंश किंवा वर्णाच्या पायावर विभागणी करता येणार नाही.

**घरे :** पक्षपाताचे चौथे क्षेत्र राहण्याच्या जागांचे. निग्रोंना गलिच्छ वस्तीतून राहावे लागते. गोऱ्यांच्या वस्तीनजीक त्यांना जागा मिळणे कठीण जाते. शिकागोजवळच्या २५३ उपनगरांपैकी फक्त २२ उपनगरांत शंभरपेक्षा अधिक निग्रो रहिवासी आहेत. कालिफोर्नियामध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर बांधलेल्या घरांपैकी फक्त दोन टक्के घरे

नग्रोंना उपलब्ध आहेत. सरकारी मदतीने बांधलेल्या घरांची विक्री करताना निग्रो आणि गोरे असा पक्षपात करण्यास बंदी करणारा हुकूम अध्यक्ष केनेडींनी काढला होता. पण त्यामुळे प्रत्यक्ष परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. जवळपास निग्रोंची वस्ती असेल, तर घरांच्या किंमती घसरतात, असा समज अजूनही अनेक गोऱ्यांमध्ये प्रचलित असून, त्यामुळे निग्रोंना जागा देण्यास प्रतिबंध केला जातो. एरवी निग्रोंच्या समान हक्कांचा पुरस्कार करणाऱ्या गोऱ्यांचे बाबतीतसुद्धा ध्येयवादावर व्यवहार मात करतो.

**सार्वजनिक ठिकाणे :** सार्वजनिक उपाहारगृहे, उद्याने वगैरे ठिकाणचा वर्णभेद हे निग्रोविषयक भेदभावाचे पाचवे मोठे क्षेत्र. "समोर उद्यानात मुले खेळताना दिसावी, पण आपणाला तेथे प्रवेश नाही, असे कळल्यावर कोवळ्या निग्रो मुलांच्या मनावर काय आघात होत असेल ?" अशा शब्दांत एका निग्रो नेत्याने या अन्यायाला वाचा फोडली आहे.

□

# 'पेन' चा फटकारा

'राहायला जागा मिळण्याचे बाबतीत गोरे व निग्रो असा जो भेदभाव केला जातो, तो मी पेनच्या एका फटकाऱ्याने दूर करीन', असे आश्वासन निवडणुकीपूर्वी केलेल्या एका भाषणात अमेरिकेचे दिवंगत अध्यक्ष केनेडी यांनी दिले होते, पण अधिकारावर आल्यावर त्यांनी याबाबतीत काहीच हालचाल केलेली दिसली नाही. तेव्हा त्यांना आपल्या आश्वासनाची आठवण करून देण्यासाठी निग्रोंनी एक अभिनव मार्ग अवलंबिला. तुमचा पेनचा फटकारा केवळ पेन नाही, म्हणून अडला आहे काय, तसे असेल तर हे घ्या पेन, असे म्हणून निग्रोंनी हजारो फाउंटनपेन्स केनेडींकडे पोस्टाने पाठविली. यानंतर केनेडींनी घरांच्या बाबतीतला पक्षपात दूर करण्यासाठी एक हुकूम काढला, पण त्याची व्याप्ती एवढी मर्यादित होती, की ज्यामुळे निग्रोंची निराशा झाली.

निग्रोंच्या छळाचा सर्वांत अमानुष प्रकार म्हणजे लिंचिंग. निग्रोंना वाटेल तशी मारहाण करून व त्यांचे हाल करून ठार करण्यात येई 'लिंचिंग' हा नुसता शब्द ऐकला की भीतीने निग्रोंच्या उरात धडकी भरे. जॉर्जिया राज्यात व्हालडोस्ता येथे एका मळयाचे मालकाचा खून झाला होता. खुनी सापडेना तेव्हा गोऱ्यांच्या एका जमावाने तीन निरपराध निग्रोंना लिंचिंग करून ठार केले. त्यांतील एका निग्रोची गर्भवती पत्नी मोठयाने आकांत करू लागली. तेव्हा जमावाने तिलाही जिवंत जाळले. हे झाले एका लिंचिंगचे वर्णन. असे अंगावर शहारे आणणारे व माणुसकीला काळिमा लावणारे प्रकार अनेक ठिकाणी घडत.

'नॅशनल असोसिएन फॉर दि ॲडव्हान्समेंट ऑफ दि कलर्ड पीपल' या संघटनेने लिंचिंग विरोधी मोहिमेवर लक्ष केंद्रित केले व या मोहिमेत लिंचिंगच्या प्रकारांना प्रसिद्धी देणे हे सर्वांत प्रभावी शस्त्र होते. या संघटनेचे प्रमुख वॉल्टर व्हाईट यांनी या बाबतीत फार मोठे कार्य केले. त्यांची स्वतःची वंशवेल पाहिली तर ते केवळ १।६४ निग्रो होते. त्यांना पाहून ते निग्रो आहेत, असे वाटणारही नाही, पण ते स्वतःला निग्रो म्हणवीत. लिंचिंग कोठे झाल्याचे समजले की गोरा वार्ताहर म्हणून तेथे प्रवेश मिळवायचा; अधिकाऱ्यांचा विश्वास संपादन करावयाचा आणि तेथून परतल्यावर त्या अमानुष कृत्याचे सविस्तर वर्णन प्रसिद्ध करावयाचे हा त्यांचा ठरलेला क्रम असे.

फेडरल सरकारने कायदा करून लिंचिंगला बंदी करावी हा या संघटनेचा मुख्य उद्देश साध्य झाला नसला, तरी या रानटी प्रकारा-

## --- लिंचिंग



विरुद्ध गोऱ्यांची सदसद्विवेकबुद्धी जागृत करण्यात तिने यश मिळविले आणि लिंचिगचे प्रकार हळूहळू कमी होऊ लागले. १९२१ साली ६४, १९३३ साली २८, १९४० साली ५ याप्रमाणे प्रमाण घटत गेले आणि १९५२ साली अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच एकही लिंचिग घडले नाही. निग्रोंच्या घरांवर बॉंब टाकणे, त्यांचा खून करणे असे प्रकार अजून घडत असले, तरी लिंचिग आता बंद झाले आहे. मिसिसिपीमध्ये मॅक चार्लस या निग्रोला १९५९ मध्ये लिंचिग पद्धतीने ठार केले, ते शेवटचे लिंचिग. निग्रो नेते रॉय विल्किन्स म्हणतात, "लिंचिगबद्दल देशातील लोकमत आम्ही पूर्णपणे बदलून टाकले आहे. एके काळी सिनेटमध्ये त्याचे समर्थन केले जात असे. ज्या भीतीच्या वातावरणात आम्ही दिवस काढले, त्याला तुलना नाही." ● ● ●

□ □ □ □

उंबरठ्यावरले माप उलथून ती आत आली. तिने मागे वळून पाहिले. तिथे उंबरठाच नव्हता.

# एक दिवस शृंगाराचा



लेखक
प. त्रि. सहस्रबुद्धे

कुणी तरी येत असल्याचा भास झाला म्हणून मी दाराकडे बघितलं. तोच दारात नखशिखांत नटलेली मीना दृष्टीस पडताच मी स्तिमित झालो. तिच्यातला एकाएकी झालेला हा बदल ध्यानात येऊन अधिकच बुचकळयात पडलो. असं काय घडून आलं म्हणून ही इतकी नटली असावी ? अशा कसल्या चांगल्या वातमीनं हिच्या सर्वांगावर ताजेपणाची टवटवी एकाएकी बहरली असावी ?...



काहीचं समजेना...आज सकाळी ती किती साध्या पोशाखात होती. फिकट निळचा रंगाचं बिनकाठाचं पातळ काहीशा विस्कळीत भावनेनंच ती नेसली होती. त्याला साजेसं पोलकं, साधेपणा उठून दाखवणारी केसांची ठेवण. गळा जवळजवळ रिकामा, मनगटावरचं नेहमीचं घडयाळदेखील नव्हतं. गर्द जांभळचा रंगाची प्लॅस्टिकची बॅग हातात. एका हातात एक दोनच बांगडचा, त्याही हिरवट रंगाच्या. पोशाख करताना रंगसंगतीचा तिनं जणू विचारच केला नव्हता.

सकाळी ती मुकाटचानं आली. मस्टरवर सही करून आपल्या जागेवर बसली नि शून्य मनानं खिडकीबाहेर पाहात बसून राहिली. इतर लोक कामाला लागले. त्यांची हालचाल ध्यानात आल्यावरोबर ती किंचित दचकली. आपण स्वस्थच बसलो आहो हे कुणाच्या ध्यानात तर आलं नसेल ना ? अशा काळजीनं तिनं पेन उघडलं नि कामात दंग झाली.

छे...... तिचं कामात आज लक्षच नव्हतं. कागद हाताळत होती. फायली चाळत होती. कशावरच तिचं लक्ष स्थिरावत नव्हतं. तिची ही अस्वस्थता माझ्या केव्हाच ध्यानात आली. तिला बोलवून काही विचारावं असाही धीर होईना. माझ्या हाताखाली सात-आठ

☐ ☐ ☐ ☐

माणसं. त्यांतली ती एक. जोपर्यंत कामाच्या बाबतीत कुचराई होत नाही. तोपर्यंत त्यांच्या व्यक्तिगत जीवनाची शोधाशोध करण्याचं मला काय कारण ? यंत्राप्रमाणं सगळेजण आपापली कामं करीत होते. त्यांच्या वागणुकीत चढ-उतार असे मासतच नव्हते. कचेरीच्या वेळात खाली मान घालून काम करण्यातच प्रत्येकजण दंग असायचा. क्वचित विनोदाची कारंजी उडत. नीरस झालेल्या मनात ओलावा उत्पन्न करीत. रोज ठराविक वेळी येणं-जाणं. ठराविक पोशाख. ठराविक गप्पा. जीवनरस आटवणाऱ्या, उबग आणणाऱ्या. अशावेळी कुणी तरी चहाचिवडा कसल्या तरी कारणानं देई किंवा कुणाला तरी द्यायला लावी. पगारवाढ मिळाली, मुलगा झाला, मुलाचा वाढदिवस उगवला, कुणी पास झालं...... काही कारण झालं की चहाची मागणी केली जाई. ती पुरवली जाताना क्षणिक मोकळेपणाच्या आहारी सारेजण जात. कपबशा रिकाम्या झाल्या की पुन्हा कामाच्या ढिगाऱ्याकडे हात वळत. घाण्याभोवती फिरता फिरता बैल थकतो, थांबतो, पुन्हा फिरू लागतो; तसंच त्यांचं होई. हे सारं माझ्यादेखील अंगवळणी पडलं होतं. त्यात निराळेपणा किंवा नवीनपणा कधीच प्रत्ययाला येत नसे नि असंच हे चालत राहणार होतं वर्षानुवर्षे......

पण मीना आल्याबरोबर एकाएकी सारंच बदलल्यासारखं झालं. तिचा निराळे-पणा मनाला सारखा बजावू लागला—'मीना...... कारकुनी करण्यासाठीच या कचेरीत आली. इतरांप्रमाणे पगारासाठीच तीही नोकरी करणार हे खरं, पण तिचं व्यक्तिमत्त्व वेगळं आहे. निराळेपणानं उठून दिसणारं आहे......'

तिच्या स्वभावाच्या, वागणुकीच्या, बोलण्याच्या, साध्यासुध्या हालचालींच्या बारीकसारीक छटा टिपून घऊ लागलो......

तिच्या इतर वागणुकीतील निराळेपणा मला सारखा स्पष्ट होत होता. तिचं साधं बोलणंही छाप पाडणार होतं. कुणी म्हणत ती नाटकांत कामं करीत असे. रेडिओवरच्या श्रुतिकांतून नेहमीच भाग घेई. कोकणी कार्यक्रमांतून तिला खूपच संधी मिळे. यांमुळे वाक्याचा शेवटचा शब्द थोडा लांबट करून ती बोले. 'खरंच' म्हणायचं झालं तरी 'खरंऽऽऽच' असे म्हणे. लाडिकपणा शब्दाशब्दांतून प्रत्ययाला येई. तिचे बदामी आकाराचे मोठे डोळे फारच बोलके होते. मनातील सुखदुःखांचे चढ-उतार त्यातून सहज उघड होत. तिचं अक्षरदेखील स्वभावाप्रमाणंच रेखीव होतं. त्यात तिच्या अंगचा रेखीवपणा, संथपणा नि लाडिकपणा सहज आढळे. खात्यातलं कंटाळवाणं काम करतानादेखील ती असं काही एखादं वाक्य गोडव्याने बोले की उबगलेली बाकीची मनं टवटवीत होत, उमलत, फुलून जात......

पण यापेक्षाही तिचं वैशिष्ट्य आढळलं ते निराळ्याच बाबतीत. कचेरीत खूप मुली होत्या. त्यांत अनेक प्रकारच्या होत्या. साध्यासुध्या, नटणाऱ्या, अंगोपांगांचं प्रदर्शन मांडणाऱ्या, सरळ वागणाऱ्या, तिरकस पाहणाऱ्या, सहकाऱ्यांना वेड

लावणाऱ्या; पण त्या वैचित्र्यांतही एक संगती होती. अमुक एक मुलगी फार साधी आहे, नटवी आहे, फार लबाड आहे...... असं काही निश्चयानं म्हणता येत होतं. साधा पोशाख करणारी नेहमी साधीच असे. तिच्यात नटवेपणा आढळायचा नाही. तलम कपडे वापरून सौंदर्याचं उघड प्रदर्शन करणाऱ्या नेहमी तशाच पोशाखात येत. विशिष्ट प्रकारची अद्ययावत केशभूषा करणारी नेहमी तशीच आढळायची. दोन वेण्या घालून एकीवर मोगऱ्याच्या कळ्यांचा किंवा इतर फुलांचा गजरा घालणारी नेहमी तशीच दिसायची. पण मीनेचं मात्र अगदीच निराळं होतं. हा वेगळेपणा इतका होता की माझ्या ध्यानात यायला वेळ लागला नाही.

एखाद दिवशी तिचा पोशाख अगदी साधा असायचा. स्वच्छ शुभ्र पातळ. काहीसं बेपर्वाइनं अंगाभोवती लपेटलेलं. चालणंही मंद मंद. बोलणं मोजकं. विचारलेल्या प्रश्नाखेरीज तोंड उघडलं जायचं नाही. उत्तरासाठी शब्द बाहेर पडले तरी मोजके, तेही सहजतेनं उच्चारलेले. हातात असली तर एखादी बांगडी. मनगटावरचं घड्याळही सैलसं बांधलेलं. अशा पोशाखात ती आली की सबंध दिवस विचित्र स्वस्थतेत जाई. मधुर हास्यानं आसपासचं वातावरणही धुंद करणारी ती सबंध दिवस कसल्या तरी विचारात घालवी. तिच्याकडे पाहताच वाटे, हिच्या मनावर कसलं तरी फार मोठं दडपण पडलेले आहे. ते पेलता पेलता बिचारं पार थकून गेलं आहे. केव्हा मनात येई, कुणाची तरी उत्कंठेनं वाट पाहणाऱ्या व्यक्तीची ओढ हिला लागली आहे. क्षणाक्षणाला हिचं मन कसल्यातरी अपेक्षेनं अस्वस्थ होतं आहे. निराशा पदरी पडून अधिक खचतं आहे. काम करता करता ती मध्येच स्तब्ध होई. वरच्या फिरणाऱ्या पंख्याकडे सारखी टक लावून बसे. मध्येच खिडकीबाहेर दृष्टी लावी. दूर कुठे तरी टक लावून पाही. थोड्या वेळानं आपण कुठे आहो याची जाणीव होऊन की काय ती सावध होई नि कामाला लागे. पण अधिक खचून जाऊन. अधिक विमनस्क होऊन. अधिक कष्टी होऊन...

नि अशा वेळी तिच्या कामातदेखील चुका होत. एरवी ती चांगलं काम करणारी म्हणून प्रसिद्ध, पण साध्या पोशाखात असली की दिवसभर ती अस्वस्थ असायची. खरं म्हणजे पोशाख हा तिच्या मनातील दुःखाचा आविष्कार होता. साहजिकच अस्वस्थ मनानं कितीही काम केलं तरी त्यात चुका होणारच. अशा चुका माझ्याकडे कागद आले की ध्यानात येत. प्रथम प्रथम मलाही राग यायचा. तिच्यासारख्या मुलीनं साध्यासुध्या चुका कराव्या म्हणजे काय? पण हळूहळू चुकांचं मूळ माझ्या ध्यानात आलं. मनाची अस्वस्थता हेच खरं कारण. मला चुका आढळल्या की राग येईनासा झाला. उलट अस्वस्थ मनानं स्थिरचित्त झालेली ती पाहताच माझं मन करुणेनं भरून येऊ लागलं. पगार मिळवणारी, नोकरी करून स्वावलंबी झालेल्या या मुलीला असं कोणतं दुःख पोळीत असावं बरं?... कसली खंत हिला वाटत असावी बरं? कुणाची प्रतीक्षा करण्यात हिचं मन गुरफटलेलं

असावं बरं ?... प्रश्न मनात उभा राही, पण उत्तर मात्र मिळत नसे नि मनातली उत्कंठा तशीच वाढत राही.

एखादा दिवस असा काही उगवे की या उत्कंठेला निराळेच फाटे फुटत. साधे–पणानं येणारी मीना अचानक एखाद दिवशी नखशिखांत नटून येई. अद्ययावत तलम पातळ, रंगसंगती साधणारं पोलकं, कर्णफुलं, कुंकू, लाडिकपणानं भुरभुरणारे रेशमी कुंतल, पदराची सारखी चाळवाचाळव, सारंच निराळं असे. ज्यानं साध्या पोशाखात तिला पाहिली असेल त्याला नटव्या पोशाखात तिला पाहताच ओळख पटणं कठीण जाई. केशरचनेत आकर्षकपणा; रंगवलेली नखं; गालावर गुलाबी रंगाच्या कलात्मकतेनं उठवलेल्या छटा; ओठावरदेखील पाहणाऱ्याला वेड लावील; असा अस्पष्ट रंगाचा हात फिरवलेला; डोळ्यांत काजळ घातलेलं; पापण्यादेखील स्पष्टपणानं काळेभोरपणा प्रतीत करणाऱ्या. अशा वेळी तिच्या चालण्यात गती भासे. वागण्यात लाडिकपणा आढळे नि बोलण्यात तर असा काही गोडवा उघड होई की ऐकणाऱ्याला गोंधळल्यासारखं व्हावं. अशाच वेळी शेवटचा शब्द लांब करून लाडिक स्वरात उच्चारी. श्रुतिकांतून कामं करताना बोलण्याच्या बाबतीत जे संस्कार केले जात होते, ते सारे अशा वेळी जाणवत. तिच्या शब्दाशब्दांतून ओढ लावणारा भाव, मोह घालणारा गोडवा, स्वैर मनानं उंच भरारी मारण्यासाठी केलेली तयारी प्रत्ययाला येई. एरवी कसल्या तरी निराशेनं ग्रासलेलं तिचं मन सुखाच्या समीपतेची जाणीव होऊन उल्हासित झालेलं भासे. प्रीतीनं रसरसलेली दृष्टी; सुखाच्या ओढीनं उत्कंठित झालेलं अंतःकरण; आत्मसमर्पणासाठी आसुसलेलं शरीर......

छे...अशा वेळी ती अगदीच निराळी दिसे.

तिच्या वागणुकीतल्या या दोन परस्परविरोधी तऱ्हा मला आता चांगल्या माहीत झाल्या होत्या. त्या जसजशा परिचित होऊ लागल्या, तसतसं माझं मन कुतूहलानं भरून येऊ लागलं. या मुलीच्या वागणुकीत अशी दोन टोकं का असावी. ही विसंगती का निर्माण व्हावी. निराशा नि आशा–दुःख नि सुख, यांच्या द्वंद्वात कोण गुरफटून जात नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात ती असतात. क्षणिक आशा-निराशा उसळते. पुन्हा माणूस मार्गाला लागतो. पण दुःख आत्यंतिक उत्कटतेनं हिच्या सर्व वागणुकीवर परिणाम करतं. तसंच सुखही अनन्यसाधारण फरक करतं. हे असं का ? असं कोणतं कारण हिला निराशेच्या खोल खोल दरीत भिरकावून देतं ? किंवा कधी आशेच्या उत्तुंग शिखरावर नेऊन बसवतं ? वागणुकीतली ही दोन टोकं कशामुळे उत्पन्न होतात ?......

तिच्या वागणुकीतल्या दोन परस्परविरोधी छटा जितक्या अधिक वेळा प्रत्ययाला येऊ लागल्या, तितकं माझं कुतूहल वाढतच चाललं. मला पुन्हा पुन्हा अस्वस्थ करू लागलं. त्या दिवशी तर माझं कुतूहल अगदी शिगेस पोचलं.

सकाळी ती साध्या पोशाखात होती. खिन्न होती. मलूल होती. अबोल होती.

दुपारी एकच्या सुमारास तिनं थोडं बाहेर जाऊन येण्याची परवानगी मागितली. मी दिली. नंतर आता तासभरानं ती परत आली, ती एकदम नखशिखांत नटलेली. सकाळचा मलूलपणा, निराशा...सगळं कुठच्या कुठे गेलं. मी स्तिमित होऊनच तिच्याकडे पाहात राहिलो. असं काय घडलं म्हणून ही इतकी नटली ? कोणतं सुखाचं टवटवीत फूल अचानक हाती लागलं म्हणून हिच्या तरुण मुखावर गुलाबी छटा पसरवणारं स्मित उजळलं ? कशामुळे ताजेपणाची टवटवी एकाएकी हिच्या मनात बहरली ?

वाढत्या कुतूहलानं मी स्तब्ध झालो, तिच्या हालचालीकडे पाहात राहिलो...... पण तिच्या एकाएकी उसळलेल्या आनंदाचा उगम समजेना...काही वेळाने तर मी अधिकच भांबावून गेलो......

दारातून चहाचे बरेचसे कप ताटात घेऊन हॉटेलचा मुलगा आला. त्यानं सर्वांपुढे चहाचे भरलेले पेले ठेवले. मीनाचा उल्हास व चहा यांचा काही संबंध असेल असं मनातही आलं नाही माझ्या. कुणाचं तरी काही चांगलं झालं असेल. त्यानं चहा वाटला असेल. नेहमीचाच हा परिपाठ. निराळं असं काय होतं ? काहीशा अलिप्तपणानंच मी कपबशी पुढे ओढली. गरम चहा बशीत ओतला, बशी तोंडाला लावता लावता शेजारी बसलेल्या गुप्तेंना विचारलं, " चहा कुणाचा बरं ? "

" नाडकर्णींनी दिलाय् चहा आज !" गुप्ते हसत हसत म्हणाले.

" नाडकर्णींनी ?...खरंच नाडकर्णींनी दिलाय् चहा ? "

" होय...त्यांचाच आहे चहा..."

" पण कशासाठी..."

" तेच तर त्या सांगत नाहीत. "

" सांगत नाहीत ?...जे सांगण्यासारखं नाही त्यासाठी चहा का कुणी वाटतं...?"

माझं म्हणण संपायच्या आतच गुप्त्यांनी कपबशी खाली ठेवली. मीनाकडे वळून ते म्हणाले, " बाई, चहा कशासाठी वाटलात ते कळायला हवाय् यांना...आता तरी सांगाल का ? "

वरिष्ठानं विचारल्यावर तरी मीना सांगेल, अशा विश्वासानं गुप्ते बोलले. मीनाच्या तोंडावर एकाएकी स्मित झळकलं. गुलाब फुलले. गंधानं वातावरण धुंद करू लागले. पण काय झालं कोण जाणे, ते एकदम पुन्हा मिटल्यासारखे झाले. स्मित अस्पष्ट झालं नि काहीच उत्तर न देता ती शून्यमनस्क झाली.

माझं कुतूहल अधिकच वाढलं. हा प्रकार काय आहे. आनंदानं ही मुलगी फुलली आहे, सर्वांना फुलवते आहे ! नि त्या आनंदाचं कारण मात्र सांगायचं टाळते आहे. का असं ?

" नाडकर्णी...जरा इकडे या बरं. " कपबशी खाली ठेवीत मी तिला हाक मारली. मीना उठली. पुन्हा खाली बसली. काहीच बोलायची तिची तयारी नसावी, पण

मग काय झालं कोण जाणे; ती पुन्हा उठली नि माझ्याकडे आली.

"नाडकर्णी...कसला हा चहा वाटलात? कळू तर द्याल आम्हांला? आनंद दुसऱ्यांना सांगितल्यानं वाढतो."

मी बोलत होतो, पण तिच्या चेहऱ्यावर फारसा काही फरक आढळला नाही. तिनं नीटसं उत्तर दिलं नाहीच, उलट कारुण्याची क्षीण छटा तिच्या बदामी टपोऱ्या डोळ्यांत तरळू लागली. उगीच नसत्या चवकशा करून आपण हिच्या आनंदात विरजण घालीत आहो, अशा समजुतीनं मी आग्रह धरला नाही. ती मुकाट्यानं परत आपल्या जागेवर गेली.

मन अधिक अस्वस्थ झालं. गूढ उकलण्याची उत्कंठा वाढली, पण मार्ग सापडेना. तिच्या आसपासच्या सहकाऱ्यांना काही माहीत नव्हतं. तिच्या वैयक्तिक जीवनातल्या समस्या त्यांच्या कानावर नव्हत्या. तरुण मुलींच्या, त्यांतही विवाहित मुलीच्या वैयक्तिक जीवनाच्या छटा कळणं इतकं सोपं कुठे होतं? उगीच चौकशी करण्याचा उत्साहही कुणाला होता? नि विचारल्यावर ती खरं सांगेल याची तरी खात्री कुठे होती? सरळ सरळ विचारल्यावर मोकळ्या मनानं सांगण्याचा मनाचा मोठेपणा तिच्याजवळ असेलच याची खात्री काय?...

हातात पेन धरून मी बसलो होतो. कागद चाळीत होतो. पण लक्ष मात्र होतं. मीना नाडकर्णीच्या हालचालीकडे. जागेवर पोचल्यावर ती पुन्हा उल्हासानं बोलू लागली. गोडव्या लाडिक स्वरानं उत्तरं देऊ लागली. मात्र मधूनमधून ती घड्याळाकडे बघत होती. खात्याच्या दाराकडे दृष्टी टाकीत होती...रोज जे होत नव्हतं ते आज होऊ लागलं होतं. मला पडलेलं गूढ सारखं वाढवीतच होतं.

थोड्या वेळानं खात्यातले सर्वजण दुसऱ्या चहाला बाहेर गेले. तिच्या माझ्यामध्ये आता कुणी नव्हतं. अस्वस्थ चित्तानं ती कागद चाळीत होती. घड्याळ बघत होती. दाराची चाहूल घेत होती.

माझ्या एकदम मनात येऊन गेलं; हिलाच सरळ सरळ विचारून मन मोकळं का करू नये? तिच्या विचित्र वागणुकीमुळे मनात ती असं का वागते, याचं गूढ उत्पन्न झालं आहे, ते तिलाच खुलासा विचारून का उकलू नये? खरंच, तसं करायला काय हरकत आहे? पण तिनं मन मोकळं केलंच नाही, कशाचा पत्ता लागू दिलाच नाही तर? पण प्रयत्न करायला काय हरकत आहे नि तो करायचाच झाला, तर आताचीच वेळ योग्य नाही का?

"नाडकर्णी, जरा इकडे या बरं." मनाचा निश्चय करून मी तिला हाक मारलीच. पहिल्यांदा तिनं हाक न ऐकल्यासारखं केलं. पुन्हा हाक मारल्यावर ती उठली नि काहीशा गोंधळलेल्या मनोवृत्तीनं माझ्याजवळ येऊन उभी राहिली.

"नाडकर्णी, तुमच्याशी थोडं खासगी बोलायचं आहे, पण नीट उत्तरं द्याल-का?"

"देईन की...नीट उत्तरं न द्यायला काय झालं ?"

"तसं नाही नाडकर्णी, प्रश्न असा आहे की आपण इथं एकत्र बसतो ते कामाच्या निमित्तानं. खासगी गोष्टी बोलायला वेळ तरी कुठे असतो ? शिवाय खासगी गोष्टीबद्दल बोललेलं प्रत्येकाला आवडेलं असं नाही. मी खासगी बोलायचं आहे म्हटलं खरं, पण विचकू नका. उत्तर द्यायला तुम्हाला संकोच वाटेल, असं मला काही विचारायचं नाही......"

"मग विचारा की......"

मी तिला पडलेलं गूढ स्पष्ट केलं. तिनंही अगदी शांत वृत्तीनं सारं ऐकलं. तिची उल्हसित वृत्ती हळूहळू मावळत होती. त्या ठिकाणी असहाय्यता व कारुण्य यांच्या गडद छटा उमटत होत्या. निच्यात ऐकता ऐकता होणारा हा बद्दल माझ्या दृष्टीतून सुटला नाही. त्यामुळे माझं कुतूहल अधिकच वाढलं. हे असं का होत आहे...? असंच का होत आहे ?

माझं बोलणं संपल्यावर ती क्षणभर स्वस्थ झाली. गळयातल्या मंगळसूत्राशी चाळा करीत शून्यदृष्टीनं पाहात राहिली. पाहता पाहता तिचे नेत्र आसवांनी भारावल्याचा मला भास झाला.

"जाऊ दे नाडकर्णी. विचारलेला प्रश्न विचारलाच नाही, असं समजा." तिच्या कोमेजू लागलेल्या आनंदाची जाणीव होताच मला वाईट वाटलं. सुखी मनाला दुःखाच्या प्रवाहात लोटून द्यायचं पाप आपण का करावं ?

संथपणानं ती मागे फिरली. ती शून्य मनानं पाहात राहिली.

थोडयाच वेळात तिनं पुन्हा घडयाळाकडे बघितलं. ती कसला तरी निश्चय केल्यासारखा अविर्भाव करीत एकदम उठली नि माझ्याजवळ येऊन उभी राहिली. खूप काहीतरी बोलण्यासाठी जणू ती आली होती. पण माझ्यासमोर येताच तिच्या तोंडातून शब्द उमटत नाहीसा झाला होता.

"नाडकर्णी, काय झालं बरं एकदम इथं येऊन उभा राह्यला. काही काम आहे का ?" तिचा धीर चेपावा, तिला बोलती करावी म्हणून मी विचारलं.

"तुम्हाला गूढ पडलं आहे असं तुम्ही आताच म्हटलंत. तसं तुम्हाला वाटावं यात नवल नाही. अगदी स्वाभाविक आहे ते. तुम्ही म्हणता तशी मी वागते खरीच, पण काय करू ? लग्न होऊन तीन वर्षं होत आली. तरीसुद्धा निश्चिंत मनानं आम्हाला एकत्र राहणं काही शक्य होत नाही. मी आईकडे. घरात भावाचा संसार. त्याची मुलंबाळं. ही सारी गर्दी वेडयावाकडया असलेल्या एका खोलीत. ते त्याच्या एका मित्राकडे राहतात. अशाच अडचणीत. कधी जमलं तर आम्ही भेटू शकतो, ते रस्त्यावर, एखाद्या हॉटेलात...नि ज्या दिवशी फिरती संपून ते यायचे आहेत, हे मला समजतं त्या दिवशी माझं मन मोहरतं. सारं दुःख बाजूला सारून मी सजते... पण मन मात्र सारखं आक्रोश करीत असतं हे–असंच जन्मभर चालणार का ? या

वियोगाला काही अंत नाही का ?...खरंच, तुम्हीच सांगा, कसं हे सहन करावं बरं ...?"

तिचे डोळे आसवांनी डबडबले. सुखासाठी आसुसलेल्या नेत्रांत एकाएकी व्याकुळतेची व्यथा पसरलेली दिसताच मला अत्यंत कीव आली. करुणेनं मन भरून गेलं माझं. तिचं दुःख निवारावं, दूर करावं, निदान त्याची झळ तिला लागणार नाही असा यत्न करावा, पण तिचं खरं दुःख सुखी संसाराला आवश्यक असणाऱ्या आसऱ्याचा अभाव. तो मी कसा मिळवून देणार ? तरी धीर करून म्हटलं, " नाडकर्णी, तुमच्या अडचणीबद्दल मला खरंच सहानभूती वाटते. तुम्हाला जागा मिळवून द्यायचा मी अवश्य प्रयत्न करीन बरं. निःशंक असा त्याबद्दल."


जागा मिळवणं म्हणजे उंबराचं फूल शोधून काढण्यासारखं, पण तिच्या मनावरची असमाधानाची झाकळ कमी करण्यासाठी मी काहीतरी बोललो इतकेच. अपेक्षेप्रमाणे ती एकदम निराळी भासू लागली. तिच्या मनानं धीर धरायला सुरवात केली.

"खरंच...खरंच पाहाल का जागा आमच्यासाठी ?" सारी आपुलकी डोळ्यांत आणून तिनं विचारलं.

" खरंच पाहीन...पण काय हो नाडकर्णी, आज सकाळी तुम्ही अगदी साध्या पोशाखात होता नि दुपारी मात्र नखशिखांत निराळा पोशाख करून नटलात हे असं का ?

" सांगू...आज दुपारी मला त्यांचं पत्र आलं. सहाला येणाऱ्या गाडीनं ते येणार आहेत. सहा वाजता मी त्यांना भेटणार आहे. मग चौपाटीवर खूप खूप वेळ त्यांच्याबरोबर फिरणार...राहायला जागा नसल्यानं, नाही तरी असाच तरंगता संसार आहे ना आमचा ? नि असाच राहायचा आहे तो जागा मिळेपर्यंत ! त्यातच आनंद मानला पाहिजे," मी काही बोलणार तोच तिनं एकदम स्वतःला सावरलं नि म्हटलं, " खरंच पावणेसहा झाले. जायलाच हवं मला..."

अत्यंत लगबगीनं ती निघाली. बाहेर पडली. जाताना माझी परवानगी घ्यायचीही तिला भान राहिलं नाही...





# जिन्याची पायरी

: लेखक :

**व्हीत्सो स्मिरनेस्की**

: अनुवाद :

**श्रीमती एस्. सेठी**

[ ' ह्या कथेचा माझ्याशी काय संबंध. ' असे म्हणणाऱ्यांना ही कथा अर्पण. ]

'तू कोण आहेस ?' सैतानाने त्याला विचारले.

"मी एक सामान्य कुळात जन्मलेला गरीब जीव आहे. जगातील सारे रंजलेगांजले जीव माझे सगेसोयरे आहेत. अरेरे, किती किळसवाणं हे जग आहे अन् ह्या जगात वावरणारे हे जीवही किती दुर्दैवी आहेत." त्या तरुणाने हाताच्या मुठी वळून, ताठ मानेने, सैतानाला उत्तर दिले.

तो तरुण जिन्याच्या तळच्या पायरीवर उभा होता. तो जिना उंचच उंच होता, संगमरवरी होता, गुलाबाच्या वेलींनी मंडित होता. पावसाच्या सरीनंतर, गढूळ पाण्याने भरलेल्या नदीवर येणाऱ्या लहरींप्रमाणे, हालअपेष्टांना गांजलेल्या जर्जर जमावाच्या कुजबुजीकडे, टक लावून पाहात तो उभा होता. हे सारे जीव अधिरे झाले होते, त्यांची चलबिचलता क्षणाक्षणाला वाढत चालली होती. काही वेळा त्यांचा संताप त्यांना अनावर होत होता. आपले सामर्थ्यहीन हात वर करीत ते

आपला संताप व्यक्त करीत होते. गगनाला भिडणाऱ्या घोषणा देत ते उभे होते. त्या आवाजाने सारे वातावरण दुमदुमे, हळूहळू पुन्हा नि:शब्द शांतता त्या जागी येई. तोफांचा गडगडाट मध्येच थांबावा, तशातला हा प्रकार असे. हळूहळू जमाव वाढत चालला होता. पिवळी धूळ तेवढ्यात उधळत आली. एकेक मोजून घ्यावी इतक्या स्पष्टपणे शिरस्त्राणे दिसू लागली. साऱ्या वातावरणात करडा रंग भरला. एक वृद्ध माणूस हळूहळू पुढे येत होता. आपले गमावलेले तारुण्य शोधीत असल्याप्रमाणे तो जमिनीकडे कलती मान करून खालच्या नजरेने चालला होता. त्याचा फाटका कोट आपल्या चिमुकल्या हातांनी पकडीत, एक अजाण बालिका त्या म्हाताऱ्याबरोबर चालली होती. अनवाणी पायांनी चाललेल्या त्या बालिकेचे डोळे, आकाशाप्रमाणे निळेनिळे होते. त्यांच्यामागून येत होता तो केवळ लोंढ्याप्रमाणे माणसांचा जमाव! त्यांचे कपडे फाटले होते, त्यांच्या अगदी चिंध्या चिंध्या झाल्या होत्या. हलक्या आवाजात शोकगीते गात चालत होते. त्यांच्यापैकी काहीजण शिट्ट्या वाजवीत होते, तर काहीजण खिशात हात घालून हसत–खिदळत होते. सारा वेड्यांचा बाजार!

"मी एका सामान्य कुळात जन्मलेला गरीब जीव आहे. जगातील सारे रंजलेगांजले जीव माझे सगेसोयरे आहेत. अरेरे, किती किळसवाणं हे जग आहे अन् ह्या जगात वावरणारे हे जीवही किती दुर्दैवी आहेत! अरे, वरच्या पायरीवरच्या तू, तुला....."

असं तो तरुण जोरात म्हणाला. ताठ मानेने व हाताच्या मुठी वळून तो संतापाने बोलत होता.

"वरच्या लोकांचा तू द्वेष करतोस. होय की नाही?" त्या सैतानानं तरुणाच्या बाजूला थोडे कलत, वरूनच विचारले.

"हो, हो. ह्या वरच्या राजपुत्रांवर व राजेरजवाड्यांवर, संधी लाभताच सूड उगविणार आहे मी! ह्या माझ्या बांधवांसाठी, मेणाप्रमाणे किकुटलेल्या ह्या माझ्या गणगोतांसाठी, मला त्या वरच्या खुशालचेंडूंची गठडी वळवायची आहे. माझ्या ह्या बांधवांचे शिव्याशाप म्हणजे त्यांना ग्रासणारा वडवानल ठरणार आहे. पाहा, त्यांच्या त्या उघड्यावाघड्या रक्तबंबाळ शरीराकडे! ऐक जरा त्यांच्या आर्त किंकाळ्या! त्यांच्या वतीने मला सूड उगवायचाय्! बाजूला सरक, मला वर जाऊ दे." तो तरुण त्वेषानं, संतापानं म्हणाला.

त्यावर तो सैतान केवळ हसला व म्हणाला, "मी त्या लोकांचा संरक्षक आहे. मला काही तरी लाच दिलीस तरच मी तुला वश होईन."

"माझ्याजवळ कुठलं सोनंनाणं? लाच म्हणून देण्यासारखं माझ्याजवळ काही नाही...मी करंटा आहे. माझं फक्त फुकाचं तारुण्य...फार तर विनम्र माथ्यानं मी तुला वंदन करू शकतो."

त्यावर तो सैतान खदखदून हसत म्हणाला, "मला इतकी मोठी लाच हवीच आहे कुठं! मी जे सांगेन तेवढे तू ऐक म्हणजे झाले. मला तुझे फक्त कान दे."

"मी ऐकेन. आनंदानं...तुला थोडा वेळ दिल्यानं मी बहिरा थोडाच होणार आहे."

"कान दिल्यावरही तू ऐकू शकशील." तरुणाच्या पाठीवर प्रेमाने हात थोपटीत सैतान म्हणाला.

ती संधी साधून तरुण तीन पायऱ्या झपाट्यानं चढला. तेवढ्यात सैतानाचा काटकुळा हात पुढे आला. सैतान म्हणाला, "पुरे. इथंच थांब आणि तुझे बांधव फोडीत असलेल्या किंकाळ्या इथून जरा ऐक."

तो तरुण थांबला अन् एकदम आनंदित होऊन म्हणाला, "आश्चर्यच आहे! हे खालचे लोक आनंदानं नाचताहेत, गाताहेत, हसताहेत..." असं म्हणत तो तरुण झपाट्यानं आणखी तीन पायऱ्या चढला. पुन्हा त्याला थांबवीत सैतान म्हणाला, "ह्यापुढील तीन पायऱ्या चढण्याच्या बदल्यात मला तुझे डोळे दे."

"छान छान! तुला डोळे देऊनही मला दिसणारच आहे. अधिक चांगलं दिसणार आहे."

असं म्हणत आणखी तीन पायऱ्या तो तरुण चढला. त्याने खाली पाहण्यास सुरवात करताच सैतान त्याला म्हणाला, "त्या खालच्या लोकांची उघडीवाघडी, रक्तबंबाळ शरीरं पाहा पाहू."

"बापरे! काय चमत्कार आहे बुवा! विश्वास बसणार नाही त्याच्यावर. ह्या लोकांनी इतके सुंदर कपडे आणले तरी कुठून? भळभळ वाहणाऱ्या जखमांच्या जागी ह्यांनी तर गुलाबाची फुलं खोवलीत..."

अशा प्रकारे दर तीन पायऱ्यांसाठी, तो सैतान छोटीछोटी लाच मागत राहिला, पण तो तरुण माणूस वर जात होता, वरपर्यंत जाण्यासाठी खुषीने तो सैतानाला लाच देत होता. कारण वरच्या राजेरजवाड्यांवर सूड उगवायचा होता त्याला! आणि...आता एकच पायरी उरली होती. ती ओलांडताच तो पुरता वर पोहोचणार होता. आपल्या बांधवांवर होणाऱ्या जुलमाचा बदला घेणार होता.

"मी जन्मानं गरीब आहे आणि सारे रंजलेगांजले..."

"तरुण माणसा, आता एकच पायरी. ती पार करताच तुला बदला घेता येईल पण...ह्या अखेरच्या पायरीसाठी माझी लाच दुप्पट असते. मला आता तुझं हृदय व स्मरणशक्ती दे."

त्यावर आपला हात वर करीत तो तरुण म्हणाला, "माझं हृदय देऊ? बापरे! नाही, ते शक्य नाही. हृदय मागणं म्हणजे क्रूरपणाचं आहे."

हे ऐकताच सैतान म्हणाला "मी इतका क्रूर नाही बाबा," अन् मोठमोठ्याने हसत तो पुढं म्हणाला, "त्याऐवजी मी तुला नवी स्मरणशक्ती देईन, सोन्यासारखं हृदय देईन. माझी मागणी मान्य केली नाहीस तर, तुझ्या बांधवांवरील जुलमाचा

सूड तुला उगविता यायचा नाही. लाखेच्या पुतळ्याप्रमाणे निष्प्राण झालेल्या, ज्यांचे शिव्याशाप कठोर आहेत, अशा तुझ्या बांधवांसाठी..."

तरुणाने कुत्सितपणाने त्या हिरव्या डोळ्यांच्या सैतानाकडे आपादमस्तक न्याहाळून पाहिले.

नंतर तो म्हणाला, "तुझं ऐकलं तर सर्वांत जास्त दुर्दैवी मीच ठरीन. कारण माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असलेलं सारंच तू मागतो आहेस."

"उलट सर्वांत भाग्यवान होईल तुझं आयुष्य...जाऊ द्या. माझी अट मान्य करतोस? केवळ तुझं हृदय, तुझी स्मरणशक्ती."

तो तरुण विचारात गुरफटला, त्याचा चेहरा काळवंडला, त्याच्या कपाळावर अश्रुबिंदू जमू लागले. एकदम मुठी वळवीत, दात–ओठ चावीत तो ओरडला, "ठीक आहे. घेऊन टाक."

...आणि साऱ्या गतस्मृती मागे टाकीत, झंझावाती वेगाने त्याने शेवटची पायरी ओलांडली. आता तो शिखरावर होता; तेवढ्यात त्याचा चेहरा हर्षानं उजळला. आनंदानं डोळे लुकलुकले, हाताच्या मुठी सैल पडल्या. मेजवानीवर ताव मारणारे राजेरजवाडे त्याने प्रथम पाहिले. नंतर चेंगराचेंगरी करीत खाली उभा असलेला जनसंमर्द त्याने पाहिला, त्यांचे तळतळाट त्याने ऐकले. पण त्याने त्वेष न येता तो केवळ हसला. कारण खालचा जमाव गमतीसाठी, सणाची मौज लुटण्यासाठी जमला आहे, असं त्याला वाटलं.

त्यावर मिस्किलपणे हसत सैतानाने त्याला विचारले, "तू कोण आहेस?"

"मी राजा आहे राजा! जन्मानं माझं नातं थेट देवाशी आहे. ही पृथ्वी किती सुंदर आहे. पृथ्वीवरील लोक किती सुखी आहेत!"

● ● ●

पोरवाल
नेत्रांजन काजळ टूथ पावडर
पोरवाल आणि कं., टिळक रोड, पुणे २.
FLASH

## □ नांदी न झालेले नाटक

नाटकाचे नाव ' ज्योत्स्ना आणि ज्योती '. मराठीतील प्रख्यात चतुरस्र नवलेखक प्रा. गंगाधर गाडगीळ यांचे हे दुसरे नाटक आहे. मराठीच्या क्षेत्रात काही मंडळींना फक्त तुकाराम–ज्ञानेश्वरांच्याच ' अक्षर ' वाङमयाचा ध्यास आहे. नवे लेखन म्हणजे मराठी भाषेला लागलेला एक काळिमा आहे, असे त्याचे म्हणणे; परंतु नवा ज्ञानेश्वर जन्माला येण्याच्या संधिकालांत तरी गंगाधर गाडगीळ यांचे कथा-लेखन आता सर्वमान्य झालेले आहे. मराठी कथेला तर त्यांनी प्राप्त करून दिलेला दर्जा मराठी वाङमयाच्या इतिहासात ठळकपणे नोंदविला जाईल.

अशा लेखकाचे हे नाटक. तेव्हा या विषयीच्या अपेक्षा अगोदरच उंचावल्या असणे साहजिकच आहे. या नाटकाविषयी लिहिताना अडचणीची गोष्ट अशी आहे की हे नाटक प्रसिद्ध झाल्याला साडेचार महिने होऊन गेले तरी ते रंगभूमीवर येऊ शकलेले नाही. ' ज्योत्स्ना आणि ज्योती ' या नाटकाच्या नांदीला वेळ लागावा, ही एक आश्चर्याचीच गोष्ट म्हणावी लागेल.

' ज्योत्स्ना आणि ज्योती ' या नाटकात मुख्यत: दोन बहिणींची कथा आहे. थोरली ज्योत्स्ना अंतर्मुख, हळवी, काव्यलोलुप पण जीवनाच्या विफलतेविषयी विलक्षण धास्ती घेतलेली, तसेच धाकट्या बहिणीवर विलक्षण माया करणारी, पण तिच्या काठोकाठ भरून उतू जाऊ पाहणाऱ्या जीवनाविषयी मधूनच तिच्या मनात किंचितकाल असूयेचे ढग जमतात आणि तिची धाकटी बहीण थोरलीच्या अगदी उलट अशी आहे. चारी बाजूंनी फुललेल्या जीवनाकडे आकर्षित होणारी आणि सर्व चांगल्या गोष्टींचा मनापासून उपभोग घेण्यासाठी सदालोलुप असणारी !

या दोन बहिणींच्या परस्पर विरोधी वृत्तीमध्ये विलक्षण बदल घडून येतात आणि त्या निमित्ताने नाटकातील जुन्या परंपरेच्या प्रतीक असलेल्या मावशी, त्यांचा पुतण्या नारायण आणि दिलीपकुमारवर प्रेम करून आपलं वेडं जीवन लुटायला निघालेली विमल. शब्द, भावना आणि काव्यकल्पना यांतच मग्न असलेला नाटककार अच्युत अशा निरनिराळ्या वृत्तींच्या धाग्यांनी गाडगिळांनी या दोन बहिणींच्या जीवनाचे नाट्य रेखाटले आहे.

एखादे नाटक वाचून त्याविषयी काही मतप्रदर्शन करणे योग्य नाही. कारण नाटक ही एक प्रयोगक्षम कला आहे. म्हणून त्या कलेचे मूल्यमापन प्रयोगावरूनच करावयाचे असते. नाटक वाचताना जे भावविश्व आणि सौंदर्यानुभव यांचा प्रत्यय वाचकाला येत असतो. तो मुका असतो, दृश्य आणि श्राव्य या दोन घटकांनाच



गंगाधर गाडगीळ

नाटकात महत्त्वाचे स्थान असते आणि ही गोष्ट इतकी स्पष्ट आहे की त्यासाठी काही उदाहरणे देण्याची गरज नाही. परंतु अशी एकदोन उदारहरणे इथे दिली तर प्रयोगक्षमता काय असते, हे चटकन लक्षात येऊ शकेल. म्हणून ' झोपी गेलेला जागा झाला ' आणि ' ससा आणि कासव ' या दोन नाटकांचे उदाहरण देता येईल. ही दोन नाटके आपण वाचलीत, तर ती प्रयोगाच्या दृष्टीने कितपत यशस्वी होतील, याची शंका वाचकांच्या मनात आल्याशिवाय राहाणार नाही. परंतु याच नाटकांचे प्रयोग पाहिले तर आश्चर्याचा एक मोठा धक्काच बसतो. वाचताना ज्याची कल्पनादेखील आली नसती, असे विलोभनीय दृश्यरूप त्या नाटकांना रंगभूमीवर लाभलेले आपल्याला दृष्टीस पडते.

गाडगिळांचे हे नाटक वाचल्यानंतर असेच जाणवते. यातील ज्योत्स्ना, ज्योती, अच्युत, नाडकर्णी, मावशी आणि फोन या साऱ्यांच्या वर्तणुकीतील नाटय ( या नाटकातील फोनलाही मी एक महत्त्वाचे पात्र समजतो. ) वाचताना जरी प्रयोगक्षम वाटले नाही तरी रंगभूमीला ते एक आव्हान आहे, याची जाणीव झाल्याशिवाय राहात नाही !

ठोकळ, भडक प्रसंग, खटकेबाज संवाद, शाब्दिक कोटयांची आतषबाजी, पात्रांच्या निवडीत दाखविलेला लोकविलक्षणपणा, विक्षिप्तपणा किंवा ओढूनताणून आणलेले उदात्तीकरण या साऱ्या ठरीव आणि ठोकीव आराखडयावर आधारलेली नाटके पूर्वीप्रमाणे आजही फायदेशीर ठरतात. परंतु लोकप्रियता आणि यश या दोन गोष्टींची कुंडली क्वचितच जुळते. ' माणूस ' नावाचा बोलपट तयार करणारे एकेकाळचे व्ही. शांताराम आणि ' सेहरा ' सारखेच चित्रपट ओळीने निर्माण करणारे आजचे शांताराम पाहिले म्हणजे चित्रपटातील त्यांच्या प्रगतीचा आलेख सिद्ध होतो. ' माणूस नावाचे बेट ' हे दर्जेदार नाटक लिहून पराभूत झालेले विजय तेंडूलकर ' मी जिंकलो, मी हरलो' हे प्रयोगाच्या आणि नाटक चालावे या विचाराच्याच आहारी जाऊन नाटक लिहितात, तेव्हा त्यांतील तडजोडीचे स्वरूप लपून राहत नाही.

त्यामुळे वर उल्लेखिलेल्या ठोकळ आणि ठोकताळेवजा नाटकांच्या सीमा ओलांडून नवीन नवीन नट आणि नवीन दिग्दर्शक जेव्हा नाटकांच्या नवीन क्षेत्रांत चाललेल्या प्रयोगाचे आव्हान स्वीकारतील, तेव्हाच मराठी रंगभूमी खऱ्याखुऱ्या अर्थाने होईल.

ज्योत्स्ना आणि ज्योती, माणूस नावाचे बेट, बाधा, ससा आणि कासव आणि कक्षा ही चांगली नाटके केवळ प्रयोगांच्या अभावी नाटयरसिकांना रंगभूमीवर भेटू शकत नाहीत, याकडे गंभीरपणे लक्ष द्यावयास हवे !

● ●

## ☐ अनावर उत्कट लेखन

'आभाळाचा रंग निळा' ही ल. ग. जोग यांची पहिली कादंबरी. हिचे वैशिष्टय म्हणजे हिच्या कथावस्तूत लेखकाने दाखविलेले धारिष्टच होय. लेखक स्वतःच हे एक अनावर लेखन आहे, असे सांगतो. कामजीवन आणि त्याविषयीं फ्राईडचे मानसशास्त्रीय सिद्धांत नवीन राहिलेले नसले तरी ललित लेखकांनी अजून त्यांचा पिच्छा सोडलेला दिसत नाही. या सिद्धांतांचे आणि त्यांच्या अनुषंगाने मानवी जीवनाकडे बघण्याचे वावडे असण्याचे काहीच कारण नाही. परंतु एखादी कलाकृती उभी करीत असताना तिच्यावर इतर कुठल्याही 'इझम'चे आक्रमण होणार नाही, शेवटपर्यंत ती केवळ एक कलाकृती म्हणूनच उभी राहील, याकडे कलावंताचे अधिक लक्ष असले पाहिजे.

'आभाळाचा रंग निळा' या कादंबरीच्या बाबतीत नेमकी तीच गोष्ट झालेली आहे. ही कादंबरी वाचल्यावर वरवर ती कितीही उत्कट वाटत असली [ आणि ती वाचून संपविल्यावर क्षणभर निश्चित असे वाटते ] तरी एक कलाकृती म्हणून जेव्हा तिच्याविषयी मनांत विचार सुरू होतात, तेव्हा कलेच्या दृष्टीने उपरे, अगांतुक असणारेच अनेक प्रश्न मनात उभे राहतात.

कादंबरीत महत्त्वाची तीन पात्रे. विश्वास, उमा आणि सुनंदा. विश्वास आणि सुनंदा यांचे नाते नवरा-बायकोचे आहे. सुनंदा विश्वासच्या घरात लहानपणापासून राहिलेली एक निराश्रित मुलगी आहे. तिची आई एक नर्स असते आणि तिच्या वडिलांची काही माहिती नसता विश्वास आणि उमा हे प्रथम शेजारी असतात. पण नंतर उमाची आई तीर्थयात्रेला जाते, तेव्हा विश्वासकडे उमाला ठेवून जाते. तेव्हा तिचे वय तारुण्याच्या जेमतेम जवळपास असते.

एके दिवशी उमाची आई अत्यवस्थ असल्याची तार येते. त्यावेळी सुनंदा बाहेर गेलेली असते आणि घरात फक्त विश्वास आणि उमाच असतात. त्या निष्पाप अल्लड मुलीला ही दुःखद बातमी सांगावी किंवा सांगू नये, असा संभ्रम विश्वासच्या मनात निर्माण होतो. तार पाहून त्या मुलीला परिस्थितीच्या गांभीर्याची थोडी फार चाहूल लागलेली असते. शेवटी विश्वास तिला जवळ घेतो आणि तिच्या आईच्या आजारपणाची बातमी तिला सांगतो. त्या बातमीने उमाचे शरीर आणि मन हादरते. मग विश्वास — म्हणजे आप्पा — तिला आपल्याजवळ घेतो. तिचे सांत्वन करतो. तिचे दुःख हलके करण्याचा प्रयत्न करतो. ती त्याच्या कुशीत शिरते. त्याचा हात घेऊन आपल्या हृदयाशी घट्ट दाबते......

आणि त्या असहाय्यतेच्या अवस्थेत केलेल्या निकट स्पर्शाने, घडलेल्या आलिंगनाने आणि त्यातून निर्माण झालेल्या भावलहरींनी आप्पा आणि उमा यांच्या जीवनाला नवीन धुमारे फुटतात, त्याला अभिलाषेची, नव्या शरीरसुखाची आणि

आगळ्या मन:तृप्तीची लुसलुशीत कोवळी पालवी फुटते! या पालवीचा अर्थ काय? 'अर्थ काय?' हा प्रश्न अस्पष्ट राहात नाही. छोट्या उमाला दु:खाच्या प्रसंगी धीर देणे, तिच्या चिमुकल्या जीवनात नवीन उर्मींचा प्रवाह सुरू करणे आणि ती जीवनाभिमुख करणे, असे हेतू या भावनांच्या मुळाशी लेखकाने कल्पिलेले आहेत.

पुढे उमाची आई मृत्यू पावते आणि उमाचे निराधार जीवन आप्पांचा आधार मान्य करते. आप्पांचे तिच्याशी चुंबनालिंगनाचे प्रकार चालू असतात. आप्पा तिचे सारसर्वस्व बनतात. तरीही ती नंतर रमेश नावाच्या एका तरुणाच्या प्रेमात पडते. आप्पांना हे सहन होत नाही आणि ते तिला त्याच्या सहवासापासून परावृत्त करतात. उमाविषयी आप्पांच्या मनात ज्या अनेक भावना आहेत, त्यांतील काम-भावना ही अधिक प्रबळ आहे, कारण असे विधान केल्याशिवाय या कादंबरीचा अर्थ लागणेच कठीण आहे. कामवासनेव्यतिरिक्त इतर उदात्त भावना त्यांच्या मनात असत्या, तर त्या आप्पांना आपल्या पत्नीपासून चोरून ठेवण्याचे काहीच कारण नव्हते; परंतु ज्या भावनांची परिणती प्रत्यक्ष विषयोपभोगात होणे अटळ असते, तशी परिणती होईपर्यंत आप्पांनी हे सारे संबंध आपल्या पत्नीपासून लपवून ठेवलेले असतात.

नंतर आप्पा उमाचं लग्न सुधीर नावाच्या महत्त्वाकांक्षी तरुणाशी करून देतात. हे लग्न करून देण्यामध्येही त्यांचा मनाचा उदात्त हेतू कुठेच प्रत्ययाला येत नाही. कारण तिकडे लग्नसमारंभ चालू असताना उमाविषयी आप्पांच्या मनात काय विचार येत असतात, याचे वर्णन लेखकाने अगदी स्पष्टपणे केलेले आहे. नंतर सुधीर वाहवतो, स्वैर बनतो, व्यसनी बनतो, इतकेच नव्हे तर उमाला मारहाण करतो आणि पुन्हा अशारीतीने उमावर कोसळलेल्या दु:खाची परिणती आप्पांनी तिच्या प्रत्यक्ष शारीरिक उपभोग घेण्यात होते. ज्या अवस्थेमध्ये त्या दोघांकडून हे कृत्य घडत आहे, त्या अवस्थेचे चित्रण मात्र लेखकाने फार समर्थपणे केलेले आहे. अनेक नाजुक भावनांची गुंतागुंत आणि त्यामधून वर्तणुकीसाठी रस्ता शोधणारे माणसाचे मन यांचा हा एक सुंदर आलेख आहे, असे वाटते. याअगोदरच्या काही प्रसंगी उमाच्या नवऱ्याने एखाद्या जनावरासारखा तिचा घेतलेला उपभोग आणि आप्पांच्या सहवासात, दोन्ही मने दु:खाने काठोकाठ भरलेली असतानादेखील अनेक भावनांचा झालेला गुंता सुटतो आणि कामभावनेचा एकच एक तंतू एक-मेकाला जोडला जातो. उपभोगाची सहजतेने परिपूर्ती होते!

हे सारे घडते आणि आप्पा घरी परतताना पहिले आप्पा राहात नाहीत! त्यातही आश्चर्य असे आहे, की त्या क्षणापासून उमादेखील आपल्या पहिल्या आप्पांना गमावून बसते. प्रत्यक्ष शरीरभोग आणि शरीरभोगाकडे झपाट्याने खेचून नेणारे कामचाळे या दोन परस्पर संबंध नसलेल्या वेगळ्या वस्तूच जणू लेखकाने

येथे कल्पिलेल्या आहेत. प्रत्यक्ष तो क्षण येण्यापूर्वीचे जीवन जणू उदात्त, मंगल आणि निष्पाप होते. उमाच्या आणि आप्पांच्याही दृष्टीने. त्या साऱ्या उदात्त आणि निष्पाप भावनांमध्ये जेव्हा प्रत्यक्ष शरीरोपभोगाच्या भावनांची भर पडली, तेव्हा सारे जीवनच कलंकित होऊन गेले, पापमय झाले, अव्हेरणीय झाले.

लेखकाने कल्पिलेले हे प्रमेय सोडविताना त्याचे उत्तर हातात न पडता त्या एका प्रमेयातून अनेक प्रमेयांची मात्र उत्पत्ती होते !

यानंतर जो कादंबरीचा भाग आहे, तो आप्पा उमाच्या अभिलाषेने वेडे होण्यात आणि त्या वेडातून त्याना बाहेर खेचण्यासाठी उमाने पुन्हा एकदा शरीरदानाचे दिव्य करण्यात होते !

'आभाळाचा रंग निळा' या कादंबरीची कथा थोडक्यात ही अशी आहे ! यात लेखकाने मिळविलेले यश ते त्याच्या निवेदनशैलीत आहे. जबरदस्त पकड पडावी एवढे सामर्थ्य त्याच्या कथावस्तूत नसले, तरी ते त्याच्या निवेदनशैलीत निश्चित आहे ! येथे कथावस्तूविषयी विचार करताना जाणवते ते फक्त जीवनदर्शनाचे माफक यश. विशिष्ट प्रकारचे अपवादात्मक जीवनदर्शन येथे घडते. परंतु हे जीवनदर्शन कलात्मक आनंदाच्या पातळीवर उचलले जात नाही. जे जीवन साध्या सुखदुःखांच्या, आशा-निराशांच्या आणि पापपुण्याच्या प्राकृत कल्पनांच्या पातळ्यांवरूनच वाहत जाते, ते जीवन एखाद्या शापित अहिल्येच्या जीवनाप्रमाणे दगड म्हणूनच राहिलेले असते; कलात्मकतेचा दिव्य स्पर्श झाल्याशिवाय त्याचा उद्धार होत नाही. परंतु उद्धार होऊ शकला असता, अशा अद्भुत शिळेपाशी पोचणे— हेही नसे थोडके !

—वि. शं. पारगावकर


ज्योत्स्ना आणि ज्योती : लेखक : गंगाधर गाडगीळ

सुविचार प्रकाशन, पुणे. किंमत ५ रुपये


●

आभाळाचा रंग निळा : लेखक : ल. ग. जोग

मकरंद साहित्य, मुंबई १. किंमत ३ रुपये : पृ. १३०



आइसलंड
नाझी राजवटी
नाझी अंकित देश
तटस्थ राष्ट्रें
दोस्त राष्ट्रें
नाझी व्याप्त प्रदेश
० ४०० मैल
संयुक्त राज्ये
लंडन
इंग्लीश खाडी
पॅरीस
फ्रान्स
स्पेन
माद्रिद
लिस्बन
पोर्तुगाल
जिब्राल्टर
मोरोक्को
अल्जेरिया
अल्जीर्स
ओरान
ट्युनिस
लिबिया
मार्सेली
कॉर्सिका
रोम
नेपल्स
सिसिली
जर्मनी
बर्लिन
स्वित्झर्लंड
ऑस्ट्रिया
म्युनिक
हंगेरी
युगोस्लाव्हिया
अथेन्स
क्रीट
ओस्लो
स्टॉकहोम
लिथुआनिया
वॉर्सा
अॅम्स्टरडॅम
ब्रुसेल्स




# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

उत्तरार्ध :

लेखांक दुसरा

अवघ्या चार-पाच दिवसांत पोलंडचा प्रतिकार कोसळला ! प्रतिकार तो कसला ... जर्मन यंत्रचलित पॅन्झर तुकड्यांनी पोलिश कॉरिडॉरमधून जी मुसंडी मारली, त्याला यापूर्वीच्या कुठल्याही रणधुमाळीत तोड नव्हती. पूर्व रशियातून जर्मन सेनापती गुडेरिन् याच्या रणगाड्यांनी पोलंडच्या सैन्यात अशी पाचर मारली की त्याने पोलंडचे सेनापती हादरूनच गेले अशा यंत्रचलित सुसज्ज सेनेशी पोलंडची घोडदळे का सामना करू शकणार होती ?

जर्मन टँकस्‌वर घोडदळ धावून गेले ! रणगाड्यांवरील दूरगामी तोफांवर माले-फेक सुरू झाली ! अशा दोन असमान बलाबलाचा लढा किती दिवस चालणार ? जर्मन सैन्याचा पाणलोट पोलिश भूमीवरून कल्पनातीत वेगाने वॉर्साच्या दिशेने वाहू लागला. ब्लिट्झक्रीग म्हणजे जीव घेणारी झडप ! या तंत्राचे जगाला घडलेले हे पाहिले रौद्रदर्शन ! फायटर जातीच्या व बॉम्ब फेकणाऱ्या विमानांच्या ताफ्यांनी आकाशातून हल्ले करीत, शत्रूभूमीवर आगीचे वणवे निर्माण करीत सुटायचे, स्टूका जातीच्या विमानांनी सूर मारीत झेपा घेत शत्रूची मोक्याची ठिकाणे उद्‌ध्वस्त करावयाची, या भयानक छत्राखाली, टँक दलाने रोज ३० ते ४० मैल मुसंडी द्यायची; असे हे भीषण तंत्र ! रस्ते असोत वा मुलूख डोंगराळ असो, नाले असोत वा खाचखळगे असोत–जर्मन टँकस्‌ रोरावत सारख्या पुढेच सरकत असत. यापाठोपाठ स्वयंचलित सैन्यगाड्या, रेडिओ, टेलिफोन व बिनतारी-संदेशवाहनाची जाळी विणीत उद्‌ध्वस्त मुलखावर जर्मन कबजा निमिषार्धात निर्माण करू शकत. पृथ्वीतलावर यापूर्वी कधीही अशा अक्राळविक्राळ स्वरूपाचे युद्ध कुणी अनुभवलेले नसल्याने सलामीच्या पहिल्या चार दिवसांतच पोलंडचा प्रतिकार उद्‌ध्वस्त झाला यात नवल ते काय ?

युद्ध झाल्यापासून ४ तास उलटण्यापूर्वी पोलिश हवाईदलाची पाचशे विमाने जर्मन लुफ्तवाफने हवाई अड्ड्यावरच जागच्या जागी निकामी करून टाकली. विमानतळ उद्‌ध्वस्त झाले. तारायंत्रे मोडून पडली. वैमानिक व अधिकारीवर्ग मारला गेला किंवा जखमी झाला. वॉर्साच्या खालोखालचे महत्त्वाचे पोलिश शहर क्रॅको (Cracow) ६ सप्टेंबरला जर्मनीच्या हाती पडले. त्याच रात्री वॉर्साहून पोलिश सरकारने पळ काढला व त्याने लुब्लीन गाठले.

८ सप्टेंबरला चौथी जर्मन पँझर तुकडी वॉर्साच्या उपनगरांवर धडका देऊ लागली. याच वेळी वॉर्साच्या दक्षिणेकडे सायलेशिया व स्लोव्हाकियामधून निघालेल्या दहाव्या जर्मन सेनादलाने शहरमागून शहरे घेत व्हिस्तुला व सॅन नद्यांच्या संगमावरील सॅन्डोमायर्झ या शहरावर कबजा मिळवला होता.

आठवडाभरात पोलंडच्या सैन्याची पुरती दाणादाण झाली. त्याच्या ३५ डिव्हिजन सैन्यातील असंख्य शूर सैनिक एक तर मृत्युमुखी पडले किंवा जर्मन सैन्याच्या उघडलेल्या जबड्यात कोंडले गेले. जर्मन सैन्याचा जबडा वॉर्साचा घास घेण्याकरता हळूहळू मिटू लागला. कोंडीत सापडलेल्या पोलिश सैन्याभोवती मगरमिठी घट्ट करण्याचेच काम आता उरले होते व याबरोबरच वॉर्साच्या पूर्वेकडील भागात नवीन मुसंडीची तयारी सुरू झाली होती. युद्धाच्या दुसऱ्या अवस्थेत–ब्रेस्ट–लिटॉह्‌ या शहराच्या पश्चिमेकडील पोलिश सैन्याचा खातमा करण्याची सिद्धता आता सुरू झाली होती.

परंतु या दुसऱ्या अवस्थेत पूर्वी ठरलेल्या करारानुसार रशियाने आता पोलंडच्या

पाठीत वार करावयाचा होता!! ५ सप्टेंबरला जर्मन सरकारने केलेल्या लेखी विनंतीला मोलोटोव्हने लेखी उत्तर पाठवले—

" Russia will attack Poland from the east at a suitable time. But the time has not yet come "

[ रशिया पोलंडवर पूर्वेकडून हल्ला योग्यवेळी करील. परंतु ती वेळ अजून आलेली नाही. ]

## जर्मन विजय व रशियाची धांदल

वस्तुस्थिती अशी होती की जर्मन सैन्याला पोलंडशी दीर्घकाळ मुकाबला करावा लागेल, अशा भ्रमात रशियन अस्वले होती. ८ सप्टेंबरला वॉर्साच्या उपनगरापर्यंत जर्मन सैन्य पोचल्याचे वृत्त येताच मॉस्कोचे वेळापत्रक उलटेसुलटे झाले. जर्मन सैन्याच्या पोलंडमधील तडाखेबंद विजयाने रशियन हुकूमशहाच्या पोटात काहीशी घडकीही भरली होती. रशियन सरकारने वरवर वॉर्सापर्यंत घुसल्याबद्दल जर्मन सैन्याचे अधिकृत अभिनंदन त्याच दिवशी केलेही. पाठोपाठ मॉस्कोतील जर्मन वकील शूलेनबर्ग याने मॉलोटोव्हला लेखी विचारले—" रशियाची सैनिकी हालचाल कधी होणार आहे ?"

मोलोटोव्ह उत्तरला—

" तुमच्या पोलंडमधील अनपेक्षित त्वरित विजयाने आमची परिस्थिती काहीशी कठीण झाली आहे !"

परिस्थिती कठीण होणारच—कारण रशियाने पोलंडवर वार करायला कोणते कारण पुढे करावयाचे याचा विचार अजून पक्का झाला नव्हता ! मोलोटोव्हने एक कारण तयार करून शूलेनबर्गच्या हाती ठेवले—

" Poland was falling apart and it was necessary for the Soviet Union to come to the aid of the 'Ukranians' and the 'White Russions' threatened by Germany. "

म्हणजे—पोलंड मोडून पडल्यामुळे पोलंडमधील युक्रेनिअन व श्वेत-रशियन जनतेला जर्मनीपासून भय निर्माण झाले आहे. त्यांच्या सहाय्यार्थ रशियन सैन्य पोलंडमध्ये घुसत आहेत, असे मॉस्कोने जगाला सांगायचे ! परंतु शूलेनबर्ग व रिबेन्ट्रॉप काही दूधखुळे नव्हते. रिबेन्ट्रॉपने १५ सप्टेंबरला लेखी जबाब पाठवला—

" आम्ही एक—दोन दिवसांत वॉर्सावर कबजा करीत आहोत. सोविएट सैन्याने याचवेळी हालचाल करणे जरूर आहे व आम्ही त्याचे स्वागत करू. परंतु असे करण्यासाठी जर्मनीला देखला दोष लावू म्हणाल, तर ते जमणार नाही ! मॉस्कोत करार झाला तेव्हा असे काही ठरलेले नव्हते. तुमच्या अशा करण्याने जगापुढे हेच येईल की रशिया व जर्मनी यांचे मनोमन वैर आहे ! पोलंडवर कधी हल्ला करता त्याची तारीख व वेळ कळवा."

हा पेचात टाकणारा जबाब मिळताच मॉस्कोत काय धांदल उडाली याचा 'आँखो देखा हाल' जर्मन वकील शूलेनबर्गने आपल्या खलित्यात सांगितलेला आढळतो—

"१६ सप्टेंबर : आज सायंकाळी सहा वाजता मी मोलोटोव्हची भेट घेतली. मोलोटोव्हने सांगितले की पोलंडवरील रशियन हल्ल्याला आता फारसा उशीर नाही. उद्या किंवा परवाच हल्ला करू. स्टॅलिन आपल्या लष्करी अधिकाऱ्यांबरोबर विचारविनिमय करीत आहे..."

मोलोटोव्ह पुढे म्हणाला, "आम्ही हल्ला करण्यापूर्वी पुढील सबब पुढे करू : पोलंड असा आता उरलेलाच नसल्यामुळे पोलंडशी आमचे असलेले सर्व करारमदार रद्दच झाले आहेत. या विपरीत परिस्थितीचा फायदा एखाद्या तिसऱ्याच शक्तीने उठवू नये, याकरता सोव्हिएट सरकारने युक्रेनियन व श्वेत-रशियन बांधवांसाठी धावून जाणे प्राप्त कर्तव्य ठरते."

"ही तिसरी शक्ती म्हणजे जर्मनीच असल्यामुळे मी या तऱ्हेच्या सबबीला हरकत घेतली. मोलोटोव्ह यावर म्हणाला, की सोविएट सरकारच्या या पुढे केलेल्या सबबीत जर्मनीला न आवडणारा सूर आहे, हे खरे. परंतु सोविएट सरकार यावेळी ज्या अडचणीत सापडले गेले आहे, ती लक्षात घेऊन जर्मनीने थोडी सहनशीलता दाखवावी. आतापर्यंत सोविएट सरकारने अल्पसंख्याक—युक्रेनियन वा श्वेत-रशियन—लोकांबद्दल कधीच आस्था दाखवलेली नसल्यामुळे काहीतरी थातुरमातुर करणे भाग आहे."

रशियन ठगांची ही जबानी मोठी उद्बोधक आहे.

१६ सप्टेंबरची रात्र उलटली. १७ सप्टेंबरला दुपारी दोन वाजता शूलेनबर्गला स्टॅलिनचे बोलावणे आले. शूलेनबर्ग त्या दिवशी बर्लिनला पाठवलेल्या तारेत म्हणतो—

"Stalin received me at 2 o'clock... & declared that the Red Army will cross the Soviet border at 6 o'clock...Soviet planes would begin to day to bomb the district of Lemberg."

[आज २ वाजता स्टॅलिनला मी भेटलो. स्टॅलिनने सांगितले की लाल सैन्य सायंकाळी सहा वाजता सोविएट सरहद्द ओलांडील. सोविएट विमाने आजच लेमबर्ग भागात बॉम्बफेक करू लागतील.]

## सारेच एका माळेचे

या आधीचे दोन आठवडे, पोलंड बेचिराख करणाऱ्या जर्मन लुप्तवाफला रात्रीच्या वेळी शहरांच्या दिशा नीट समजाव्या म्हणून रशियाने आपल्या मिन्स्क (Minsk) रेडिओ केंद्रावरील कार्यक्रमात दोन तासांनी वाढ केली होती. हेतू हा, की या स्टेशनवरील कार्यक्रमाने मिन्स्क शहराची दिशा विमानांना अपरात्रीही समजावी ! जर्मनीला पोलंड पोळण्यासाठी अशा तऱ्हेने एकीकडे भागीदार राहा-



वॉर्सा शहराबाहेर हिटलर

वयाचे व अखेरच्या क्षणी पोलंडच्या पाठीत सुरा खुपसताना–जर्मनीने पोलंड मोडून पाडले म्हणून आम्ही हल्ला केला–असे कारणही पुढे करावयाचे, ही रशियाची कुटील नीती–जर्मनीच्या राजनीतीपेक्षा उजवी समजण्याचे फारसे कारण नाही.

१७ सप्टेंबरला सायंकाळी सोविएट विमानेही रणात हतबल झालेल्या आपल्या शेजाऱ्यावर, मृतदयेच्या पोटीच बॉम्बफेक करू लागली. १८ सप्टेंबरला सोविएट सैन्याने ब्रेस्टलिटॉव्ह् येथे जर्मन सैन्याशी हातमिळवणी केली. २१ वर्षांपूर्वी याच शहरात आपल्या पाश्चिमात्य दोस्तांशी दगाबाजी करून जर्मन सैन्यापुढे रशियन सैन्याने स्वतंत्र शरणागती पत्करली होती ! यावेळी मात्र जर्मन व रशियन ठगांनी मिळून जगाच्या नकाशातून पोलंड पुसून टाकला होता. ही विचित्र शय्यासोबत करीत असताना संशयी स्टॅलिन मात्र शूलेनबर्गला सारखा विचारीत होता,

" मॉस्को अनाक्रमणाच्या करारात ठरलेल्या पोलंडच्या वाटणीप्रमाणे जर्मन सैन्य आपल्या रेषेपुढे तर येणार नाही ना ? "

शूलेनबर्गने रिबेन्ट्रॉपला तारेने विनंती केली की याबाबत काहीतरी निश्चित आश्वासन स्टॅलिनला देण्याची मला मुभा द्या. रिबेन्ट्रॉपने तार केली—

" Tell Stalin that the agreement will, of course, be kept and they are regarded by us as the foundation stone of the new friendly relations between Germany and the Soviet Union "

[ स्टॅलिनला सांग, की करार पाळले जातील. हे करार तर जर्मनी व सोविएट युनियन यांच्यातील नव्या मैत्रीच्या संबंधाचा मूळ पाया आहे. ]

जर्मनी व रशिया यांच्या परस्पर मैत्रीचा मुख्य पाया काय, तर पोलंडच्या शिकारीत दोघांचा वाटा ! जगातल्या देशादेशांतील मैत्रीच्या पायाचे रसायन बहुधा असेच एखाद्या दुबळ्या देशाच्या रक्ताश्रूंचे असते. नाहीतर माओच्या गळ्यातील आयूबखानांचे हात आज असे स्थिर कसे राहते ?

## पोलंडची लांडगेतोड

परंतु या दोन्ही ठगांच्या मैत्रीला एक शाप होता. स्टॅलिन हा अत्यंत संशयग्रस्त होता व अधिक पाताळयंत्री होता. त्याने जर्मनीच्या अंगावर शेकत असलेल्या या युद्धात आता पदोपदी हिटलरचे पाय ओढण्याचे ठरवले. हेतू हा, की जर्मनी एका अंगावर लढण्यात गुंतलेला असल्यामुळे तो मुकाट्याने रशियाचे प्रत्येक म्हणणे मान्य करणारच ! याचा परिणाम असा झाला की पूर्वेकडे फ्रान्सला खडे चारीपर्यंत रशियाची ही माजोरी जर्मनीने सहन केली; तरी अखेर हिटलरने इंग्लंडवरील स्वारीचा विचार रद्द करून, प्रथम स्टॅलिनलाच लोळवण्याचा विचार मुक्रर केला.

रशियाच्या पोलंडवरील हल्ल्याचे वेळी जे पत्रक प्रसिद्ध करावयाचे, त्यातील मजकूर अखेर खुद्द स्टॅलिनने तयार केला होता. त्यात म्हटले होते–

" जर्मनी व रशिया यांचा असा हेतू आहे, की पोलंडमध्ये शांतता व सुव्यवस्था नांदावी; परंतु पोलंड हे राष्ट्र तर आज मोडून पडलेले आहे. अशा परिस्थितीत पोलिश लोकांना सहाय्य करण्यासाठी आम्ही रशियन्स पोलंडमध्ये येत आहोत. "

काय हरामखोरी आहे पाहा ! समजा, जर्मनीचा हेतू पोलंडमध्ये शांतता नांदावी असा असला तर रशिया तिथे का जातो आहे ? पोलंड राष्ट्र मोडून पडले ते कसे ? जर्मनीने ते मोडले असेल, तर रशियाने पोलंडला मदत करावयाची का पाठीत वार करून बॉम्बफेक सुरू करावयाची ?

या व्यवहारात मूळ मॉस्को वाटाघाटीत असे ठरले होते, की लहानसे पोलंड नकाशावर शिल्लक ठेवावयाचे. फक्त जर्मनीने कारीडोर व डॅन्झिग घ्यावयाचे व शियाने त्यांचा जो भाग मागील युद्धात पोलंडमध्ये समाविष्ट झाला होता तेव-ढाच घ्यायचा. परंतु आता स्टॅलिन फिरला ! एस्टोनिया व लाटव्हिया या भागांतील जर्मन सैन्य मॉस्कोत ठरल्याप्रमाणे जर्मनी मागे घेणारच होता. परंतु स्टॅलिनने मागणी केली की लिथुलानिया हा मागही जर्मनीने रशियाला द्यावा व त्या बदल्यात सर्व उर्वरित पोलंड हिटलरने आपलेकडे ठेवावा. पोलंड असा देश नकाशात नकोच !

२५ सप्टेंबरला रात्री ८ वाजता मॉस्कोमधील जर्मन वकील शूलेनबर्ग याला स्टॅलिनने तातडीने भेटावयास बोलावले. या भेटीनंतर शूलेनबर्गने बर्लिनला पाठवलेल्या वृत्तांतात म्हटले आहे–

" Stalin stated...He considered it wrong to leave an independent residual poland. Stalin added that if we consented, the Soviet Union will immediately take up the solution of the problem of the Baltic countries & expected in the matter, the unstinting support of the German Govt. Stalin expressly indicated Estomia, Latvia & Lithuania, but did not mention Finland. "

[स्टॅलिनचे सांगणे आहे– उरलेला स्वतंत्र असा पोलंड देश शिल्लक ठेवणे चुकीचे आहे. त्याचे म्हणणे आहे की जर आपणही कबूल झालो, तर सोविएट युनियन तावडतोबच बाल्टिक राष्ट्राचा प्रश्न सोडवू इच्छिते. या कामी जर्मन सरकारने त्यांना पूर्ण पाठिंबा द्यावा अशी अपेक्षा आहे. स्टॅलिनने या संबंधात एस्टोनिया, लाटव्हिया व लिथुयानियाचा उल्लेख केला. परंतु फिनलंडचे मात्र नाव घेतले नाही.]

## रिबेन्ट्रॉप पुन्हा मॉस्कोत

२७ सप्टेंबरला रिबेन्ट्रॉप पुन: दुसऱ्यांदा वाटाघाटीसाठी मॉस्कोत दाखल झाला. त्या दिवशी रात्री १० वाजता स्टॅलिनशी सुरू झालेल्या वाटाघाटी पहाटे १ वाजेपर्यंत चालू होत्या. या तीन तासांच्या बैठकीत स्टॅलिनने पर्याय सुचवले. पहिला पर्याय म्हणजे पूर्वीच्या कराराप्रमाणे पोलंड देश शिल्लक ठेवून लिथुयानिया जर्मनीकडे राहावा किंवा लिथुयानिया रशियाला देऊन जर्मनीने सर्व पोलंड ताब्यात घ्यावा. स्टॅलिनने दुसऱ्या पर्यायाचा आग्रह धरला व रिबेन्ट्रॉपने दुसरा पर्याय हिटलरला विचारून दि. २८ सप्टेंबरला स्वीकारला. " रूसो–जर्मन सरहद्दीचा व मैत्रीचा करार " या नावाने नव्या मसुद्याचे बारसे झाले. कराराची कलमे लिहिली जात असताना जो वेळ उरला, त्या वेळात रिबेन्ट्रॉप 'Swan Lake' हा ऑपेरा पाहण्यासाठी क्रेमलिनबाहेर पडला. रात्री खाना झाला, खाना संपायला पहाट झाली. जरी या करारावर २९ सप्टेंबरला पहाटे ५ वाजता शिक्कामोर्तब झाले असले, तरी त्याची तारीख यामुळेच २८ सप्टेंबरच राहिलेली आहे.

या करारान्वये जर्मनी व रशिया यांनी आपआपल्या ताब्यातील पोलिश प्रदेशात परस्पराविरुद्ध कुठल्याही प्रकारचे आंदोलन झाल्यास ते चिरडून टाकण्याचे मान्य केले आहे.

हिटलरने पोलंडचे युद्ध जिंकले. लढला हिटलर–मेले जर्मन– परंतु जास्तीतजास्त फायदा उठवला तो स्टॅलिनने! पोलंडच्या युद्धात १०,५७२ जर्मन मारले गेले व ३०,३२२ जखमी झाले. अर्धाअधिक पोलंड फक्त जर्मनीला मिळाला असला, तरी युक्रेनियातील गहू वा रुमानियातील तेल, ही दोन्ही आता रशियाची मक्तेदारी झाली. याकरिता रशियन सैनिकांच्या पोटांतील पाणीही हललेले नव्हते.

स्टॅलिनने हा जो विपरीत फायदा घेतला तो हिटलरला समजत नव्हता काय ? अर्थातच त्याला या व्यवहारातील स्टॅलिनची शिरजोरी समजत होती. परंतु पश्चिमेकडे फ्रेंच व ब्रिटिश सैन्याचे भय असताना रशियन मैत्रीत विघाड करणे त्याला शक्य नव्हते. त्याने आपला मोहरा आता पश्चिमेकडे फिरविला होता व म्हणूनच रशियन अस्वलाच्या ह्या प्राणघात गुदगुल्या त्याने त्यावेळी हसण्यावारी नेल्या !

**ब्रिटन-फ्रान्सचे बैठे युद्ध**

३ सप्टेंबरला ब्रिटन-फ्रान्सने जर्मनीविरुद्ध युद्ध घोषित केले. पुढच्या १५ दिवसांत जर्मन सैन्य पोलंडमधून विनाशाचे थैमान घालीत वॉर्सा गाठीपर्यंत जर्मन सैन्याच्या पिछाडीवर दोस्तांची सैन्ये काय करीत होती ? काहीही करीत नव्हती ! या पंधरा-वीस दिवसांत पश्चिम आघाडीवर सामसूम होती. बंदुकीची एक गोळीही जर्मनीविरुद्ध झाडली गेली नाही.

बर्लिनमध्ये तर लोकांत पश्चिम आघाडीवरील या थंड्या युद्धाची अशी प्रतिक्रिया होत होती, की ब्रिटन-फ्रेंचांचे हे बैठे युद्धच दिसते आहे. या युद्धाला उपाहासाने लोक आता ' Sitzkrieg ' – बैठे युद्ध (sit down war) म्हणू लागले होते. म्हणजे जर्मनीचा पूर्वेकडे पोलंडविरुद्ध Blitzekrieg (ब्लिटझ्क्रीग) सुरू असताना, दोस्तांची सैन्ये 'सिटझ्क्रीग्' अमलात आणीत होती ! जर्मनीचे २६ डिव्हिजन सैन्य आपआपल्या मोर्चातून दूरवर फ्रेंचांच्या हालचाली शांतपणे पाहात होते.

जर्मनीच्या सेनापतींना ही घटना फारशी आश्चर्यकारक वाटली नाही. जनरल हालडर–चीफ ऑफ आर्मी जनरल स्टाफ– याने आपल्या डायरीत ही गोष्ट नमूद केलेली आढळली. १४ ऑगस्टलाच त्याने लिहिले होते–


" जर जर्मनीने पोलंडवर हल्ला केला, तर फ्रान्स जर्मनीवर चालून येण्याचा जवळजवळ संभव नाही ! फ्रेंच सैन्य सतत संरक्षणात्मक युद्धाचाच विचार करीत राहील. कारण बेल्जियममधून सैन्य घुसवून, जर्मनीविरुद्ध युद्ध करण्याचा विचार त्यांना रुचणार नाही."

ब्रिटनने पोलंडला दिलेले वचन धूर्तपणाचे होते. त्यात आम्ही अमुकच करू असे आश्वासन नव्हते. परंतु फ्रेंचांनी दिलेल्या अभिवचनात असे स्पष्टपणे म्हटले होते, की युद्ध सुरू झाल्यापासून तीन दिवसांत जर्मनीवर फ्रान्स हल्ला करील.

[ "French would progressively launch offensive operations towards the 3rd day after General Mobilization Day" French-Polish Military Convention—19 May 1939. ]

असे असूनहि फ्रेंचांचे सेनापती जनरल गॅमलीन् याने २३ ऑगस्टलाच मंत्रिमंडळाच्या बैठकीत, निदान दोन वर्षे फ्रेंच सैन्य जर्मनीवरोडर आघाती युद्ध सुरू करू शकणार नाही, अशी वस्तुस्थिती सांगून टाकली होती.

ब्रिटनच्या बाबतीत बोलायचे, तर पोलंड पडल्यानंतर तीन आठवड्यांनी इंग्लंडचे



**जर्मन सैन्य पोलंडमध्ये घुसत होते...पराभूत पोलिश सैन्याच्या अशा तुकड्याच्या तुकड्या जर्मनीमध्ये मजुरी करण्यासाठी पाठविण्यात येत होत्या.**

★

चार डिव्हिजन सैन्य– १,५८,००० सैनिक– प्रथम फरान्समध्ये आले. पुढचा दीड महिना हे सैन्य जागीच बसून होते. ९ डिसेंबरला या सैन्यातील एक कॉर्पोरल टहळणी करताना जर्मनांनी मारला, हाच फरान्समध्ये मरण पावलेला पहिला ब्रिटिश सैनिक होय !

२३ डिव्हिजन जर्मन सैन्याविरुद्ध ब्रिटन व फरान्स यावेळी ११० डिव्हिजन सैन्य ऱ्हाईनमार्गे जर्मनीवर धाडू शकले असते. दोस्तांनी हे केले नाही, तर जर्मनीचा सर्व युद्धबनावच त्याचवेळी कोसळला असता, अशी कबुली न्यूरेनबर्ग खटल्याचे वेळी जर्मन सेनापती जोडल् व कायटेल यांनी दिली.

दोस्त सैन्य हालचाल करीत नव्हते– परंतु फरेंच वा ब्रिटिश विमानांनी जर्मनीचे औद्योगिक कोठार जो ऱ्हुर प्रांत– त्यावर तरी बॉम्बफेक केली काय ? नाही ! सैन्याची हालचाल नाही– बॉम्बफेक नाही– काही नाही ! रक्तस्रावाने पोलंड पांढराफटक होईपर्यंत दोस्तांनी काहीही केली नाही ! हे असे का झाले याचे उत्तर विन्स्टन चर्चिल यांनी आपल्या इतिहासात अचूक दिलेले आहे. चर्चिल सांगतात– " This battle had been lost some years before, " [ पोलंडची लढाई काही वर्षांपूर्वीच हरली गेली होती.]

## गर्भगळीत फ्रेंच जनता व सरकार

लढाईला तोंड लागण्यापूर्वीच लढाई हरली कशी जाऊ शकते ? कारण लढाया सैनिक लढत नाहीत तर त्यांची मने त्या लढवतात वा हरतात; असे चर्चिल यांना सांगावयाचे आहे. फ्रेंच लढणार कसे ? १९३८ साली म्युनिक येथे त्यांनी हिटलरला शरणागती दिली. १९३५ साली ऱ्हाइनलॅंडमध्ये जर्मन घुसले, तेव्हा फ्रेंचांचे रक्त उसळले नाही. ऑस्ट्रिया—झेकोस्लोव्हाकिया जर्मन पंजाखाली गेले, तरी फ्रान्स व ब्रिटन शांततेची स्वप्ने पाहात होती. त्यांनी आता अचानक जर्मनीविरुद्ध प्राणपणाने लढण्यासाठी जिद्द आणि हिम्मत आणायची कुठून ? कणाकणाने अपमान सहन केले, क्षणाक्षणाने वस्त्रहरणे उघड्या डोळ्यांनी पाहिली, की पुढे जेव्हा अटळ युद्ध अखेर सुरू होतेच, तेव्हा हातांत शस्त्रे असली तरी मनेच पेटत नाहीत ! आपण मार खाणार, आपला पराभव होणार याचीच चित्रे नजरेपुढे तरळू लागतात. 'मेलो–मेलो' म्हणून आक्रोश करीत, सर्वनाश पत्करण्यापलीकडे मग त्या राष्ट्राला काही करावयाचेच शिल्लक उरत नाही !

फ्रेंच सरकार, सैनिक आणि जनता ही सारी पराभूत मनोवृत्तीत यावेळी होती. पहिल्या महायुद्धात फ्रेंच सैन्याची जी कत्तल उडाली, तशी पुन: यावेळी उडणार नाही ना ? या भीतीने फ्रेंच सेनापती प्रत्यक्ष लढाई पुढे पुढे ढकलीत होते. पंधरा दिवसांत पोलिश सैन्याचा खिमा उडालेला पाहून तर फ्रेंचांचा उरलासुरला युद्धज्वरही ओसरला. आता तर काय पोलंडमधील सर्व विजयी जर्मन फौजा आपल्यावर कोसळणार, या भयाने फ्रेंच सेनापती गर्भगळीत झाले. फ्रेंचांना वाटले की आपण जर्मनीवर बॉंबफेक केली नाही तरी कदाचित ब्रिटिश विमाने बॉंबफेक करतील ! आणि मग त्याचा वचपा म्हणून जर्मन विमानदल आपल्या सुंदर सुंदर शहरांची, वास्तूंची, शिल्पांची आणि उद्योगधंद्यांची राखरांगोळी करतील. फ्रेंचांनीच उलट ब्रिटिश सेनापतींना विनवणी केली—" जर्मनीवर बॉम्बफेक तूर्त करू नका ! " फ्रेंचांची दोस्तीच आता ब्रिटिशांना लोढणे होऊ लागली.

जमिनीवर व आकाशात लढाईला तोंड लागत नव्हते, तरी सागरावर मात्र आहुती पडायला सुरवात झाली होती. ३–९–१९३९ ते ७–९–१९३९ या पहिल्याच पाच दिवसांत, जर्मन यू बोटींनी अकरा ब्रिटिश जहाजे बुडविली !! ६,४१,५९५ टनांचा हा पहिला तडाखा फारच मोठा होता. याच्या बदल्यात जर्मनीने फक्त दोन यू बोटी गमावल्या होत्या.

## शांततेची हुलकावणी

७ सप्टेंबरनंतर मात्र जर्मनीने यू बोटींची हालचाल अचानक थांबवली. युद्ध चालू असताना ब्रिटनचे त्यावेळचे नाविकदलाचे मंत्री विन्स्टन चर्चिल यांना याचा उलगडा होईना. परंतु युद्धानंतर जेव्हा जर्मन कागदपत्र हाती आले, तेव्हा याचा उलगडा झाला. ॲडमिरल रीडर या जर्मन नाविकदलप्रमुखाच्या त्यावेळच्या लिहिण्याप्रमाणे—

"The general policy would be to exercise restraint until the political situation in the west has become clearer, which will take about a week".

[ सर्वसाधारण धोरण आता थोडे सबुरीचे राहील. पश्चिमेकडील राजकीय गुंतागुंत अजून स्पष्ट नाही. ती स्पष्ट व्हावयास निदान आठवडा लागेल. ]

हे लिहिण्यापूर्वी ७–९–१९३९ ला ॲडमिरल रीडरने हिटलरची भेट घेतली होती. पोलंडमधील येणाऱ्या एकीकडील अद्‌भुत विजयाच्या बातम्या व पश्चिम आघाडीवरील दोस्तांची सामसूम, याचा अर्थ हिटलरने असा केला होता, की युद्ध पुकारले ही गोष्ट मूर्खपणा झाला, हे दोस्तांच्या ध्यानी येऊन युद्धाच्या पवित्र्याबाबतचा फेरविचार दोस्तांच्या गोटात सुरू झाला असण्याची शक्यता आहे. पोलंडचा निकाल तर लागतच आहे. समजा पुन: दोस्त शेवटी शेपूट घालणार असतील तर फारसे युद्ध न करताच, जर्मनीच्या पदरात बरेच काही पडणार आहे. दोस्तांना अशा परिस्थितीत फारसा त्रास न देणे शहाणपणाचे ! आपल्या या चांगुलपणाला प्रतिसाद आला नाही, तर पोलंडमधून लवकरच मोकळ्या होणाऱ्या फौजा, फ्रान्सवर धाडायला कितीसा वेळ लागणार आहे !

२० सप्टेंबरला विल्यम शिरर हा बर्लिनहून आपल्या दैनंदिनीत लिहितो—

"To night the press talks openly of peace. All the Germans, I have talked to today are dead sure, we shall have peace within a week."

[ आज सर्व वृत्तपत्रीय जग उघडपणे शांततेसंबंधी बोलत आहे. मी ज्या ज्या जर्मन माणसाशी आज बोललो, त्या सर्वांची अशी खात्री पटलेली दिसली, की आठवडाभरात शांतता प्रस्थापित होईल. ]

युद्ध संपवण्याच्या दृष्टीने शांततेच्या प्रचारासाठी वृत्तपत्रांतून गोबेल्सने एकदम जोर सुरू केला होता व त्याचा हा परिणाम होता. आदल्याच दिवशी म्हणजे १९ सप्टेंबर, १९३९ ला हिटलरचे राईशपुढे भाषण झाले. त्यात त्याने उघडपणे सांगितले—

"I have no war aims against Britain & France. My sympathies are with the French Govt. What they are fighting for they do not know."

[ ब्रिटन व फ्रान्सविरुद्ध युद्ध करण्याची माझी इच्छा नाही. फ्रेंच सरकारबद्दल मला दया वाटते. ते कशाकरता लढणार आहेत, हे त्यांचे त्यांनाच माहीत नाही. ]

२७ सप्टेंबरला वॉर्सा पडले. दोन दिवसांनी जर्मनी व सोविएट युनियन यांच्यामध्ये मॉस्को येथे 'सीमारेषेचा व मैत्री'चा नवा करार झाला. याची हकीकत वर आलेली आहेच. या कराराबरोबर जर्मनीने व रशियाने एक संयुक्त घोषणा केली.

[ " पोलंडच्या विनाशाबरोबर जे प्रश्न निर्माण झाले, त्यांचा समाधानकारक निकाल लावल्यानंतर जर्मनी व रशिया असे विश्वासपूर्वक जाहीर करू इच्छितात, की जर्मनीचे व इंग्लंड-फरान्स यांचे तूर्त जुंपलेले युद्ध तावडतोब थांबवल्यानेच सर्व लोकांचे कल्याण होणार आहे. परंतु जर आमच्या या शांततेच्या प्रयत्नांना यश आले नाही, तर एकच गोष्ट शाबित राहील की युद्ध चालू राहिले आहे, याला केवळ ब्रिटन व फ्रान्स हेच कारणीभूत आहेत. " ]

हे मूळ इंग्रजी अवतरण संपूर्ण देण्याचे कारण, की हे निवेदन महत्त्वाचे आहे. समजा ब्रिटन– फरान्सने यावेळी पुन: म्युनिक वारी करून शांततेचा सौदा पटविला असता, तर हजार हिश्शाने जर्मनीने आपले पश्चिमेकडील पुढील आक्रमण रद्द केले असते. पूर्वेकडील मात्र केवळ स्थगितच केले असते व वर्षभरात हिटलरने सोविएट युनियनविरुद्ध कुरापती काढून आपला सूड उगविण्याचे सोडले नसते. या युद्धात मग पहिल्या आहुती रशियाला द्याव्या लागल्या असत्या, यात शंका नाही. पुढे हे टळले नाहीच, परंतु जे पुढे घडले, ते पोलंडच्या पाठोपाठच घडले असते ! असे असूनही स्टॅलिनने हिटलरच्या ताटात जेऊन शांततेच्या शेणगोळ्यासाठी ब्रिटन-फरान्सला जबाबदार धरावे, ही घटना विचारात घेतली, की रशियाने दुसऱ्या महायुद्धातील विजयाचे किती श्रेय उपटावे, याचा विचार करणे अंती सोयीचे होईल !

या निवेदनानंतर आठवडाभराने म्हणजे ६ ऑक्टोबरला हिटलरने राईशपुढील आपल्या भाषणात शांततेचा पुनरुच्चार केला. हिटलरने आपल्या प्रदीर्घ भाषणात प्रथमच सांगून टाकले–

" फरान्सजवळ माझी कसलीही मागणी नाही. माझी फरान्सला पुन:पुन: विनंती आहे, की आपल्या पूर्वापार शत्रुत्वाचा इतिहास आपण आता गाडून टाकू. दोन्ही राष्ट्रे आता जवळजवळ आणू ! ब्रिटनविषयी, म्हणाल, तर ब्रिटिशहिताविरुद्ध मी एकही कृत्य केलेले नाही. माझा असा विश्वास आहे, की जर्मनी व इंग्लंड यांच्यामध्ये समझोता राहील, तर केवळ युरोपातच नव्हे, तर जगात खरीखुरी शांतता राहू शकेल–"

चालू युद्धासंबंधी हिटलरने इशारा दिला–

" पश्चिमेकडे युद्ध कशाला पेटवायचे आहे ? पोलंड पुन: होता तसा व्हावा म्हणून ? व्हर्साइल्स तहाने निर्माण केलेला तो पोलंड पुन: कधीही आता उठणार नाही ! नवे पोलिश राष्ट्र कसे असावे, हे पश्चिमेकडे युद्ध करून ठरणार नाही. हा प्रश्न केवळ रशियाचा व जर्मनीचा आहे. लक्षावधी लोकांची जीवितहानी व वित्त-हानी करणे हा आततायीपणा कशासाठी ? जर पोलिश राष्ट्र, जन्मल्यापासून गर्भ-पाताच्या वेदना भोगीत होते – ते राष्ट्र पुन: घडविण्यासाठी ? नाही...! हे पश्चिमे-कडील युद्ध कसलाही प्रश्न सोडवू शकणार नाही ! "

हिटरच्या भाषणाची फेक किती उत्कृष्ट होती, हे पुढील भाषणावरून लक्षात येईल.

–" म्हणूनच पश्चिमेकडील युद्ध-परिस्थिती चालू ठेवणे, हा अविचार होईल. प्रत्येक जाता दिवस अधिक अधिक बळी मागू लागेल. युरोपची राष्ट्रीय संपत्ती काडतुसांच्या रूपाने युरोप खंडात सर्वत्र उधळली जाईल– प्रत्येक देशाचे सर्व चैतन्य रणांगणावर शोषिले जाईल... "

" एक गोष्ट तर खरीच आहे. जगाच्या इतिहासात दोन्ही बाजूंना फक्त विजयच वाटयास आल्याचे उदाहरण नाही. बहुधा दोन्ही बाजूंची हानीच होत असते. ज्यांना हें पटत असेल, त्यांनी माझ्या म्हणण्यात आपला सूर मिसळावा आणि ज्यांना युद्ध हीच प्रश्न सोडवण्याची एकमेव रीती वाटत असेल, त्यांनी खुशाल माझ्या या पुढे केलेल्या सहकार्याच्या हाताचा अवमान करावा–"

हिटलरच्या डोळयांपुढे एकच व्यक्ती या संदर्भात सतत होती. भाषणाच्या अखेरीस चर्चिलचा उल्लेख करूनच हिटलरने सांगितले–

" If, however, the opinion of M/s Churchill & followers should prevail, this statement would have been my last. Then we shall fight..."

[ " परंतु जर चर्चिल आणि कंपनी व त्यांचे अनुयायी त्यांच्याच मताप्रमाणे घडणार असेल, तर माझे हे निवेदन शेवटचे आहे, असे ठरेल. मग लढाई होऊ देच ! " ]

## सेनाधिकाऱ्यांच्या बैठकीत युद्धाची रूपरेषा

ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयात हिटलरने युरोपात शांतता प्रस्थापित करण्यासाठी असा निकराचा प्रयत्न चालू केला असला, तरी दुसरीकडे त्याने 'दोस्तांचे' व प्रथम फ्रेंचांचे कंबरडे ढिले करण्याची जय्यत तयारी चालूच ठेवली होती. त्याने ९ ऑक्टोबरला O. K. W. या आपल्या युद्धविषयक उच्चाधिकार संघटनेला पुढील गुप्त आदेश दिला व यावर चर्चा करण्यासाठी १० ऑक्टोबरला सकाळी ११ वाजता जर्मन सेनाधिकाऱ्यांची बैठक मुक्रर केली.

हिटलरने आपल्या पत्रकात आदेश दिला होता–

–अत्यंत गुप्त

लवकरच हे स्पष्ट होईल की ब्रिटन व ब्रिटनच्या नादाने फरान्स ही दोन्ही राष्ट्रे युद्ध संपविण्याच्या विचारात नाहीत. यासाठी मी अधिक वेळ न दवडता ताबडतोब माझ्या चढाईचा विचार नक्की केला आहे.

यासाठी पुढील आज्ञा देण्यात येत आहेत.

(अ) लक्सेंबर्ग, बल्जियम व हॉलंडमधून चढाईची तयारी करण्यात यावी. हा हल्ला शक्य तितक्या लवकर करावा.

(ब) या चढाईचा हेतू हा राहील, की फरेंच सैन्याचा मोठा भाग व त्यांच्या मदतीला आलेले ब्रिटिश सैन्य यांचा पराभव करून बेल्जम-हॉलंडचा व फरान्सचा बराच मोठा किनारा कबजात घेऊन, इंग्लंडविरुद्ध आकाशात व समुद्रावर चढाईचे युद्ध खेळता यावे.

याविषयी सेनाधिकाऱ्यांनी लगेच विचार करावा, अशी माझी विनंती आहे. या पत्रकारानुसार सर्व वेळापत्रक तयार करण्यात यावे व यासंबंधी वेळोवेळी मला कळविण्याची व्यवस्था व्हावी.

—ॲडॉल्फ हिटलर.

१० ऑक्टोबरला या पत्रकाचा विचार करण्याकरता जेव्हा सेनाधिकाऱ्यांची बैठक भरली, तेव्हा पुढील युद्धाची रूपरेषा स्पष्ट करणारे आणखी एक निवेदन जर्मन कागदपत्रांत उपलब्ध आहे. हे वाचीत असताना हिटलरच्या युद्धविषयक ज्ञानाचा अचंबा वाटू लागतो. युद्ध पुढे कसकसे वळण घेईल, याचा अचूक अंदाज हिटलरने या निवेदनात मांडलेला आढळतो. हिटलर या निवेदनात म्हणतो—

"जर्मनीचा खरा महत्त्वाचा युद्ध-हेतू एकच आहे, की पश्चिमेकडील शक्तीचा कायमचा लष्करी बंदोबस्त ! पश्चिमेकडील राष्ट्रांना यापुढे केव्हाही युरोपातील जर्मनीच्या प्रगतीला आणि भक्कम पायावरील बांधणीला अपशकुन करता येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करावयाची आहे."

"बाहेरील जगाच्या दृष्टीने विचार करता आपला हा आंतरिक युद्धहेतू प्रत्यक्ष सांगताना त्यावर योग्य प्रचाराचे काही संस्कार करावे लागतील. परंतु यापुढे मूळ हेतू बदलणार नाही."

या बैठकीत ब्राऊश, हाल्डर, थोमास जोडल आदि जर्मन सेनानींनी, घाईघाईने पश्चिमेकडे युद्धाचा अधिक भडका उडवण्यास विरोध प्रकट केला. हा विरोध हिटलरला अपेक्षितच होता. म्हणूनच याची उत्तरे हिटलरने लिहून काढलेली होती. पुढे हिटलर म्हणतो—

"पोलंडमधे आपण विजयी झालो. कारण जर्मनी फक्त एकाच आघाडीवर युद्ध करीत होता म्हणून ! आताही तीच परिस्थिती आहे, ही गोष्ट खरी. परंतु ही परिस्थिती अशीच टिकेल याचा भरवसा कुणी द्यावा ?"

"कसलाही करार-मदार करून सोविएट रशियाकडून शाश्वत तटस्थतेची हमी गृहीत धरता येणार नाही. आताच्या लक्षणावरून रशिया फार काळ तटस्थ राहीलसे वाटत नाही ! आठ महिन्यांनी, वर्षाने, काही वर्षांत तरी ही परिस्थिती पालटेल. रशियाच्या हल्ल्यापासून आपल्याला वाचायचे असेल, तर एकच खात्रीचा उपाय आणि तो म्हणजे— त्यालाच जर्मन सामर्थ्याचा हिसका दाखवणे"

जर्मनीला प्रदीर्घ काळ युद्ध करणे शक्य नाही. तडकाफडकी या युद्धाचा निकाल लावला पाहिजे, हे स्पष्ट करताना हिटलरने पुढे बजावले—

" जर्मनीला अनेक बाजूंनी भय आहे. रशिया किंवा अमेरिका आज तटस्थ आहेत. फार काळ ती अशी राहतील याचा भरवसा नाही. आपल्याजवळ धान्यसाठा कमी आहे. युद्धासाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीचा प्रश्न प्रदीर्घ युद्धात अधिकाधिक कठीण होईल. मुख्य धोका आहे तो ऱ्हुर प्रांताला. जर्मनीच्या उत्पादनाचे कोठार जर युद्धात जायबंदी झाले, तर जर्मनीची युद्धशक्ती ढासळण्यास उशीर लागणार नाही."

## सेनापती हिटलर

याच टिपणात हिटलरने हे सुरू झालेले युद्ध कशा पद्धतीने लढावे लागेल, याचे जे मार्गदर्शन केलेले आहे, ते इतके अचूक आहे, की सेनापती म्हणून आवश्यक असणारे सर्व गुण त्याच्यापाशी होते, याबद्दल शंका राहत नाही. त्याने बजावले होते–

" The chief thing is to avoid positional warfare of 1914–18. The armoured divisions must be used for the crucial break through. It is not necessary for them to attack towns at all, but to maintain the flow of the army's advance, to prevent fronts from becoming stable by massive drives through weekly held positions. "

[ १९१४–१८ च्या युद्धाप्रमाणे शहरांवर मोर्चे रोखून हे युद्ध खेळू नका. आपले यंत्रसज्ज सैन्य मुख्यत: शत्रूची फळी महत्त्वाच्या ठिकाणी उद्ध्वस्त करण्याकरता उपयोगांत आणावे. यावेळी शहरांवर हल्ले करण्याचे कारण नाही. या यंत्रसज्ज सैन्याची मुख्य कामगिरी ही राहील, की सैन्याची पुढची वाटचाल रोखली जाणार नाही, हे पाहणे व शत्रूच्या फळ्या या कुठेही ताकदीने उभ्या राहू न देणे. याकरता शत्रूच्या फळीतील कमकुवत भाग हेरून, तेथे या यंत्रसज्ज तुकड्यांनी मोठ्या प्रमाणावर मगदाडे पाडली पाहिजेत. ]

पश्चिमेकडील हे युद्ध सुरू कधी करावयाचे यासंबंधी हिटलरने स्पष्ट बजावले–

" येत्या हिवाळ्यात काही झाले तरी पश्चिमेकडील रणांगण धडाडलेच पाहिजे."

बैठकीला हजर असलेले सेनाधिकारी, इतक्या लवकर हल्ला करू नये, अशी कुजबुज करीत होते. परंतु फ्युररच्या या अखेरच्या बोलण्यानंतर ही कुजबुज बंद पडली.

## यू-बोटींची दशहत

यानंतर आता सागरावरील आपले युद्धही हिटलरने पुन: सुरू केले. १७ सप्टेंबरला आयर्लंडच्या दक्षिणेकडे ' करेजियस् ' (courageuas) ही ब्रिटिश विमानवाहू बोट जर्मन यू-बोटीने टॉरपेडो मारून बुडवली. ' ड्यूश्लँड ' व ' ग्राफ्-स्पी ' ही जर्मन आरमारी जहाजे आता पुन: आपला गुप्त आसरा सोडून समुद्रात उतरली व त्यांनी

ब्रिटिश व्यापारी जहाजांची शिकार सुरू केली. १५ ऑक्टोबरपर्यंत या दोन जहाजांनी आणखी सात ब्रिटिश मालवाहू जहाजांना जलसमाधी दिली.

परंतु ब्रिटिशांना जर्मन यू-बोटींनी खरी दहशत निर्माण केली, ती 'रॉयल ओक' ही नांगरून पडलेली युद्धनौका असल्या जागी समाधिस्थ झाली तेव्हा! स्कापा-फ्लो (scapa-flow) येथील ब्रिटिश नाविकतळावर असलेली ही प्रचंड नौका जर्मन यू-बोटीने टॉरपेडो मारून बुडवली. या युद्धनौकेवरील सेनाधिकारी आणि सैन्य मिळून ७८६ जण या नौकेबरोबरच समुद्रतळाला गेले.

ब्रिटिशांनी जर्मन यू-बोटींचा धसका घेतलेला असतानाच, हिटलरने पश्चिमेकडे युद्ध लवकर सुरू करा, असा लकडा जर्मन सेनाधिकाऱ्यांच्या मागे लावला व तो पोलंडची व्यवस्था लावण्याच्या उद्योगात आता निमग्न झाला.

## पोलंडमधील 'घरसफाई'

१० सप्टेंबरपासून पोलंडमध्ये ज्यूंची कत्तल झाल्याच्या बातम्या सर्वत्र प्रसृत होऊ लागल्या होत्या. हिटलरने या बाबत सेनाधिकाऱ्यांना २२ ऑगस्टलाच इशारा दिला होता– "Things would happen which would not be to the taste of German Generals" – 'अशा काही गोष्टी घडतील की ज्या जर्मन सेनाधिकाऱ्यांना फारशा रुचणार नाहीत.' हे पूर्वीच बजावण्याचे कारण असे होते की जो ज्यू-द्वेष नाझी राजवटीला मंजूर होता, तो जर्मन सैन्याला रुचणारा नव्हता. जर्मन सैन्याची परंपरा ही काही नाझींनी सुरू केलेली नव्हती. शतकांचा इतिहास या सैन्यामागे होता व युद्धातही कसे वागावे याचे सामान्य नियम हे सैन्य शिरसावंद्य मानण्याची अधिक शक्यता होती.

हेनरिच हिमलर या S-S. संघटनेच्या पुढाऱ्यांकडे जिंकलेल्या प्रदेशातील घर-सफाईचे हे काम होते. देशातील ज्यू, मध्यमवर्गीय नेतृत्व, पाद्री आणि नाझी राजवटीचे पैसेवाले विरोधक या सर्वांना यमसदनाची वाट दाखविण्याच्या या निर्घृण कार्यक्रमाचा परवलीचा शब्द होता– House cleaning– सदन सफाई ! २१ सप्टेंबरला हिमलरने हायड्रीच या आपल्या प्रमुख सहकाऱ्याला सदनसफाईचा आराखडा घेऊन जनरल हाल्डर यास भेटण्यास सांगितले. या आराखड्याप्रमाणे सर्व ज्यू जनता ही खेड्यापाड्यांतून उखडून काढून, त्यांना शहरांत एकत्र करण्याचा कार्यक्रम अग्रभागी होता. शहरांत एकत्र आणल्यावर त्यांचे काय करायचे या संबंधीचा निर्णय मात्र गुप्त ठेवलेला होता.

पोलंडचा काही भाग रशियात समाविष्ट झाला. डॅन्झिग, कॉरिडॉर व अधिक काही भाग जर्मन राईशमध्ये समाविष्ट झाला. या काटछाटीनंतर जो पोलंड उरला, त्यासाठी १२ ऑक्टोबर रोजी हिटलरने हान्स फ्रँक ( Hans Frank ) याची गव्हर्नर जनरल म्हणून व सेयस् इन्कार्ट या देशद्रोह्याची फ्रँकचा प्रमुख सहकारी म्हणून नेमणूक जाहीर केली.



ऑस् विझ् कॅंप......कथा कुणाची व्यथा कुणा !!

★

हान्स फ्रँक् हा नाझी संघटनेत १९२७ साली दाखल झालेला वकील होता. त्याला कायद्याचे ज्ञान होतेच, परंतु त्याने वाङमयाचाही विपुल अभ्यास केलेला होता. पाच मुलांचा हा पिता, हिटलरच्या प्रभावळीत त्यातल्यात्यांत काहीसा मृदु स्वभावाचा भासत होता. परंतु त्याने आपल्या या नवीन अधिकारपदावर आल्यावर, आपल्या दैनंदिन जीवनाची, ४२ विभागांची जी प्रचंड रोजनिशी लिहून ठेवली आहे, ती वाचीत असताना हा दिलेल्या कामात वाकबगार असल्याची जशी ग्वाही मिळते, त्याप्रमाणे तो किती उलटया काळजाचा व निर्घृण बनला होता, याचेही दर्शन होते.

## हान्स फ्रँकची क्रूर फुशारकी

न्यूराथ या बोहेमियाच्या नाझी सुलतानाने सात लोकांना मृत्युदंड दिला व त्याचे वृत्त भित्तिपत्रके लावून प्रागमध्ये सर्वांना कळवले, ही गोष्ट जेव्हा हान्स फ्रँकच्या कानी गेली तेव्हा तो उद्‌गारला–

" मी जर गोळ्या घालून मारलेल्या प्रत्येक सात पोलिश माणसांमागे अशी पत्रके लावावयाची ठरवली असती, तर या पत्रकांसाठी लागणारा कागद निर्माण करण्यासाठी पोलंडची सर्व जंगलेही पुरणार नाहीत. "

हिमलर व हायड्रिच यांच्याकडे मुख्यत: पोलंडमधील ज्यूंचा नि:पात करण्याचे काम हिटलरने सोपवलेले होते. फ्रँक हा या बाबतीत त्यांचा आता प्रमुख सहाय्यकर्ता

होता. क्रॅको येथे सेनाधिकाऱ्याशी बोलताना त्याने वर्षभराने अभिमानाने सांगितले–

" ज्यूंविषयी म्हणाल, तर मी स्पष्टपणे सांगतो, की या ना त्या मार्गाने त्यांचा निकाल लावलाच पाहिजे. मित्र हो ! या बाबतीत दयेचा स्पर्शही मनाला होऊ देऊ नका. ज्यूंचा नाश हा करायलाच हवा. "

पोलंडमधील ३,५०,००० एवढ्या सर्व ज्यूंना कसे नाहीसे] करणार, हाच काय तो त्याच्यापुढे प्रश्न होता !

याविषयी हान्सने सांगितले–

" या सर्वच्या सर्व ज्यूंना गोळ्या घालणे किंवा विषप्रयोगाने मारणे शक्य नाही. परंतु या बाबतीत माझे सरकार काहीतरी मार्ग काढीलच. "

हा मार्ग काय निघाला असेल ? २१ फेब्रुवारी, १९४० ला ऑसविझ् (Auschvitz) येथे नवा कॉन्सेंट्रेशन् कॅम्प उघडण्यात आला. या कॅम्पला लागूनच फार्बेन कंपनीने आपला रासायनिक तेलाचा व रबराचा कारखाना सुरू केला. लक्षावधी पोलिश व ज्यूंना येथे कामाला जुंपण्यात येऊन अखेर त्यांच्या कत्तली नानाप्रकाराने करण्यात आल्या. जोसेफ क्रॅमर व रुडॉल्फ-फॅन्झ-होएस (Hoess) हे दोघे येथील कैद्यांच्या श्रमदानावर हुकमत ठेवण्यासाठी १९४० सालीच येथे दाखल झाले. यांपैकी होएस् याने न्यूरेन्बर्ग येथील साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून मोठ्या अभिमानाने सांगितले,

" ऑसविझ येथे मी सुमारे २,५०,००० माणसांचा अंत झालेला पाहिला व याशिवाय सुमारे ५०,००० लोक भुकेने व व उपासमारीने मृत्युमुखी पडले. "

## हत्याकांड-शिकवणीकडे दुर्लक्ष

नाझी राजवटीचा हा ज्यू-द्वेषाचा व अंकित प्रदेशातील हत्याकांडाचा इतिहास भारताच्या फाळणीच्या वेळी सरहद्दीवर झालेल्या हत्याकांडाइतकाच भीषण व हृदयद्रावक आहे. हा कोळसा जितका उगाळावा तितका काळाच राहाणार आहे. वर्षानुवर्षे एखाद्या जमातीविरुद्ध एखाद्या देशात जर द्वेषाचीच शिकवण दिली गेली, विवक्षित जमात ही परमेश्वराच्या लेखीच कमी दर्जाची आहे, त्यांच्या स्त्रिया, वित्त-प्राण साऱ्या लुटण्याच्या वस्तू आहेत, अशा भयानक शिकवणीने जर पिढीच्या पिढी वाढविली गेली, तर माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना न घडल्या तरच नवल ! दुर्दैवाचा भाग इतकाच राहतो, की हे सर्व ज्यांना भोगावे लागते, त्यांच्या घरादाराची, अब्रूची राखरांगोळी होऊन लक्षावधी माणसे मृत्युमुखी पडल्यानंतरही अशा गोष्टींविरुद्ध कायमचे उपाय योजण्यास मानवप्राणी अजून असमर्थ ठरला आहे. जर्मनीच्या सरहद्दीच्या आतच हा ज्यू-द्वेष व जर्मन जातीच्या वर्चस्वांचे तत्त्वज्ञान शिकवले गेले. शेजारच्या प्रदेशांतील जनता या प्रकाराकडे उपेक्षेने पाहात राहिली. इथे सारी चूक [झाली. देशाच्या सरहद्दी ओलांडून ही झिंगलेली पिढी चौखूर उधळली आणि त्यांनी लक्षावधींच्या आयुष्यांना चूड लावली.

या हत्याकांडाना जबाबदार असलेल्या हायड्रिचचा यथावकाश खून पडला. जे नाझी राजवटीचे म्होरके होते, ते न्यूरेन्बर्गला फासाच्या दोरीत अडकविले गेले. परंतु म्हणून जे लक्षावधी निरपराध मारले गेलें, त्यांची आयुष्ये थोडीच परत येणार आहेत ?

एखादा हायड्रिच, एखादा हिमलर, एखादा हान्स फ्रँक किंवा एखादा होएस हाच असा होता—बाकी सर्वांना याचा का दोष देता, अशी पळवाटही अशा सामुदायिक गुन्ह्यांच्या बाबतीत असू शकत नाही. फार्बेन कंपनीसारख्या जगप्रसिद्ध कंपनीने ऑसविझ कॅम्पमध्ये मरणावारी फुकट कामगार मिळत आहेत, म्हणून या प्रकारात सहभागी का व्हावे ? सर्वसामान्य जनतेने या प्रकारांचा प्रकट निषेध ठिकठिकाणी का केला नाही ? हे सर्व असंख्य सत्प्रवृत्त जर्मन लोक 'प्राणभये लपो गेले; ' असे झाले असेल, तर ' राज्य सर्वही बुडाले, ' याबद्दल तेही तितकेच दोषी राहतात.

[ अपूर्ण ]


फोन्स : पुणे : ५६४२८ ॥ श्री ॥ तारेचा पत्ता : श्री { पुणे / श्रीपूर
श्रीपूर : पी. सी. ओ.

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस : ९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे २
फॅक्टरी : श्रीपूर, व्हाया अकलूज, जि. सोलापूर

卐 卐 卐

शुभ्र दाणेदार साखरेचे आणि रेक्टिफाईड
व डिनेचर्ड स्पिरिटचे उत्पादक

*बृहन्महाराष्ट्रातील मध्यमवर्गाने गुंतविलेल्या भांडवलावर यशस्वीरीतीने चालू असलेला हा साखर कारखाना मध्यमवर्गीयांचे भूषण होय ।*

**गो. श्री. वाळिंबे**
बी. कॉम्
ऑफिशिएटिंग मॅनेजर

**शं. ल. लिमये**
बी. एस्सी., एल्एल्. बी., वकील,
अध्यक्ष

‘तमाशा’ सरकार करते !


# मग तमाशा परिषद कशाला ?

—एक तमाशाशौकीन

मराठी तमाशा परिषदेचे पाचवे अधिवेशन मडगाव (गोवा) येथे भरण्याचे ठरले आहे, असे तमाशा–वर्तुळातील चर्चेवरून दिसते. एप्रिल, १९६४ मध्ये पुणे येथील कॉंग्रेसभवनात कार्यकारिणीची बैठक भरली होती. त्यात धुळे येथे अधिवेशन घ्यावे, असे ठरले व त्याप्रमाणे खानदेश विभागाचे आनंदराव महाराज व श्री. न. भि. जांगडा यांनी आमंत्रण स्वीकारले. धुळे येथे ऑक्टोबर, ६४ ला कार्यकारिणीची बैठकही भरली, पण त्यात धुळयाचे कार्यकर्ते हजर राहिले नाहीत. इतकेच नव्हे तर तेथील कार्यकर्त्यांचा विरोध दिसून त्यावर वृत्तपत्रांतून बरीच चर्चा पण झाली. शेवटी अधिवेशन कुठे घ्यावे, यासाठी एक समिती नेमली व त्यानुसार मडगाव हे केंद्र ठरविले असावे; पण गोव्यात पुरेशा मराठी भाषिकांची वानवा. त्यात त्यांना आपल्याकडील तमाशे पटतात काय, त्याकरता मूळ तेथे किती तमासगीर आहेत, या गोष्टींचा विचार कार्यकारिणीने केला का ? तमाशा–वर्तुळात हिंडताना असे दिसून येते की हे असे का होते ? याचा बोध तमासगिरांना होत नाही.

श्री. ग. ल. ठोकळ यांचे अध्यक्षतेखाली कोल्हापूर येथे मराठी तमाशा परिषदेचे अधिवेशन झाले. त्यावेळी पुणे–मुंबई वाद माजून शेवटी दोन्ही परिषदांचे एकत्रिकरण श्री. नाशिकराव तिरपुडे यांचे मध्यस्थीने झाले. पुण्यात १९५५ साली महाराष्ट्र तमाशा परिषद स्थापन झाली होती. तिचे कार्य कै. नानासाहेब गोखले, श्री. अहंमदशेठ तांबे, कै. भाऊसाहेब नारायणगावकर, श्री. पोपटलाल शहा व श्री. राजाभाऊ थिटे या मंडळींनी तन–मन–धन अर्पण करून केले. तमासगिरांची उन्नती व्हावी, हा त्यामागील हेतू. आजच्या परिषदेत ही मंडळी कुठे आहेत ? श्री. अप्पा इनामदार यांच्यासारखा गुणी माणूस हा संघटनेपासून बाहेर का राहतो ? ही चर्चा आज तमासगीर-वर्तुळात होत आहे.

कोल्हापूर, जळगाव, बीड व सांगली या ठिकाणी अधिवेशने झाली. पुण्यात चार अधिवेशने झाली. मुंबईस एक; अशी ९ अधिवेशने १९५५ ते ६५ पर्यंत झाली. परंतु १९५५ ते ६१ चा उत्साह आजच्या कार्यकर्त्यांत का नाही ? १९५५ ते ६१ मराठी



गुलाब संगमनेरकर — संगीत बारी

साहित्यिकांनी शाहिरीवाङमयाचा अभ्यास व संशोधन करून आपली लेखणी झिजवली. दुर्गा भागवत यांचे "लोकसाहित्याची रूपरेखा", डॉ. सरोजिनी बाबर यांचे "स्त्रीधन" व इतर पुस्तके, श्री. य. न. केळकर यांचे "अंधारातील लावण्या," श्री. राजाभाऊ थिटे यांचे "शाहीर हैबती," इतकेच काय "सांगते ऐका", "रंगपंचमी"-सारखे चित्रपट व "माळावरची माणसं"," ऐका हो ऐका" यासारखी नाटके तमासगिरांच्या जीवनावर त्या कालांत प्रसिद्ध झाली. इंडियन नॅशनल थिएटर–मुंबई; लोक-साहित्यसंग्रह–नागपूर; लोकहितवादी मंडळ–नाशिक या ठिकाणी तमाशा–महोत्सव झाले. सरकारने करमणूक-कर रद्द करून तमासगिरांना मानधन सुरू केले. त्यांचा सत्कार केला. इतकेच नव्हे तर कै. मामा वरेकर यांच्या सहकार्याने बापूसाहेब नारायणगावकर यांना दिल्लीत राष्ट्रपतिपदक मिळाले. हा सर्व प्रचार व प्रगती १९५५ ते ६१ पर्यंतची आहे, पण १९६१ ते ६५ या सालांत तमाशा-परिषद स्वस्थ कशी? ती काय करते आहे?

## खितपत पडलेले 'अस्सल' कलावंत

वरील विवेचनाचा अर्थ असा कोणी लावू नये की मराठा तमाशा परिषद, तिचे कार्यकर्ते किंवा तिचे सेक्रेटरी व अध्यक्ष काहीच काम करीत नाहीत. श्री. रंगराव पाटील गेली चार वर्षे अध्यक्ष आहेत. त्यांच्या कारकीर्दीत तमाशा महोत्सव सरकारी झाला. त्याला त्यांची मदत चांगली होते. सेक्रेटरी श्री. बाळासाहेब गोरे दिवसभर कचेरीतील काम पाहतात, तमाशा महोत्सवात जातात. इतकेच नव्हे तर राघाबाई

बुधगावकर यांचेबरोबर ते सरकारतर्फे नेफा आघाडीवर पण गेले होते. नागू भागू माळी नेफा आघाडीवर जाऊन आले. अहमदशेठ तांबे कोकणात सरस्वती कोल्हापूरकर यांचा फड घेऊन त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करीत आहेत, पण कित्येक तमाशांचे फड आजही बसून आहेत. त्यांची व्यवस्था काय ? मुंबईत तमाशाचे हनुमान थिएटर बंद पडले. त्यामुळे तीस चाळीस तमासगिरांचा आश्रय बुडाला. त्यातच श्री. विनायकराव भावे यांचे सल्ल्याने आणखी एक तमाशा परिषद स्थापन होऊन तिचा एक सवतासुभा निर्माण झाला आहे. तळेगाव दाभाडे येथे तीन-चार संगीतबाऱ्या बसून आहेत. बाबूराव पुणेकरसारखा तमासगिरांचा सम्राट, ज्यांनी आपले आयुष्य या व्यवसायात घालविले, त्याचे काय चालले आहे ? बाबूराव कुरणकर, रामा नामा लवळेकर, लीलाबाई मांजरेकर, तसेच हिरा हौसा सासवडकर, अनुसया कवठेकर, बकुळा इस्लामपूरकर असे अनेक फड आज देशोधडीस लागले आहेत. कौसल्या कोपरगावकर, मामा पंढरपूरकर यांच्यासारख्या जुन्या लावणी गायिका ! आज त्यांना तीन ते पाच रुपये रोज मिळू नयेत, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. लोकनृत्याच्या नावाखाली कोणीही उठतो—एक ढोलकीवाला व दोन नाचणारणी घेऊन तमाशाचे हिडीस स्वरूप दाखवीत सुटतो. जाहिरातीच्या युगात प्रेक्षक तिकडे जात आहे. त्यामुळे जुना तमाशा, जुने तमाशा-वाङमय, जुने तमासगीर यांचे पोटापाण्याचा प्रश्न, हा खरा परिषदेपुढील कार्यक्रम असताना त्याचा विचार परिषदेमार्फत का केला जात नाही ? तो व्हावयास पाहिजे. त्यासाठी परिषदेने अनेक ठराव केले. ते तसेच दप्तरी दाखल झाले. त्याचे लोण अद्याप तमासगिरांपर्यंत पोचत नाही. आज बापूसाहेब नारायणगावकर बसून आहेत. त्यांना कायम स्वरूपाचे वेतन काय आहे ? ते अपंग आहेत. असे अपंग-वृद्ध अनेक तमाशा-कलावंत आज खितपत पडले आहेत. त्यांची नोंद झाली पाहिजे. हे प्रमुख कार्य परिषदेने आता तरी हाती घ्यावे, हाच हेतू या लेखामागे आहे.

## नवीन भर कुठे आहे ?

सरकारी यंत्रणेत तमाशाला व तमाशा-कलावंतांना मानाचे स्थान मिळाले, पण ते टिकविण्याचे कामसुद्धा तमाशा-कलावंतांचे आहे. पठ्ठे बापूरावच्या लावणीशिवाय किंवा गणगवळीशिवाय कोणी नवीन वग प्रेक्षकांना दाखवीत नाहीत. ते सादर करण्याची कला व कुवत पण नाही. दत्तोबा तांबे शिरोलीकर, जगताप पाटील पिंपळेकर, धोंडू कोंडू पाटील, शिवा संभा कवलापूरकर, नागू भागू माळी, रसूल पिंजारी, रंगनाथ लोहार, माधव नगरकर, भाऊ बापू मांग, नारायणगावकर किंवा सरस्वती कोल्हापूरकर, तसेच रामा नामा लवळेकर, दामाजी कोरेगावकर किंवा कै. तुकाराम खेडकर यांच्या फडात चार वगांशिवाय पाचवा नवीन वग नाही, नवीन फार्स नाही, नवीन गवळणी नाहीत की नवीन ढोलकीवाला नाही. याचे कारण प्रेक्षकांकडून त्यांना तशी मागणी नाही. संगीतबाऱ्यात तीच तऱ्हा. गुलाब

संगमनेरकर, राधाबाई बुधगावकर, लता लंका इंदुरेकर किंवा जळगावकडील बाप्या यांच्यात लावणीगायिका नाहीत. सिनेसंगीत व त्यावर नाच, हे त्यांचे प्रमुख आकर्षण! सवाल-जबाबच्या खडया सुरातील नाचणारणी नाहीत. किसन कुसगाव-कर, दादू मारुती इंदुरीकर, विनोदमूर्ती खंडेराव यांचेखेरीज सोंगाडया नाही. ही आजच्या तमाशाची हीन अवस्था आहे. सरकार दरवर्षी जवळजवळ साठ हजार रुपये खर्च करून चार पाच ठिकाणी तमाशाचा उरूस भरविते. पण त्यांत काय पाहावयास मिळते ? तेव्हा आज तमाशाशोकिनांना काय पाहिजे असे विचारले, तर प्रमुख शहरांत चांगले थिएटर, जाणकार ढोलकीवाले व हलगीवाले, नवीन सोंगाडे व सरदार, तसेच लावणीकार व नवीन नाचणारणी! त्यासाठी त्यांना तयार करण्यास तमाशाकलेचे शिक्षण देण्यास एक केंद्र हवे व तसे केंद्र पुण्यास पाहिजे. मराठी तमाशा-परिषदेने असे केंद्र स्थापून त्यात ढोलकी शिकविणारे म्हणून सैदूबाबा किंवा शंकर अवसरीकर, वगाचे शिक्षण देण्यास बाबूराव पुणेकर, बाबूराव कुरणकर, लीलाबाई मांजरेकर किंवा वाघोलीकर, रखमाजीबुवा, दामाजी कोरेगाव-कर किंवा रामानामा लवळेकर यांचेसारखे जुने सरदार, गायन, नाच यांसाठी जोहरबाई जळगावकर, राधाबाई बुधगावकर, हिरा अवसरीकर किंवा गोदावरी पुणेकर किंवा ताराबाई कलेढोणकर, मामा पंढरपूरकर यांना शिक्षक नेमून त्यांना दरमहा मानधन दिल्यास नवीन कलावंत निर्माण होतील. जुन्यांना पोटा-पाण्याचा व्यवसाय मिळेल. तसेच शहरांतील प्रमुख गावी खास तमाशाकरता थिएटर, कला-वंतांचे मुला-बाळांना शिक्षण, औषधपाणी व राहण्यास जागा यांची योजना आखून ती कार्यान्वित केल्यास सरकारकडून खासगी ग्रँट मिळेल. सरकार म्हणते, परिषदेचे कार्य अगर योजना दिसल्याखेरीज आम्हांस ग्रँट मंजूर करता येत नाही. गेल्या चारी अधिवेशनांचे हिशेब छापून कलावंत सभासदांना दिले पाहिजेत. कलावंतांची जंत्री करून पुस्तक छापण्याचे काम चालू आहे; पण त्या समितीची अजून सभा नाही!! त्यावरून सभासदांकडून वर्गणी एक रुपया गोळा केली व फडाकडून पाच रुपये घेतले, तरी दोन हजार रक्कम परिषदेकडे सहज जमा होईल. नामवंत फडांचे कार्यक्रम परिषदेच्या मदतीसाठी केले, तर ते उत्पन्न परिषदेला कमीत कमी पाच हजार रुपये होईल. हे उत्सव सरकार करते, त्याऐवजी ते परिषदेने केल्यास त्याचा फायदा परि-षदेस मिळेल; पण हे काम करण्यास कार्यकर्त्यांनी निःस्वार्थ बुद्धीने कामास लागले पाहिजे व याचा विचार यंदाचे अधिवेशनात झाला पाहिज. ● ● ●



# न्यूझीलंड संघाला निरोप

न्यूझीलंड क्रिकेट संघाचे भारतभ्रमण आता संपले आहे. दिल्ली कसोटी सामना भारताने जिंकला. शेवटचा दीस गोड झाला.

: १ :

पहिला कसोटी सामना मद्रासला २७ फेब्रुवारीला सुरू झाला. या सामन्यात पहिल्या डावात इंजिनीयरने काढलेल्या ९० धावा व दुसऱ्या डावातील मांजरेकरचे शतक एवढंच उल्लेखनीय...बाकी सगळा कूर्मगती खेळ. खेळाचे जाऊ द्या. प्रेक्षकांचे काय ? के. एस्. नरसिंहन लिहितात—

"गेल्या दहा वर्षांत आर्थिकदृष्टया तोटयात आणणारा हा पहिलाच कसोटी सामना ! सामन्याचे चारी दिवस तंबू बरेचसे रिकामे होते. ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या सामन्यात खच्चून भरलेले तंबू यावेळी मोकळे मोकळे वाटत होते..."

या कसोटी सामन्यात सर्वांत लाजिरवाणी गोष्ट कुठची असेल, तर निर्बुद्धपणे मैदानावर पुन: पुन: येणारी मुलांची धाड ! मैदानावर काही विशेष घडत होते असेही नाही ! काही जण तर खेळपट्टीवर हुदडून जात. दोन्ही संघांचा खाना झाला त्या वेळी नबाब पतौडीने याविषयी काही उपाय करा, अशी विनंती मद्रास क्रिकेट ॲसोसिएशनला केली.


हा सामना अनिर्णीत रहाणारच, अशी पतौडीची पहिल्या दिवसापासूनची खात्री होती. R. G. हे लिहितात—

"सामना सुरू होण्याच्या दिवशी सकाळीच मी लाला अमरनाथ व नबाब पतौडी यांची भेट घेऊ शकलो. दोघांनी खात्रीपूर्वक सांगितले की सामना अनिर्णीतच राहणार..."

सामना सुरू होण्यापूर्वीच तो अनिर्णीत राहणार. अशी खात्री देणारा हा संघनायक निदान निश्चित प्रामाणिक होय.

या सामन्यात मांजरेकरने शतक लावून निवडसमितीची बाकी पंचाईत केली. ५५ कसोटी सामने खेळल्यावर त्याला डच्चू देण्याचा विचार निवडसमितीच्या मनात यऊ लागला, तोच त्याने शतक ठोकले. परंतु ५५ हे निवृत्तीचे 'वय' आहे, असे स्वत: मांजरेकरनेच ठरविले व हा पेच तूर्ततरी सुटला आहे. आमचा असा होरा आहे, की वेस्टइंडीज संघ भारतात आलाच, तर मांजरेकराला पहिल्या कसोटी सामन्यात घेतल्यावाचून भारताचा तरणोपाय नाही !

या सामन्यातील आणखी एक विशेष म्हणजे जार्विस याने १२३ मिनिटे खेळून



**रीड – पतौडी**

९ धावा काढल्या व हे पाहायला आलेले प्रेक्षक तंबूत बसले ! मागे ऑस्ट्रेलियात ट्रेव्हार बेलीने १२५ मिनिटांत ८ धावा काढल्या होत्या. हा दुसरा विक्रम !

बरी आठवण झाली. जयसिंहाच्या कसोटीतील १५०० व बोर्डेच्या २००० धावा पुऱ्या होण्यास या सामन्याची मदत झाली.

: २ :

## न्यूझीलंडचा भूगोल

दुसरा कसोटी सामना कलकत्त्याला सुरू झाला. रेडिओमोवती गर्दी केलेल्या शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना न्यूझीलंड कोठे आहे, असा 'भलताच' प्रश्न मी विचारला. त्याची उत्तरे—

"न्यूझीलंड म्हणजे आयर्लंडच्यासारखेच इंग्लंडात आहे !"

"सिलोनच्याखाली !"

"बरीच बेटे आहेत—"

जाऊ द्या ! कुठे का असेना. पाहू नकाशात, पण न्यूझीलंडचे एकंदर क्षेत्रफळ आहे १,०३,४१६ चौरस मैल. लोकवस्ती आहे सुमारे २० लाख ! आपल्या मुंबई शहराचीच लोकसंख्या ४० लाखांहून अधिक आहे !! आपल्या देशाचे क्षेत्रफळ आहे

१२,६१,५९७ चौरस मैल आणि लोकसंख्या ४५ कोटी (कुटुंबनियोजनामुळे काय प्रमाण घटले असेल ते असेल).आता न्यूझीलंडच्या १५ खेळांडूत तीन द्रुतगती गोलंदाज होते आणि भारतात...? फक्त एक ! रमाकांत देसाई !! लोकसंख्येच्या हिशोबात निदान २५० द्रुतगती गोलंदाज असायला हरकत नव्हती. का नाहीत ? आपले क्रिकेट कंट्रोल बोर्ड द्रुतगती गोलंदाजांचाच "बर्थ कंट्रोल" करतो, त्याला तुम्ही आम्ही काय करणार ?

रमाकांत देसाईला ऑस्ट्रेलियाविरुद्ध का निवडले नाही...! बहुधा त्याला न्यूझीलंडकरता राखून ठेवलेला असावा. परंतु न्यूझीलंडविरुद्धच्या मागील कसोटी सामन्यातही तो नव्हता ! पण जेव्हा का मॉटझ्ने मद्रासला जयसिंह, बोर्डे व पतौडी यांच्याच विकेट्स् काढल्या, तेव्हा बोर्डाच्या लक्षात आले...द्रुतगती गोलंदाज एखादा हवाच बरं का ! त्यालादेखील विकेटस् पडतात !!

सांगायची गोष्ट, रमाकांत देसाईला कलकत्त्याच्या दुसऱ्या कसोटी सामन्याकरता निवडण्यात आले, हे या सामन्याचे वैशिष्टय. रमाकांतने न्यूझीलंडची आघाडीची जोडी आल्याआल्या फोडली व १२८ धावा देऊन चार बळीही घेतले. अर्थात न्यूझीलंडने ४६२ धावसंख्या रचल्यामुळे सामना अनिर्णीत राहिलाच. या सामन्यातील लक्षणीय गोष्ट म्हणजे न्यूझीलंडकडून प्रथमच कसोटी सामन्यात खेळणाऱ्या ब्रूस टेलरने शतक केले. वारलेट हा खेळाडू दौऱ्यावर निघाल्यावर विमानात आजारी पडला व त्याच्याऐवजी टेलरला निवडण्यात आले. यावेळीही सिंक्लेअर आजारी न पडता तर टेलरला संधी मिळणे कठीण होते. टेलरने या पहिल्या सामन्यात शतक करून जगातील अशा तीस खेळाडूंत एकाची भर घातली. याशिवाय त्याने पाच बळी घेतले. पहिल्याच कसोटी सामन्यात शतक व शिवाय पाच बळी हा बहुधा जागतिक विक्रमच असेल.

: ३ :

## मुंबईचे प्रेक्षक

दुसरा कसोटी सामना संपवून न्यूझीलंड संघ ९ मार्चला मुंबईत दाखल झाला..

मुंबईत पाऊल ठेवताच संघनायक जॉन रीड यानेही मन्सूर पतौडीच्या सुरात सूर मिसळला––

"भारत व न्यूझीलंड क्रिकेट संघातील चार दिवसांचे सामने निकाली ठरण्याची शक्यता नाही."

म्हणजे आता मन्सूर अली आणि जॉन रीड या दोघा संघनायकांच्या मते तिसरा सामना सुरू होण्यापूर्वीच तो अनिर्णीत राहणारच, याविषयी शंकाच नव्हती.

११ मार्चला वॉल्टर हॅडली या न्यूझीलंडच्या व्यवस्थापकाने आपल्या संघाच्या दर्जाचे जाहीर सर्टिफिकेट दिले––

" भारत व पाकिस्तान क्रिकेट संघाचा दर्जा साधारणत: सारखाच आहे. "

१२ मार्चला तिसरा सामना सुरू झाला. देसाई अर्थात संघात होता. पहिल्या दिवशी पाच खेळाडू बाद झाले, त्यांतले तीन बळी देसाईचे होते. परंतु देसाईने खरा हिसका दाखवला तो दुसऱ्या दिवशी. दुसऱ्या दिवशी सकाळी रीड व टेलर यांच्या तीन बळींनी त्याने न्यूझीलंडचा डाव २९७ धावांत संपवला. देसाईचे यांत एकूण सहा बळी होते. फक्त ५६ धावा देऊन.

अर्थात न्यूझीलंड संघ १३० षट्के खेळला, तर भारतीय संघ फक्त ३३ षट्के ! ! मॉट्झ् टेलर, कॉंग्डन यांनी भारताचा पहिला डाव ८८ धावात खतम् केला. सामना रंगू लागला. दुसऱ्या दिवशी एकंदर १६ विकेटस् पडल्या.

| | | |
|---|---|---|
| पहिले शतक | ४०० मिनिटे | १० चौकार |
| दुसरे शतक | १४८ मिनिटे | १५ चौकार |

दुसऱ्या शतकाचे स्वरूप झंझावाती होते. मुंबईचे प्रेक्षक खूष झाले.

दुसऱ्या डावात १४८ मिनिटांच्या खेळात न्यूझीलंडचा संघ जेव्हा गडगडू लागला तेव्हा प्रेक्षक अक्षरश: उड्या मारू लागले. परंतु यूल व मॉटझ् यांनी प्रेक्षकांची निराशा केली ! !

खेळ चांगला झाला. आता या मुंबईच्या प्रेक्षकांची एक आठवण सांगायची आहे.

५५-५६ साली याच मुंबईत रीड व सटक्लिफ हे पराभव टाळण्यासाठी खेळत असताना ... प्रेक्षकातून कुणीतरी फटाका लावला. फटाक्याच्या आवाजाने सटक्लिफ गोंधळला व त्याची दांडी उडाली.

जॉन रीड खेळत आहे, तोपर्यंत पराभव होणार नाही, हे ओळखून मग प्रेक्षकांनी प्रत्येक चेंडूला ' बो ऽऽऽ ' असा प्रचंड घोष सुरू केला. जॉन रीडने हात करून तो थांबवण्याची विनंती केली, तेव्हा हा घोष उलटा जोराने सुरू झाला. शेवटी विषादाने–हा खेळ नाही–हे ओळखून रीड आपली विकेट देऊन तंबूत गेला.

या वेळी अशाच परिस्थितीत मुंबईच्या प्रेक्षकांनी यूल व मॉट्झ् यांच्या विकेटस् घेतल्या नाहीत, याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

: ४ :

## शेवटचा दीस

चौथा कसोटी सामना राजधानीत १९ मार्चला सुरू झाला. या सामन्यातील प्रमुख गोष्ट म्हणजे पहिल्या दिवशी कॉंग्डनचा बळी देसाईला मिळाला नाही व त्याने दोन षटकार मारून चांगल्या ४८ धावा केल्या. वेंकटराघवन याने पाच बळी पहिल्या दिवशीच घेतले. सरदेसाईने पुन्हा शतक केले. पतौडीने शतक केले. ४६५ धावसंख्येवर आठ गडी बाद असताना भारताने डाव सोडला ! दुसऱ्या डावातही वेंकटराघवनने चार बळी घेतले. परंतु जार्विस, सट्क्लीफ व कॉलिंग यांनी अर्ध-

शतके केली व भारताला ५५ मिनिटांत ७० धावा करण्याचे आव्हान दिले. सामना संपायला १४ मिनिटे असतानाच भारताने सामना जिंकला. सरदेसाई–पतौडी या दोघांनी घड्याळाचा सणसणीत पराभव केला. न्यूझीलंडची अखेरची जोडी वॉर्ड-कॅमेरान १५–२० मिनिटे अधिक खेळती, तर हा सामनाही अनिर्णीतच राहिला असता. वॉर्ड बाद झाला तो धावचीत, म्हणून हा उल्लेख !

सामना हरत असतानाही न्यूझीलंडचे क्षेत्ररक्षक वेळकाढू नव्हते. येनकेन-प्रकारेण सामना अनिर्णीत ठेवण्याचे धोरण त्यांनी पाळले नाही. उलट या शेवटच्या पन्नास मिनिटांत सर्व मालिकेतील उत्कृष्ट क्षेत्ररक्षण फेरोझशहा मैदानावर त्यांनी दाखविले.

झाले हे बरे झाले. अट्टाहास फळाला येऊन शेवटचा दिवस गोड झाला.

नेहमीप्रमाणे मग राष्ट्रपतींनी, उपराष्ट्रपतींनी अभिनंदनांचे संदेश पाठविले. ' महाराष्ट्र टाइम्स 'ने अग्रलेख लिहिला. पुण्यात रेडिओला हार घातले गेले.

पाहुणे परत गेले.

● ● ●

संपादक ' माणूस '

स. न.

आपल्या एक एप्रिल १९६५ च्या अंकांत " ब्रॅडमन की बॅड-मन ? " ह्या शीर्षकाखाली मुंबईमधील एक प्रसंग, त्याच्या अहंमन्यतेचे उदाहरण म्हणून सांगितला आहे. त्यांत श्री. विजय मर्चंट ह्यांचा संबंध असल्याने, मी त्यांना हा मजकूर दाखविला. तेव्हा ते म्हणाले, " त्या वेळी डॉन ब्रॅडमनखेरीज सारे खेळाडू मला भेटण्यासाठी बोटीवरून खाली आले, परंतु ब्रॅडमन खाली उतरला नाही. म्हणून मी वर जाऊन त्याला भेटलो. " ही ' माणूस 'मध्ये छापलेली हकीकत वस्तुस्थितीस धरून नाही. ऑस्ट्रेलियन संघाने मुंबईमधील कोणतेच निमंत्रण स्वीकारलेले नव्हते. तीन-चार तासांचा वेळ संघातील खेळाडू आपल्या इच्छेप्रमाणे घालविण्यास मोकळे होते. काही खेळाडू सी. सी. आय. ची हिरवळ बघण्यास आले, काही मुंबई शहर बघण्यासाठी गेले. ब्रॅडमनने आपल्या केबिनमध्येच थांबणे पसंत केले. मला हे समजल्यावर मी ब्रॅडमनला भेटण्यासाठी गेलो. त्याने माझे उत्कृष्ट स्वागत केले. " मी मुंबई बंदरावर गेलो असताना मला भेटण्यासाठी ऑस्ट्रेलियन खेळाडू बोटीवरून खाली आले, ब्रॅडमन केबिनमध्येच बसून राहिला, म्हणून त्याला भेटण्यासाठी मी बोटीवर गेलो, " हे खरे नाही.

श्री. विजय मर्चंट ह्यांचा हा खुलासा खासच उद्बोधक वाटेल.

**श्री. वा. काळे**

# नवें पेन

## plato 66

प्लेटो ६६

### किंमत मात्र तीच

रुपये ४/-




प्लेटो-६६ पेनमध्यें आतां
महत्त्वाच्या सुधारणा करण्यांत आल्या आहेत.
★ दीर्घ काळ रहाणाऱ्या स्प्रिंग
ॲक्शनसाठीं नवी रिफ्लेक्टर क्लिप.
★ अधिक टिकाऊ, मजबूत निब.

अद्यावत् तांत्रिक पद्धतीच्या अवलंबामुळें प्लेटो पेन्स हीं
नेहमींच ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरत आलीं आहेत.




पेटंटसाठीं अर्ज सादर केला आहे.

म्हात्रे प्रॉडक्ट

PLATO

सोल डिस्ट्रीब्यूटर्स:
**वेस्ट फाउंटन पेन डेपो,** पो. बॉ. नं. २४२१, मुंबई २.

Shilpi M.P. 64 Mag.

# चित्रपटात संवादांना फारसे महत्त्व उरलेले नाही

## • • आँद्रे वाज्दा

भारतीय चित्रसृष्टीत सत्यजित रे यांचे जे स्थान आहे, तेच स्थान पोलिश सिनेमा जगतात आँद्रे वाज्दा यांचे आहे. आज वाज्दा यांचे वय फक्त ३८ वर्षांचे आहे.

नुकत्याच भारतात भरलेल्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात उत्कृष्ट कथाप्रधान चित्रपटांच्या निवडीसाठी जी समिती नेमण्यात आली होती, त्यांत वाज्दा यांचा समावेश झाला होता.

स्विडिश निर्माता बर्गमन, इटालियन दिग्दर्शक अन्टोनिओनि, सत्यजित किंवा वाज्दा यांच्या गाजलेल्या चित्रपटांचे वैशिष्ट्य हे, की ज्या देशकालवर्तमानात त्यांची चित्रे जन्माला आली, त्याच्याशी त्यांच्या या चित्रपटाचे अतूट असे नाते होते. वाज्दांचे पहिले ख्याती पावलेले चित्रपट ' कानल ' व ' अॅशेस अँड डायमंड्स् ' ही अनुक्रमे दुसऱ्या महायुद्धातील पोलंड व युद्धानंतरचे पोलंड यांच्या पार्श्वभूमीवर निघालेली होती.

दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा वाज्दा हे शाळेत शिकत होते. १९२६ चा त्यांचा जन्म. पोलंडचा बळी महायुद्धात सर्वप्रथम गेला. महायुद्ध संपताना जे पोलिश देशभक्त नाझींविरुद्ध लढत होते, त्यात वाज्दा होते. तीन वर्षे ते प्रत्यक्ष लढत होते. चित्रपट काढण्याच्या अनुभवासाठी काही त्यांनी शिपाईगिरी किंवा हा आघाडीवरील हिंडणवारा पत्करला नव्हता !

युद्ध संपले. पोलंड पुन: स्वतंत्र झाला. क्रॅको यथील आर्ट्स् अॅकेडमीत वाज्दा हे रंगकलेचे विद्यार्थी म्हणून दाखल झाले.

पेंटिंगचे शिक्षण पुरे केल्यावर वाज्दा हे लॉड्झ् (Lodz) येथील पोलिश फिल्म इन्स्टिटयूटमध्ये दाखल झाले. येथेच त्यांनी आपले पहिले चित्र "The Generation" हे पुरे केले. हा चित्रपट वाज्दा यांचा सर्वश्रेष्ठ चित्रपट आहे, असे अनेक टीकाकार मानतात.

यानंतरचे त्यांचे दिग्दर्शन असलेले चित्रपट म्हणजे Lotna, (दौड) The innocent sorcerers (अश्राप जादुगारीण), ' samson ' व ' love at twenty (विशीतले प्रेम).

वाज्दा यांना एकएक चित्रपट पूर्ण करायला वर्षाहून अधिक काळ लागलेला आहे. याचे मुख्य कारण ते शूटिंग उरकण्याचा प्रकार करीत नाहीत. चित्रपटनिर्मिती



दिल्लीतील चालू मुक्कामात ......वाज्दा

★

हीदेखील चवीने व तब्येतीने ते करतात. शिवाय चित्रपटाप्रमाण रंगभूमीवरही त्यांनी दिदर्शक म्हणून नाव मिळविलेले आहे. त्यांनी दिग्दर्शित केलेली चालती, गाजती नाटके म्हणजे " A Hatful of rain, " " Two for the see-saw. ".

वाज्दा हे सध्या ashes हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक चित्रपट निर्माण करण्याच्या उद्योगात आहेत. या चित्रपटाविषयी बोलताना त्यांनी सांगितले आहे, " टॉलस्टॉयच्या 'वॉर अँड पीस' या कादंबरीसारख्याच आमच्याकडील एका पोलिश भाषेतील ऐतिहासिक कादंबरीवर मी हा चित्रपट घेत आहे. ही कादंबरी आमचेकडे फार प्रसिद्ध आहे. "

आपल्या चित्रपटाचे यशदायी सूत्र विषद करताना ते म्हणतात, " जीवनाविषयी जे सत्य जाणवते, ते कसलाही आडपडदा वा ढोंग न पत्करता माझ्या चित्रपटात साकार करण्याचा मी प्रयत्न करतो. चित्रपटात संवादांना फारसे महत्त्व उरलेले नाही. काम करणारे कलावंत अभिनयद्वारे काय व्यक्त करतात, तेच महत्त्वाचे

ठरते. शिवाय तरुणांचेच प्रश्न मी मुख्यत: माझ्या चित्रपटात मांडीत असतो."

वाज्दा यांचा विवाह बीटा (Beata Tyszkiewicz) या पोलिश अभिनेत्रीशी लवकरच होणार आहे. बीटा यांनीही "अलेक्झांडर व चाणक्य" या चित्रपटातील भूमिकेसाठी नुकतीच भारताला भेट दिली. हा चित्रपट भारत-जर्मनीच्या सहकार्याने सध्या तयार होत आहे.

"Innocent Sorcerers" हा वाज्दा यांचा एकच चित्रपट भारतातील यंदाच्या चित्रपट महोत्सवात दाखवण्यात आला. परंतु वाज्दा हे स्वत: परीक्षक असल्यामुळे हा चित्रपट स्पर्धेसाठी पाठविण्यात आलेला नव्हता.

–महेश


## □ अश्राप जादुगारीण

"इनोसंट सोअर्सरर्स" चा अर्थ आहे निष्पाप जादूगार!

बोलपटाचा नायक आहे एक तरुण डॉक्टर. एका छोटयाशा बिऱ्हाडात एकटाच राहणारा, बेफिकीर वृत्तीचा. चित्रपटाच्या सुरवातीपासून कॅमेरा डॉक्टरांच्या हाल-चालीवर अशारीतीने फिरत असतो, की त्यातून डॉक्टरची निष्काळजी, कशाचीही खंत न बाळगणारी वृत्ती अन् तो ब्रह्मचारी जीवन जगत आहे, ही गोष्ट प्रेक्षकांच्या सहज लक्षात येते. या डॉक्टरला 'जाझ' संगीताची फार आवड असते. दाढी करत असताना त्याने सुरू केलेला टेपरेकॉर्डर हे सांगतो. क्लबमध्ये तो पोहोचल्यावर एका-मागोमाग येणारे शॉट्स् पाहून डॉक्टरच्या आयुष्याची काही मिनिटांतच पुरी कल्पना येते.

असा हा डॉक्टर आपल्या मित्राबरोबर एकदा हॉटेलात जातो. तिथे ते दोघे एक तरुण मुलगी पाहतात. त्या मुलीबरोबर तिचा मित्र असतो. डॉक्टरचा मित्र डॉक्टरच्या मसलतीने त्या मुलीबरोबरच्या तरुणाला दूर नेतो. ती मुलगी एकटी राहते. तिला स्टेशनवर शेवटची गाडी गाठायची असते. डॉक्टर तिच्या मदतीला येतो व तिला घेऊन स्टेशनवर जातो. परंतु शेवटची गाडीसुद्धा चुकते. नाइलाजाने तिला त्या तरुण डॉक्टरच्या खोलीचा आश्रय घ्यावा लागतो.

ती मुलगी त्याच्याचसारखी उमद्या स्वभावाची असते. रात्रीच्या थोडया परि-चयात त्यांच्या मनाच्या तारा जुळू लागतात. त्याच्या प्रत्येक कृतीला ती शांतपणे प्रतिसाद देते. त्याच्या कामुक वृत्तीला चाणाक्षपणे थोपवून धरते. रात्र तर संपायला हवी, म्हणून दोघेजण द्यूताचा खेळ खेळू लागतात. फासे पडू लागतात. प्रथम तो हरतो. दान त्याच्या बाजूला पडत नाही. त्याचे बूट न् शेवटी त्याला स्वत:ची पँटही उतरवून तिच्या स्वाधीन करावी लागते. पण मग नशीब फिरतं. आता तिला दान पडत नाही. तिच्याऐवजी तो जिंकतो. तिनं जिंकलेल्या साऱ्या गोष्टी तर तो परत मिळवतोच, शिवाय तिचा स्कर्ट, ब्लाऊज यांवरही त्याची मालकी होते. आता



'मी सभ्य गृहस्थ आहे.'—डॉक्टर

★

तिच्यापाशी फक्त लज्जारक्षणापुरतेच वस्त्र तिचे असे उरते. तो जिंकतच जातो. ती शरमेने उभी राहते. त्याला शांतपणे विचारते, " बॉडी की अंडरवेअर ?" तो तिच्याकडे पाहतो न् म्हणतो, " मी सभ्य गृहस्थ आहे. "

सुमारे अर्धा तास चालणारा हा खेळ चित्रित करण्यात दिग्दर्शक वाज्दाच्या दिग्दर्शनमाध्यमावर असलेल्या पकडीची जाणीव होते. या प्रसंग-साखळीतील प्रत्येक दुवा संयम ठेवून जोडलेला आहे. तो कुठंही कंटाळवाणा होत नाही. उलट आता पुढं काय, अशी प्रेक्षकांना उत्सुकता लागून रहाते.

पहाट झालेली असते. खेळ संपतो. डॉक्टर तोंडावर पाण्याचा हबका मारण्यासाठी बाथरूममध्ये जातो. बाहेर येऊन पाहतो तो मुलगी गायब ! त्या मुलीविषयी त्याच्या मनात आता विलक्षणच ओढ निर्माण झालेली असते. तिच्यावर मन बसल्याची त्याच्या मनाला जाणीव होते. तो आपल्या मोटर बाईकवर बसून तिच्या शोधार्थ बाहेर पडतो. त्याच्या घराजवळच त्याला त्याचा मित्र भेटतो. त्याच्याशी बोलायलाही त्याला वेळ नसतो. पुष्कळ शोधूनही ती सापडत नाही, तेव्हा तो निराश होऊन परत येतो.

इकडे ती मुलगीही परत आलेली असते. तिलाही त्याच्याविषयी वाटू लागलेलं आकर्षण प्रभावी ठरतं.

— पुरुषोत्तम बावकर

# भिंतीच्या तुंबड्या

## ● कॉम्प्यूटर-कवींचा कारखाना

स्त्रियश्चरित्रम् आणि पुरुषस्य भाग्यम् या दोन अनाकलनीय गोष्टींच्या जोडीला कॉम्प्यूटर यंत्रस्य कर्तृत्वम् ही तिसरी गोष्ट ठेवायची पाळी आली आहे. वेरीज-वजाबाकी करायचा बिगरीतल्या पोराला जेवढा कंटाळा असतो, तेवढाच त्याच्या तीर्थरूपांना ही कटकट टळावी म्हणून ( —अन् उत्तर चुकून, शेंबड्या बंड्यासमोर बअक्कल होऊ नये म्हणूनही) माणसाने कॉम्प्यूटर प्रथम तयार केला. पण झाले काय ? या अजब यंत्राने एका झपाट्यात केलेल्या बौद्धिक प्रगतीने त्याला तयार करणारा माणूसच आता थक्क झाला आहे. 'कॉम्प्यूटरची करामत' या विषयावर परवा एक लेख वाचला त्यावरून दिसते की बेरीज-वजाबाकी करायचा कंटाळा येऊन हे वेडे यंत्र आता करमणुकीखातर चक्क नवकाव्यही करू लागले आहे! कॉम्प्यूटर-काव्याचे काही नमुने छापूनही आले आहेत, त्यावरून अस्मादिकांचे असे ठाम मत झाले आहे की मराठी साहित्याने ज्याप्रमाणे नवनाट्याकडून ननाट्याकडे (आगे?) कूच केली आहे तशीच नवकाव्याकडून नकाव्याकडे करायची असेल तर कॉम्प्यूटरांना मराठी शिकविण्याखेरीज तरणोपाय नाही. नवकवी हा हाडाचा कितीही 'नव' असला तरी आपण काय लिहितो हे आपल्याला तरी कळावे, या मानवी इच्छेला बळी पडून तो चुकून कधी कवी समजण्यासारखे लिहितोच. तेव्हा दुर्बोध शब्द-गाबदुल्य हे नवकाव्याचे व्यवच्छेदक लक्षण कटाक्षाने जतन करण्यासाठी एखादा कॉम्प्यूटर-कवीच हवा. कुणी सांगावे, मर्ढेकरांच्या ओल्या पिपात ( — चुकलो, पिपात) मेलेल्या उंदरांना एखादा कॉम्प्यूटर-कवीच सद्गती देऊ शकेल.

'कवींचा कारखाना' हा थट्टेचा शब्दप्रयोग कॉम्प्यूटरांच्या करामतीमुळे आता सार्थ ठरला असल्याने भारत सरकारने चौथ्या पंचवार्षिक योजनेत एखादा 'पब्लिक सेक्टर कॉम्प्यूटर-कवी कारखाना' उभारायला हरकत नाही. म्हणजे एकीकडे आकडेमोड करीत असताना दुसरीकडे आकाशवाणीसाठी जोषपूर्ण योजना-गीते लिहून ही देशभक्त यंत्रे भारताच्या औद्योगिक व वैचारिक प्रगतीचे दोन्ही

पक्षी एका दमात मारू शकतील. वाटल्यास १५ ऑगस्टला दिल्लीच्या लाल किल्ल्यात जो 'मुशायरा' होतो, त्याच्याऐवजी कॉम्प्यूटर-कवी विरुद्ध मानवी कवी अशी एक साहित्य-रस-स्पर्धा साहित्य-अॅकॅडेमीतर्फे योजण्यात यावी.

कॉम्प्यूटर यंत्र गणित करू शकते व काव्यही करू शकते, तर त्याने राज्य करायला काय हरकत आहे? इंग्लंडात काही कल्पक विद्यार्थ्यांनी अशी सूचना मांडली आहे की राणी एलिझाबेथला सुट्टी देऊन तिच्याजागी एखादा कॉम्प्यूटर गादीवर बसवावा, म्हणजे राज्यक्रांतीची वेळ आली तर नाहक रक्तपात करावा न लागता, कॉम्प्यूटरचे काटे इकडून तिकडे फिरवले की काम भागेल! खरेच, हिंदुस्थानातही शास्त्रीजींच्या जागी कॉम्प्यूटर बसवला तर कॉम्प्यूटर-मंत्रिमंडळ आणि जेस्टंटना डुप्लिकेटर यांना एक तार जोडली, तर एक मोठा फायदा असा होईल की चीनला व पाकिस्तानला सकाळ-संध्याकाळ निषेध खलिते पाठविणे हा जो आपल्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा सर्वात मोठा भाग आहे, तो ऑटोमॅटिक प्रोसेसने होऊ शकेल.

## ● चक्षुर्वै असत्यम्

इतिहास म्हणजे 'इति ह आस'— "असे घडले," पण एकच घटना प्रत्यक्ष पाहणाऱ्या दोन माणसांना 'कसे घडले?' विचारले तर दोन निरनिराळ्या प्रकारचे 'असे' ऐकायला मिळते. दोन सामान्य माणसांची ही गत तर डझनभर 'आमचे खास बातमीदार' एकत्र आले तर काय गोंधळ उडत असेल? थोड्याच दिवसांपूर्वीची गोष्ट. क्रुश्चेव्हला पेन्शनीत काढल्यापासून ते जे गायब झाले होते, ते पंधरा दिवसांपूर्वी मतदान करायला जायच्या निमित्ताने रस्त्यावर दिसले. दिसले खरे, पण कसे? येथेच वृत्तपत्रीय ग्यानबाची मेख आहे. रॉयटरच्या वार्ताहराला त्यांची प्रकृती चांगली व मुद्रा हसरी दिसली. असोसिएटेड प्रेसच्या वार्ताहराला तर त्यांची प्रकृती पंतप्रधान असताना होती तितकीच ठणठणीत वाटली. डेली टेलिग्राफ या ब्रिटिश वर्तमानपत्राच्या बातमीदाराला त्यांचा जोम मुळीच कमी झालेला नाही असे वाटले, तर गार्डियनच्या बातमीदाराला त्यांचे वजन हटलेले व जोम उतरलेला दिसला! डेली टेलिग्राफचा वार्ताहर म्हणतो त्यांची मुद्रा सहास्य होती, तर डेली स्केचचा म्हणतो, ती उदास व बारीक वाटली. डेली मेलच्या बातमीदाराला तर क्रुश्चेव्हला जवळ जवळ रडू कोसळलेलेच दिसले! आता यातले 'खरे सत्य' कोठले? अर्थात फक्त 'आमच्या खास बातमीदारा'ला दिसले तेच. दुसऱ्या वार्ताहरांना जाडा माणूस अन् बारीक माणूस, उतरलेला चेहरा अन् हसरा चेहरा यांतला फरक समजत नाही; त्याला कोण काय करणार? म्हणून म्हणतो, आमचाच पेपर घ्या.

सुधाकर राजे

[ उद्योगपतींचे गाजलेले अधिवेशन : पान ९ वरून चालू ]

हल्ला चढविला व सदर विषयाचे गांभीर्य न ओळखल्याबद्दल काही वक्त्यांना कडक शब्दात समजही दिली. श्री. अशोक मेहता यांचे भाषण म्हणजे वक्तृत्वाचा एक उत्कृष्ट नमुना होता. आकडेवारीच्या साहचाने, काही वेळा भावनाविवश होऊन व प्रसंगी रागावून कडक शब्दातून त्यांनी फेडरेशनच्या या ठरावाची व त्यावरील वक्त्यांची चांगलीच हजेरी घेतली व मोठ्यापासून लहानांपर्यंत सर्वांनी येथे एका सुरात नैराश्यवाद पसरवू नये, देशाचा विचार करावा व नुसते शब्दांचे जंजाळ विणत न बसता प्रत्यक्ष सूचना कराव्यांत, संबंधितांशी चर्चा करावी असे त्यांनी सुचविले.

## ● सोयीस्कर बगल

श्री. अशोक मेहतांनी 'सभा जिंकली' हे जरी खरे असले तरी फेडरेशनच्या ठरावावरील व वक्त्यांच्या काही मुद्यांना त्यांनी उत्तरे देण्याचा प्रयत्न केला नाही. चौथी योजना किती मोठी असावी यावरील फेडरेशनच्या आक्षेपांना त्यांनी उत्तरे दिली पण ही योजना उभी करण्यास पैसा कसा उभा करणार व एवढी मोठी योजना आम्ही कार्यान्वित करू शकू काय यासंबंधी उपस्थित केलेल्या मुद्यांना मात्र त्यांनी सोईस्करपणे चाट दिली ! पण आपल्या अमोघ वक्तृत्वाने त्यांनी त्या वेळी तरी सभा काबीज केली हे खरे !

तसे खरे चांगले भाषण झाले श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार यांचे ! फेडरेशनच्या दुपारच्या भोजनप्रसंगी त्यांनी हे भाषण केले. मुद्देसूद व दोन्ही बाजूंनी विचार करून केलेले व वक्तृत्वाच्या दृष्टीनेही विचार करता हे भाषण फार चांगले झाले. ना. श्री. शास्त्री यांनी फेडरेशनच्या अध्यक्षीय भाषणाला अशा कडक शब्दांतून का उत्तर दिले असावे असा विचार त्यांनी मांडला व त्यातून त्यांनी व्यापारी व कारखानदार वर्ग नि सरकार यांच्यात संबंध कसे दुरावत चालले आहेत व नैराश्य नि अकारण टीका यांमुळे दोघांच्या दृष्किोनात किती तफावत पडली आहे याचे सुरेख दिग्दर्शन केले. देशापुढील विविध प्रश्नांचा त्यांनीं उल्लेख केला व उपस्थित व्यापारी कारखानदार वर्गास आपला धंदा नि त्यांतून मिळणारा नफा एवढीच संकुचित दृष्टी न ठेवता आपल्या पुढील प्रश्नांचा देशाच्या मोठ्या चौकटीतून विचार करणे जरूर आहे असे त्यांनी सांगितले. जाताजाता त्यांनी फेडरेशनची अध्यक्षीय भाषणे व ठराव लिहिण्याची जी पद्धत आहे त्यालाही कोपरखळ्या मारल्या व आपल्या ठरावातून नि घोषणातून सरकारवर नुसतीच टीका करणे योग्य नव्हे असे सुनविले. श्री. अय्यंगार यांनी केलेल्या सूचनांचा व आदल्या दोन दिवशींच्या सरकारी टीकेचा परिणाम म्हणूनच दुसरे दिवशी अधिवेशनापुढील 'सरकारी अंदाजपत्रके व करयोजना' या विषयावरील ठरावात आमूलाग्र दुरुस्ती करण्यात आली व तिचे तक्रारीचे स्वरूप जाऊन काही सरकारी योजनांचे स्वागत करण्यापर्यंत

दुरुस्त्या झाल्या. पण या ठरावात जरी दुरुस्ती झाली तरी त्यानंतर 'देशाच्या अर्थकारणात व्यापाऱ्यांचे स्थान' या विषयावर झालेल्या चर्चेत पुन: टीकेचा जोरदार सूर होता व वक्त्यामागून वक्त्यांनी सरकारी धोरणावर कडक शब्दात हल्ला चढविला.

## ● उभयपक्षी अतिरेक सुटला पाहिजे

फेडरेशनचे अधिवेशन हे निमित्तमात्र होते. या निमित्ताने सरकारी दृष्टिकोन व खाजगी कारखानदारांचा दृष्टिकोन यांत किती तफावत पडली आहे हे पुन: दिसून आले. पूर्वी दोघांच्यात फार मोठा गोडवा होता असे नाही. पण निदान तोंडदेखले गोड शब्द बोलण्याचा जो शिष्टाचार होता तोही आता दोघांनीही झुगारून दिलेला दिसतो. पण दोघेही विरुद्ध टोकाला गेले आहेत असे वाटते. व्यापारी व कारखानदार म्हणजे पिळवणूक करणारे, जनतेच्या कष्टाचा उपयोग करून आरामात पैसे करणारे अशा दृष्टिकोन सरकारने सोडावयास हवा. शिवाय जेथे खाजगी कारखानदार किंवा व्यापारी यांचे सहकार्य मिळत नाही किंवा जेथे ते यशस्वी होऊ शकत नाहीत तेथे सरकार पाऊल टाकील ही कल्पनाही चुकीची ठरेल. भांडवलाचा, कर्तृत्ववान माणसांचा, तंत्रज्ञांचा सगळीकडे तुटवडा असताना सरकारने सर्व क्षेत्रात शिरू हणणे योग्य होणार नाही. शिवाय सरकारी मालकीच्या कारखान्यांचा व इतर योजनांचा गवगवा अजून तरी फारसा चांगला नाही. तेव्हा सर्व गोष्टी अंगावर घेणे कुवतीच्या बाहेर जाईल हे मान्य व्हावे व जेथे जेथे खाजगी प्रयत्नाने एखादी गोष्ट होणार असेल तेथे अवश्य वाव दिला जावा.

त्याउलट नियोजन नको, सरकारी मालकीचे कारखाने नकोत, कोणतीही बंधने नकोत हा अतिरिक्त दृष्टिकोन खाजगी कारखानदार वर्गानेही आता सोडावयास हवा. भारतसारख्या अविकसित देशास या गोष्टी आवश्यक आहेत व याबरोबर जगावयास शिकावयास हवे हे मान्य व्हावे. सामाजिक कर्तव्यांची व बंधनांची जाणीवही या वर्गाने ठेवावयास हवी. नपेक्षा सरकारी हस्तक्षेपास तयार रहावे.

अशा वातावरणात फेडरेशनसारख्या संस्थेवर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. त्यांच्या वक्तव्यांना, टीकांना फार महत्त्व आहे हे त्यांनी विसरता कामा नये. भोंगळ टीका, सर्वसामान्य शब्दांची योजना करून केलेले ठराव, टीकांनाच प्राधान्य देऊन केलेली भाषणे ह्या गोष्टींना विराम देण्याची वेळ आली आहे. प्रत्येक बाबतीत फेडरेशनने नीट विचार केला आहे, सर्व गोष्टींचा अभ्यास करून विधायक टीका व योग्य सूचना केल्या आहेत असे आता दिसावयास हवे. त्याचबरोबर व्यापारी व कारखानदार वर्ग नीट संघटित होण्यासाठी काही विधायक कार्यक्रमही त्यांनी हाती घेतला पाहिजे. प्रसंगी या वर्गाचे चुकत असल्यास त्यांना योग्य शब्दांत समज देण्याचे धैर्यही फेडरेशनने दाखविले पाहिजे.

येत्या वर्षी महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांची फेडरेशनच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांची स्वत:च्या धंद्यातील सचोटी,

कर्तबगारी, लोकप्रियता व सरकारदरबारी असलेले त्यांचे वजन या सर्वांचा उपयोग करून ते फेडरेशनच्या धोरणात इष्ट तो बदल घडवून आणतील अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही.

पद्मभूषण श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या हाती फेडरेशनची सूत्रे येत असताना ज्यांना निरतिशय आनंद झाला असे महाराष्ट्रांतील उद्योगपती श्री. वसंतराव वैद्य स्वप्न साकार झाल्याच्या आनंदात होते. श्री. जोग व चेंबरचे श्री. दामुअण्णा पोतदार, गरवारे, वालचन्द ग्रूपचे बाहुबलीशेठ व भारतशेठ, कलकत्त्याचे श्री. भरतराम व श्री. चरतरामशेठ, श्री. लिन्से व डॉ. गांगुली, बडोद्याच्या अॅलेम्बिक ग्रुपचे श्री. अमीनशेठ, मद्रासचे चेटियार, श्री. ए. एम्. एम्. अरुणाचलम, मुंबईचे बाबूभाई चिनॉय, दिल्लीचे डॉ. काणे व संरक्षणमंत्री श्री. यशवन्तराव चव्हाण या सर्वांची भावना, अपेक्षा व मनोमन खात्री एकच होती, की फेडरेशनचे धोरण आता अधिक वास्तवतावादी, पाउले रचनात्मक व नेतृत्व प्रगतिशील होईल. —*एक निरीक्षक*

[ **दिल्ली दरबार :** 'दरबारीं' यांचे नेहमीचे सदर टपालखात्याच्या विलंबामुळे वेळेवर हातीं येऊ शकले नाही. त्याऐवजीं 'एक निरीक्षक' यांचा दिल्लीतील उद्योगपती अधिवेशनाचा हा चक्षुर्वैसत्य वृत्तान्त वाचकांना रुचिपालट म्हणून आवडण्यास हरकत नाही.——संपादक ]


# माणूस


१ मे १९६५

## या अंकात

ब. मो. पुरंदरे
लिखित
राजा शिवछत्रपती
या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभानिमित्त
**' शिवाजी— एक अभ्यास '**
हा विशेष लेख
**लेखक : श्री. ग. माजगावकर**

| | |
|---|---|
| लालमहाल | प्रतापगड |
| पन्हाळगड | राजगड |
| पुरंदर | आग्रा |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे<br>रा ज हं स | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन<br>प्र का श न, पु णे. |

MANOOS (Fortnightly) : 15 April 1965 : 25 Paise : Regd NO. B 9304




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर